• पुणे, बुधवार, २६ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 118 • वर्ष ४ थे, अंक ११८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





खेळ आणि सांस्कृतिक 'जलसा'ही...! P३



इम्पॅक्ट प्लेअरमुळे धावांचा पाऊस? १२




# आदित्योत्सवाच्या झळा

## आता उद्धव ठाकरेंनाही केले सहआरोपी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिशा सालियान हिची हत्या की आत्महत्या हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. दिशा सालियान हिचे वडील सतिश सालियान यांनी दिशाची हत्याच झाली असल्याचा आरोप करत मुंबई पोलिस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. शिवाय या संपूर्ण प्रकरणाचा फेर तपास केला जावा अशी मागणी ही केली आहे. सालियान यांचे वकील ॲड. निलेश ओझा यांच्या मार्फत त्यांनी ही तक्रार दाखल केली आहे. ही तक्रार नाही तर एफआयआर असल्याचा दावा ओझा यांनी केला आहे. त्यात त्यांनी आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनाही आरोपी करण्यात आलं आहे. त्यामुळे ठाकरे पिता पुत्राच्या अडचणी वाढणार अशी चर्चा राजकीय वर्तूळात सुरू आहे.



### आदित्य यांचा बचाव खोटा

- दिशाची हत्या झाली त्यावेळी आदित्य तिथे होते की नाही हे त्यांनाच सिद्ध करावे लागेल. त्यांनी त्यांचा बचाव करताना जी काही कारणं दिलं आहेत ती सर्व खोटी आहेत असा दावाही ओझा यांनी केला आहे. दरम्यान सतिश सालियान यांनी या प्रकरणाची फेर चौकशी केली जावी अशी मागणी २०२३ सालीच केली होती, असंही त्यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे ते आताच मागणी का करत आहे हे बोलणं योग्य नाही असंही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना त्यांच्या पदाचा गैरवापर केला. आदित्य ठाकरेंना वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांनाही सहआरोपी करावं, अशी मागणी करण्यात आली आहे. आमची तक्रार खोटी असेल तर आम्हाला फाशी द्या, असंही ते म्हणाले आहेत.



दिशा सालियान हिची अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचा दावा ॲड. निलेश ओझा यांनी केला आहे. यामध्ये त्यांनी आदित्य ठाकरेंना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. शिवाय तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही सह आरोपी करण्यात आलं आहे असं ओझा म्हणाले. शिवाय ठाकरे पिता पुत्रासह दिनो मोरया, सुरज पांचोली, त्यांचे बॉडीगार्ड, तत्कालीन पोलिस आयुक्त परमबिर सिंह, सचिन वाझे आणि रिया चक्रवर्ती हे आरोपी असल्याचं त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या विरोधात तक्रार दिल्याचं ही ते म्हणाले. ही तक्रारच एफआयआर असल्याचा दावा ही त्यांनी केला आहे.

दिशा सालियन प्रकरणात निलेश ओझा यांनी आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह अभिनेता दिनो मोरिया, सूरज पांचोली आणि माजी पोलीस अधिकारी परमबीर सिंग यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत. वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, नार्कोटेक्स ब्युरोच्या तपासात हे आढळून आलंय आदित्य ठाकरे हे ड्रग्स बिझनेसमध्ये सहभागी आहेत. त्यासंदर्भाती इत्यंभूत माहिती आम्ही या अर्जात दिली आहे. आदित्य ठाकरे, दिनो मोरिया यांच्या फोन कॉल्ससह समीर खान नावाच्या व्यक्तीची डीएफीपी नावाची कंपनी होती, जी ड्रग्सचे सिंडिकेट चालवत होती.

» पान ७ वर

### सतिश सालियन यांचं यापूर्वीच स्टेटमेंट रेकॉर्ड

- ११ डिसेंबर २०२३ साली सतिश सालियन यांचं स्टेटमेंट रेकॉर्ड करण्यात आलंय. त्यामध्ये, त्यांनी केस रिओपन करुन चालवण्याची मागणी केली आहे. याशिवाय आमच्याकडे आय विटनेसही आहेत. दिशाची हत्या झाली त्या दिवशी आदित्य ठाकरे तिथं होते की नाही? आणि दुसरं म्हणजे दिशाचा मृत्यू हा नैसर्गिक नाही.
- त्यामुळे, ही आरोपीची जबाबदारी आहे की, त्यांनी ते पटवून द्यावं हा मृत्यू नैसर्गिक नाही, असे नितीन ओझा यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले.

बिनविरोध निवड; उद्या घोषणा

# राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे विधानसभेचे नवे उपाध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी केवळ महायुतीच्यावतीने बनसोडे यांचा अर्ज आला होता. आज दुपारी अर्ज पडताळणीत वैध ठरला आहे. बुधवारी सभागृहात विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी अण्णा बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आल्याची अध्यक्षांकडून घोषणा केली जाणार आहे. विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी तीन नावे चर्चेत होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी वर्णी लागली आहे.

» पान ७ वर

### अजित पवारांचे कट्टर समर्थक

- अण्णा बनसोडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार आहेत. ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. ते पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघातून आमदारपदी निवडून आले आहेत. २००९ मध्ये पहिल्यांदा आमदारपदी विराजमान झाले होते. त्यानंतर २०१९ आणि २०१४ असे सलग दोनवेळा आमदारकी मिळवली. राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर ते अजित पवार यांच्यासोबत राहिले, आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा त्यांनी बाजी मारली. दादांच्या बालेकिल्ल्याचे पिंपरीचे शिलेदार म्हणून अण्णा बनसोडे यांची ओळख आहे.

संयुक्त राष्ट्रसंघात पाकला ठणकावले

# पाकव्याप्त काश्मीर भारताचाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच भाग असून पाकिस्तानला रिकामे करावे लागेल, असे संयुक्त राष्ट्रसंघाने पाकिस्तानला ठणकावून सांगितले आहे. सुरक्षा परिषदेत बोलताना भारताच्या स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश म्हणाल्या की, पाकिस्तान वारंवार जम्मू-काश्मीरचे नाव घेऊन आपल्या अधिकार आणि नैतिकतेचे उल्लंघन करत आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग होता आणि राहील. जम्मू-काश्मीरचा जो भाग पाकिस्तानने बेकायदेशीररित्या ताब्यात घेतला आहे, तो भागही रिकामा करावा लागेल.

शांततेच्या चर्चेदरम्यान पाकिस्तानने पुन्हा एकदा जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला, तेव्हा भारताने जोरदार फटकारले, ज्यामुळे त्याचा खोटेपणा पुन्हा एकदा उघड झाला. वारंवार खोटे बोलले म्हणून ते खरे होणार नाही, असे भारताने म्हटले आहे. पाकिस्तानच दहशतवादाला खतपाणी घालतो तसेच सीमेपलीकडील

» पान ७ वर




### पाक झाला त्रस्त

- दहशतवाद्यांना आश्रय देणारा पाकिस्तानच आता अतिरेकी कारवाया आणि दहशतवादाने त्रस्त झाला आहे. पाकिस्तानात दररोज हत्या आणि बॉम्बस्फोटांच्या बातम्या येत आहेत. दहशतवादी लष्कराच्या जवानांना लक्ष्य करतात. असे असूनही ते आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर दहशतवादावर बोलायला तयार नाहीत.
- संधी मिळताच तो जम्मू-काश्मीरबद्दल बोलतात. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताने प्रत्येक वेळी पाकला उघडे पाडले आहे.

> पाकिस्तान जम्मू आणि काश्मीरचा भूभाग बेकायदेशीरपणे कब्जा करत आहे. तो त्यानी खाली केला पाहिजे. आम्ही पाकिस्तानला सल्ला देतो की त्यांनी त्यांचा संकुचित दृष्टीकोन आणि फुटीरवादी अजेंडा पुढे रेटण्यासाठी या मंचाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करू नये."
>
> **— पार्वतनेनी हरीश,** भारताचे राजदूत

# लोकसभेत अर्थ विधेयक २०२५ मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अर्थ विधेयक लोकसभेत २०२५ मंजूर झाले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सुधारित अर्थ विधेयक २०२५ सादर केले. या सुधारणांमध्ये ऑनलाइन जाहिरातींवरील ६ टक्के डिजिटल कर किंवा गुगल कर रद्द करणे समाविष्ट आहे. याशिवाय, इतर ३४ दुरुस्त्या समाविष्ट आहेत. आता हे विधेयक राज्यसभेत सादर केले जाणार आहे.

या विधेयकाला जर राज्यसभेतही मंजुरी मिळाली, तर हे विधेयक पूर्ण होईल. २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात एकूण ५०.६५ लाख कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे, जो चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत ७.४ टक्के वाढ आहे. यावेळी अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, जाहिरातींसाठी ६ टक्के समानीकरण शुल्क रद्द करण्याचा मी प्रस्ताव ठेवतो. आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीतील अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी, ऑनलाइन जाहिरातींवरील समानीकरण शुल्क रद्द केले जाणार आहे.

पुढील आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित भांडवली खर्च ११.२२ लाख कोटी रुपये निश्चित करण्यात आला आहे, यामध्ये १५.४८ लाख कोटी रुपयांचा प्रभावी भांडवली खर्च समाविष्ट आहे. अर्थसंकल्पात ४२.७० लाख कोटी रुपयांचे एकूण कर महसूल संकलन आणि १४.०१ लाख कोटी रुपयांचे एकूण कर्ज घेण्याचा अंदाज आहे. केंद्र पुरस्कृत योजनांसाठी लक्षणीय वाटप करण्यात आले आहे.




जयकुमार गोरे ब्लॅकमेल प्रकरण

# सुप्रिया सुळे, रोहित पवारांचेही नाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचे ग्रामीण विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर विनयभंगाचे आरोप करणाऱ्या महिलेला पोलिसांनी खंडणीच्या आरोपाखाली अटक केली आहे. एक कोटी रुपयांची खंडणी घेताना महिलेला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. विधानसभेतही या प्रकरणाचे पडसाद उमटले. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. याची चौकशी होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### आरोपी सुप्रिया सुळे, रोहित पवारांच्या संपर्कात

- पोलीस तपासात असं निदर्शनास आलं की हे एक नेक्सस होतं. ही महिला, युट्युबर तुषार खरात आणि अनिल सुभेदारसह काही लोकांचा नेक्सस असल्याचं आढळलं. या लोकांनी जो कट रचला याचे सगळे पुरावे सापडले आहेत. यांचे अनेक फोन आहेत, ते सगळे सापडले आहेत. दुदैवाची गोष्ट म्हणजे या सर्वांशी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते थेट संपर्कात दिसत आहेत. प्रभाकरराव देशमुख यांच्याशी आरोपी बोलत होते. त्याहीपेक्षा वाईट वाटतं की सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांचे कॉल्स तुषार खरातसोबत झाले आहेत. तसेच आरोपींनी तयार केलेले व्हिडीओ देखील त्यांना पाठवण्यात आले आहेत. आता याची चौकशी केली जाणार आहेत, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "मंत्री जयकुमार गोरे यांच्यासंदर्भात घडलेली घटना दुदैवी आहे. कुणाला जीवनातून उठवण्याच्या उद्देशाने राजकारण होत असेल तर ते चुकीचे आहे. त्यांच्यासंदर्भातील केस २०१६ मध्ये घडली, २०१९ मध्ये त्यांची निर्दोष मुक्तता

» पान ७ वर

# न्यायाधीश वर्मांच्या विरोधात महाभियोग चालवण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याशी संबंधित रोकड प्रकरणी न्याय्य चौकशी केली जावी. तसेच, वर्मा यांना हटवण्यासाठी महाभियोगाची प्रक्रिया चालवली जावी, अशी मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात आली आहे. वर्मांशी संबंधित प्रकरण संसदेत लावून धरण्याचे संकेत विरोधकांनी दिले आहेत. त्या प्रकरणावर संसद भवनाबाहेर पत्रकारांशी स्वतंत्रपणे बोलताना विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या.

एकही पैसा आढळला नसताना विरोधकांना तुरूंगात पाठवले जाते. मात्र, देशाच्या इतिहासात प्रथमच न्यायाधीशांच्या

» पान ७ वर

# वक्फ दुरुस्ती विधेयक; आज सर्वपक्षीय बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** एआयएमपीएलबीसह अनेक मुस्लिम संघटना वक्फ दुरुस्ती विधेयकाविरोधात देशभरात निदर्शने करत आहेत असे असताना केंद्र सरकार आता ते संसदेत मांडण्याची तयारी करत आहे. त्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेत आणण्यापूर्वी केंद्र सरकारने बुधवारी(२६ मार्च) सर्व खासदारांची बैठक बोलावली आहे. ज्यामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. संसदेच्या समन्वय कक्ष क्रमांक ५ मध्ये सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत एक तास सर्व खासदारांना वक्फ विधेयकाची माहिती दिली जाणार आहे. वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष केंद्रातील भाजप सरकारवर हल्लाबोल करत आहेत.






## कल्याणीनगरमध्ये लॉजवर छापा, व्यवस्थापकावर गुन्हा

**पुणे :** येरवडा पोलिसांनी कल्याणीनगरमधील एका लॉजवर छापा टाकून वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतले. याबाबत पोलिस हवालदार रामेश्वर नवले यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून लॉज व्यवस्थापक अमोल भाउसाहेब तांबडे (वय २८, मूळ रा. मांडवे, ता. श्रीरामपूर) आणि अन्य एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, तरुणींना पैशांचे आमिष दाखवून वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे आढळले.

कारवाईत पोलिसांनी सात हजारांची रोकड व तीन मोबाइलसह ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके करीत आहेत.




## पबमध्ये गैरवर्तन; एकाच्या विरूध्द गुन्हा

**पुणे :** येरवड्यातील एका मॉलमधील पबमध्ये तरुणींना धक्का देणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी रात्री डान्स फ्लोअरवर नृत्य करणाऱ्या तरुणींना गणेश दादाभाऊ घावटे (वय ३४, रा. अण्णापूर, ता. शिरूर) आणि यश कोतवाल (रा. कोरेगाव भीमा, ता. शिरूर) यांनी धक्का दिला.

हा प्रकार पाहून महिला बाऊन्सरने त्यांना समज दिली असता आरोपींनी तिच्याशी गैरवर्तन व शिवीगाळ केली.

याबाबत ३० वर्षीय महिला बाऊन्सरने येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींना प्रतिबंधात्मक कारवाईची नोटीस बजावल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल टकले करीत आहेत.



## शिक्षकांची आता ‘बायोमेट्रिक’ हजेरी

**पुणे :** जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शाळांमध्ये शिक्षकांच्या उपस्थितीवर अधिक बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी आता ‘बायोमेट्रिक हजेरी प्रणाली’ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या नव्या प्रणालीमुळे शिक्षकांची हजेरी नियमित राहील. तसेच, अनुपस्थितीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात यावर्षी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शैक्षणिक गुणवत्तेवर अधिक भर देण्यात आला. त्याअंतर्गत अर्थसंकल्पात सर्व शाळांमध्ये शिक्षकांसाठी बायोमेट्रिक हजेरीसाठी यंत्रणा कार्यान्वित केली जाणार असल्याचे नमूद केले आहे. शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी शाळेत जाऊन मुलांना अध्यापन करणे महत्त्वाचे आहे. तीन हजार ५४६ प्राथमिक शाळांमध्ये प्रत्येक एकप्रमाणे बायोमेट्रिक यंत्रणा बसविण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा वार्षिक योजना, कंपनीचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) तसेच, इतर शासकीय योजनांमधून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शिक्षकांना शाळेत वेळेवर हजर राहावे लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी होण्यास मदत होईल. तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षण क्षेत्र अधिक पारदर्शक व सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने हा एक सकारात्मक निर्णय ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## थकबाकीदारांवर ‘महा’ कारवाई...!



**पुणे** महावितरणची वीज ग्राहकांकडे मोठ्या प्रमाणावर थकबाकी अडकली असल्याने त्यांच्या विरोधात कडक धोरण स्विकारण्यात आले आहे, गेल्या २४ दिवसात तब्बल २५ हजार ४३४ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्यासाठी खुद्द मुख्य अभियंता राजेंद्र पवार ‘ऑन फिल्ड’ आहेत.

## पंचवीस हजार थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महावितरणने थकबाकी वसूल करण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू केली असून, पुणे परिमंडलातील २५ हजार ४३४ थकबाकीदारांचा वीजपुरवठा गेल्या २४ दिवसांत खंडित करण्यात आला आहे. घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे ८८ कोटी ४५ लाख रुपयांची थकबाकी आहे.

महावितरणची आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसुलीवरच आहे. वीजबिलांच्या वसुलीमधून वीजखरेदीसह विविध देणी दरमहा द्यावी लागतात. त्यामुळे थकबाकी वसूल करण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम तीव्र करण्यात आली असून थकीत वीजबिलांचा ताबडतोब भरणा करावा, आहे. घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांकडे ४० कोटी ९ लाख रुपयांची थकबाकी आहे. गेल्या २४ दिवसांमध्ये १० हजार १७७ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तर पिंपरी-चिंचवड शहरात घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे १८ कोटी ४० लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यातील ७ हजार ७९६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

# ‘डबल डेकर’ उड्डाणपूल..!

### विद्यापीठ चौकातील कोंडी लवकर फुटणार; काम ८० टक्के पूर्ण

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे, त्याचा त्रास स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे सर्वात मोठी वाहतूक कोंडी सिंहगड रस्ता आणि विद्यापीठ रस्त्यावर होत आहे. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे ‘नको रे बाबा’असे म्हणण्याची वेळ वाहनचालकांवर आली होती, त्याची गंभीर दखल घेऊन राज्य शासन आणि महापालिका प्रशासनाने या दोन्ही रस्त्यावर उड्डाणपूलाची उभारणी केली आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे; त्यातूनच ते मोकळा श्वास घेऊ शकणार आहेत.

> औंधपासून गणेशखिंड रोडला जोडणारे काम पूर्ण होत आहे. हे काम आम्ही एप्रिलअखेरपर्यंत पूर्ण करून मे २०२५ मध्ये हा मार्ग खुला करणार आहे. मात्र, पाषाण, बाणेर दिशेला उतरणाऱ्या आणि चढणाऱ्या रॅम्पची कामे बाकी आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे पाच महिने लागतील. तोपर्यंत आम्ही एक मार्ग सुरू करण्याचे नियोजन मेअखेरपर्यंत केले आहे.
>
> **-रिनाज पठाण,** मुख्य अभियंता, पीएमआरडीए

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या शहरातील सर्वाधिक वाहतूक कोंडीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक सतत चर्चेत आहे. वाहतूक पोलिसांसह संबंधित यंत्रणा येथील कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. यामुळेच प्रशासनाकडून विद्यापीठ चौकात नवा दुमजली म्हणजेच डबल डेकर उड्डाणपूल तयार करण्यात येत आहे. आता येथील पूल बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, मे २०२५ अखेरपर्यंत वाहने येथून धावतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील डबल डेकर उड्डाणपुलाचे काम आता ८० टक्के झाले असून, पुढील दोन महिन्यांत म्हणजेच मे २०२५ अखेरपर्यंत हा पूल वाहनचालकांसाठी खुला करण्यात येणार आहे. म्हणजेच, येत्या पावसाळ्या- पूर्वीच पुणेकरांची वाहने या डबल डेकर उड्डाणपुलावरून धावणार असून, येथील चौकातील वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळणार आहे.

उड्डाणपुलाच्या आणि मेट्रोच्या कामामुळे होणाऱ्या कोंडीने पुणेकर वाहनचालक गेल्या काही वर्षांपासून त्रस्त आहेत. या कोंडीतून कधी सुटका होणार? असा प्रश्न त्यांना पडला आहे. या विषयावर बोलताना अधिकारी म्हणाले कि येथील दुमजली उड्डाणपुलाचे काम मे २०२५ अखेरपर्यंत म्हणजेच पावसाळ्यापूर्वीच पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे अखेर या चौकासह परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची अवघ्या दोन महिन्यांनंतर सुटका होणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

विद्यापीठ चौकातील अगोदरचा पूल पुणेकरांसाठी अपुरा पडत होता. त्यामुळे तो पाडून नवा पूल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. पीएमआरडीए प्रशासनाकडून हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोसह विद्यापीठ चौकातील दुमजली

- ५५ मीटर लांब स्टील गर्डर बसविणार
- उड्डाणपुलाची एकूण लांबी : १.७ किमी
- औंध व बाणेरकडून शिवाजीनगरकडे जाण्यासाठी प्रत्येकी 2 लेन अप रॅम्पसह उड्डाणपूल.
- शिवाजीनगरकडून बाणेर व पाषाणकडे जाण्यासाठी ३ लेन उड्डाणपूल व पुढे प्रत्येकी २ लेन डाऊन रॅम्प असणार आहेत.
- औंध, बाणेर व पाषाणकडून सेनापती बापट रोडला जाण्यासाठी
- गणेशखिंड रस्त्यावरून जाण्याची व्यवस्था असणार आहे.
- मुख्य विद्यापीठ चौकामध्ये उड्डाणपूल खांबाचा वाहतुकीस अडथळा होऊ नये म्हणून या ठिकाणी ५५ मी. लांबीचा स्टील गर्डर स्पॅन बसविणार

उड्डाणपूल उभारण्याचे काम मे २०२० नंतर हाती घेण्यात आले. हे काम मे २०२५अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे प्रशासनाने नियोजन आहे.

शिवाजीनगरकडून औंधकडे जाण्यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, पुणे ते राजभवनपर्यंत अंडरपास (2 लेन) (680 मी लांब) असणार आहे. त्याचा फायदा येथील नागरिकांना होईल. सेनापती बापट रोडवरून बाणेर व पाषाणकडे जाण्यासाठी उड्डाणपुलास लेन रॅम्पद्वारे कनेक्शन असणार आहे.

## सिंहगड रस्ता आता ‘सुस्साट’

### महिन्यात वाहतूक कोंडीतून होणार सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते धायरीच्या दिशेने जाणाऱ्या सुमारे २१०० मिटर लांबीच्या उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. रंगरंगोटी आणि दिशा दर्शक फलक बसविण्याचे काम सुरु आहे. हे काम एक महीन्यात पुर्ण होईल, त्यानंतर तो वाहतुकीसाठी खुला केला जाईल. यामुळे या रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

शहरातील सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी पुणे महापालिकेने सिंहगड रस्त्यावरील राजाराम पुलापासून फनटाइम थिएटरपर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू केले आहे. या उड्डाणपुलाचे काम २१ सप्टेंबर २०२१ रोजी सुरू करण्यात आले आहे. हा उड्डाणपूल डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य होते. परंतु, उड्डाणपुलाचे काम महापालिका प्रशासनाकडून अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने केले जात आहे. या उड्डाणपुलाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. राजाराम पुलाजवळ बांधलेल्या या उड्डाणपुलाच्या भागाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले होते.

सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेकडून ११८ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राजाराम पूल चौकातील सुमारे ६५० मिटर लांबीचा उड्डाणपूल स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांसाठी खुला केला. त्यानंतर आता या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा आणि सर्वात लांब असलेला उड्डाणपूल उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. विठ्ठलवाडी येथील कमानीपासून सुरु होणारा हा उड्डाणपूल वडगाव येथे फनटाइम थिएटरच्या समोर उतरतो. या उड्डाणपुलाची लांबी २१०० मिटर इतकी आहे. पुढील काही दिवसात पथदिवे लावणे, रस्त्यावर पट्टे मारणे, दिशादर्शक व माहिती दर्शक फलक लावणे अशी कामे केली जाणार आहे. ही काम मार्च महिन्याच्या अखेरीस पूर्ण होतील. तर माणिकबाग ते हिंगणे या धायरी ते स्वारगेट या दिशेने जाणाऱ्या उड्डाणपुलाचे काम मे महिन्याच्या अखेरीस पूर्ण होणार होईल. आगामी काळात होणारी महापालिकेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून या उड्डाणपुलाच्या कामाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असल्याचे चर्चा आहे.

> या उड्डाणपुलाचे उद्घाटन एप्रिल किंवा मे मध्ये होऊ शकते. यापुलाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, पथदिवे लावणे, रंगरंगोटी करणे आणि दिशा दर्शक फलक बसविण्याचे काम सुरु आहे. .
>
> **— युवराज देशमुख,** पथ विभाग प्रमुख, पुणे मनपा

## सायकल रॅलीतून काचबिंदूबाबत जागृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जागतिक काचबिंदू सप्ताहाचे औचित्य साधून पुण्यातील मुलानीज् आय केअर सेंटरच्या वतीने काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन केले होते. होप फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरच्या अध्यक्ष अरुणा कटारा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम, ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. अशोक मुलानी यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून रॅलीला सुरुवात झाली.

सेंटरच्या प्रमुख आणि नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. समिता मूलानी-कटारा यांच्या नेतृत्वात ही सायकल रॅली एमजी रस्ता, कॅम्प, आंबेडकर पुतळा, पूना लेडीज क्लब, पुलगेट आदी भागात काढण्यात आली. मुलानीज् आय केअर सेंटरचे डॉक्टर्स, कर्मचारी, स्वयंसेवक, विद्यार्थी या सायकल रॅलीमध्ये सहभागी झाले होते. जवळपास ९० सायकलस्वारांनी काचबिंदूबाबत जागृतीपर घोषणा देत, पॅम्प्लेट वाटत नियमित डोळ्यांची तपासणी करण्याचे आवाहन केले.

डॉ. समिता मुलानी म्हणाल्या, "यंदा ९ ते १५ मार्च २०२५ या कालावधीत जागतिक काचबिंदू सप्ताह राबविण्यात आला. काचबिंदू तपासणी आणि जनजागृती करण्यासाठी मुलानीज् आय केअर सेंटरच्या वतीने दरवर्षी ही सायकल रॅली काढण्यात येते. काचबिंदूमुळे अनेक लोकांना अंधत्व आले आहे. भारतात कोट्यवधी लोक काचबिंदूने ग्रासलेले आहेत.



**पुणे** जागतिक काचबिंदू सप्ताहाचे औचित्य साधून पुण्यातील मुलानीज् आय केअर सेंटरच्या वतीने काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन केले होते. होप फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरच्या अध्यक्ष अरुणा कटारा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम, ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. अशोक मुलानी यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून रॅलीला सुरुवात झाली.

# सेवानिवृत्तीनिमित्त शशिकांत जाधव यांची ग्रंथतुला व ग्रंथ प्रकाशन सोहळा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक शशिकांत बाळासाहेब जाधव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त विद्यालयातर्फे व माजी विद्यार्थ्यांतर्फे ग्रंथ प्रकाशन तसेच ग्रंथ तुला करून गौरव समितीतर्फे सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते शशिकांत जाधव यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव करण्यात आला.

विश्वकर्मा पब्लिकेशनचे संपादक संदीप तापकीर , शिक्षण तज्ञ डॉ.लता पाडेकर, इतिहास संशोधक दत्ताजी नलावडे, पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रवीण शिंदे, काळभैरवनाथ पतसंस्थेचे संस्थापक रघुनाथ यादव, जेष्ठ पत्रकार संदीप वाडेकर यांनी शशिकांत जाधव यांना विशेष मानपत्र देऊन सन्मानित केले.प्राचार्य पांडुरंग फापाळे यांनी विद्यालयाचे वतीने सन्मानपत्र व संपूर्ण पोषाख देऊन गौरव केला. प्रास्ताविक प्राचार्य पांडुरंग फापाळे यांनी केले तर निवेदन भगवान मदने,नूतन ओतुरकर व आभार विजय सुरवसे यांनी मानले.डॉ. कीर्ती जाधव,संजय पासलकर,सुजाता भोसले,डॉ.अश्विनी जावळकर,उदय बेलुसे,आदम शेख,गौरी कदम यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य पांडुरंग फापाळे, ज्योत्स्ना गुरव,भगवान मदने,भीमराव आदलिंग,विपुल व्हावळ,सोमनाथ जाधव ,विजय सुरवसे,नूतन ओतुरकर,भिमाजी हिंगे,सारिका तापकीर,सुजाता भोसले,अपर्णा आढाव,नीलम सुरवसे,मीरा कदम,संजय थोरवे,तानाजी मुकणे,रमेश कोळी,मानसी मोरे,शीतल सुकाळे,उज्ज्वला शिंदे रायबा,रमेश जावळकर,प्रकाश राखडे,संतोष पंडीत,रुपाली जावळकर,माजी विद्यार्थी नटवर जावळकर,शरद जावळकर,अमित थोपटे,उदय बेलुसे,अंकुश इंगुळकर,केतन जावळकर,निशांत शिळीमकर,योगेश जावळकर,सोमनाथ यादव,निलेश जाधव,महेंद्र पोळेकर,संतोष तोडकर,निलेश रणदिवे यांनी सहकार्य केले.



> विद्यार्थ्यांसाठी स्वतःला समर्पित केलेल्या शिक्षकाचा अशाप्रकारे गौरव होतो आहे यासाठी ते कौतुकास पात्र आहेत, छत्रपती शिवरायांचा वारसा जोपासत व विचार आत्मसात करून येथील मुलांसाठी जाधव यांनी स्वतःला शैक्षणिक कार्यात वाहून घेतले.
>
> **— डॉ. श्रीपाल सबनीस,** माजी अध्यक्ष आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

# खेळ आणि सांस्कृतिक 'जलसा'ही...!

## विद्यार्थ्यांची 'शिष्टाई' फळाला; 'बीजे'चे वसतीगृह आता नव्या जागेत






"'नवीन वसतिगृहाची पूर्वी मैदानाची जागा निश्चित केली होती. विद्यार्थ्यांच्या विरोधानंतर याबाबत चौकशी समितीने अहवाल वैद्यकीय शिक्षण विभागाला सादर केला होता. आयुक्तांनी मैदानाची जागा बदलून वसतिगृह प्रमुखाच्या जुन्या वापरात नसलेल्या इमारतीच्या जागेवर नवीन वसतिगृह बांधायला परवानगी दिली आहे. त्याबाबत पत्र प्राप्त झाले आहे. लवकरच हे काम सूरू होईल."

**-डॉ. एकनाथ पवार,** अधिष्ठाता, 'बीजे' वैद्यकीय महाविद्यालय

> नवीन वसतिगृहाची पूर्वी मैदानाची जागा निश्चित केली होती. विद्यार्थ्यांच्या विरोधानंतर याबाबत चौकशी समितीने अहवाल वैद्यकीय शिक्षण विभागाला सादर केला होता. आयुक्तांनी मैदानाची जागा बदलून वसतिगृह प्रमुखाच्या जुन्या वापरात नसलेल्या इमारतीच्या जागेवर नवीन वसतिगृह बांधायला परवानगी दिली आहे. त्याबाबत पत्र प्राप्त झाले आहे. लवकरच हे काम सूरू होईल.

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** 'बीजे' वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुलांच्या वसतिगृहाच्या मैदानावर नवीन वसतिगृह बांधण्याचा निर्णय अखेर वैद्यकीय शिक्षण विभागाने रद्द केला आहे. वसतिगृहाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मैदानाऐवजी नवीन वसतिगृह जुन्या वसतिगृहाच्या 'ए' आणि 'इ' इमारतीच्या मोकळ्या जागेत बांधले जाणार आहे. त्यामुळे येथे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे खेळाचे व सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठीचे मैदान वाचले आहे, परिणामी हे मैदान मोकळा श्वास घेणार असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

'बीजे' वैद्यकीय महाविद्यालयात 'एमबीबीएस' वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारीच मुलांचे सात ते आठ एकरांचे जुने वसतिगृह आहे. या वसतिगृहाच्या मध्यवर्ती मोकळ्या मैदानात ८०० चौरस मीटर नवीन वसतिगृह बांधण्याचा घाट वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रशासनाने व हे बांधकाम करणाऱ्या कंपनीने घातला होता. केंद्राने दिलेल्या सुमारे ४५ कोटी निधीतून हे वसतिगृह बांधण्याचे काम 'हिंदुस्थान स्टीलवर्क्स कंस्ट्रक्शन लिमिटेड' (एचएससीएल) या कंपनीला दिले आहे. त्यांनी मैदानातील माती परीक्षणलाही सुरवात केली होती. याबाबत येथील विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या.

मैदानावरील जागेवर हे वसतिगृह बांधायला येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांचा विरोध होता; त्याची दखल अखेर वैद्यकीय शिक्षण विभागाने घेत जागा बदलली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांनी याच खात्याचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. समितीने चौकशी करून अहवाल सादर केला व त्यानंतर आयुक्त निवतकर यांनी ही जागा बदलण्यास मंजुरी दिली आहे.

## गाडेच्या डीएनए चाचणी अहवाल प्रतिक्षेत पोलीस

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात प्रवासी तरुणीवर बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याच्याविरुद्ध लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. गाडे याची डीएनए चाचणी करण्यात आली असून, चाचणीचा अहवाल पोलिसांना अद्याप उपलब्ध झाला नाही. स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात २५ फेब्रुवारी रोजी आरोपी गाडेने प्रवासी तरुणीवर बलात्कार केला होता. त्यानंतर गाडे पसार झाला.

गाडे मूळचा शिरूर तालुक्यातील गुनाट गावचा आहे. पसार झाल्यानंतर गाडे गुनाट गावातील ऊसाच्या फडात लपून बसला होता. तीन दिवसांनी गाडेला तेथून अटक करण्यात आली. बलात्काराच्या घटनेला आज मंगळवार एक महिना पूर्ण होत आहे. गाडेविरुद्ध लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येत आहे. 'गाडे याची डीएनए चाचणी करण्यात आली. न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडून अद्याप डीएनए चाचणीचा अहवाला मिळालेला नाही,' अशी माहिती गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी दिली.



## पुणेकरांनी अनुभवला 'सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया'

**पुणे :** : भारतातील पहिला व एकमेव व्यावसायिक ऑर्केस्ट्रा अशी ओळख असलेला 'सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया' (एसओआय) आणि सुप्रसिद्ध नर्तक पी प्रवीण कुमार यांच्या 'नृत्योल्हास' या कार्यक्रमाने पुणेकरांना पाश्चिमात्य आणि पारंपारिक संगीताची अनुभूती दिली. निमित्त होते मुंबईतील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'एनसीपीए अॅट दि पार्क' या उपक्रमाचे. नगर रस्त्यावरील फिनिक्स मार्केटसिटीमधील लिबर्टी स्क्वेअर येथे नुकतेच या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये प्रस्तुत झालेल्या अतिशय मनमोहक आणि थरारक कलाकृतींनी रसिक प्रेक्षकांना मोहिनी घातली.

'सिंफनी ऑर्केस्ट्रा ऑफ इंडिया' च्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यांनी एकापेक्षा एक अशा अविस्मरणीय कलाकृती सादर केल्या. यावेळी कलाकारांनी सादर केलेल्या लोकप्रिय हिंदी गाण्यांमुळे रसिकांना संगीताची अद्भुत पर्वणी अनुभवयास मिळाली. त्यानंतर हिंदी आणि पाश्यात्य संगीताचा सुरेख मिलाफ असलेली गाणी सादर झाली ज्याला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले आणि टाळ्यांचा कडकडात कलाकारांची प्रशंसा झाली.

## 'राम नदीसेवक सन्मान' डॉ. वडगबाळकर यांना जाहीर

**पुणे :** राम नदीशी नाते निर्माण व्हावे, तिच्या जैवविविधतेचा अभ्यास व्हावा, तिची स्वच्छता राखण्यासाठी तरुण पिढी प्रेरीत व्हावी सुरू करण्यात आलेल्या 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त पाचवा ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सव' दिनांक २४, २५ आणि २६ मार्च दरम्यान सुरू झाला आहे.



हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य असून किर्लोस्कर वसुंधराच्या 'Kirloskar Vasundhara' या फेसबुक पेजवरून प्रक्षेपित करण्यात येत आहे. या पाचव्या ऑनलाईन राम नदी महोत्सवाचा समारोप बुधवार दिनांक २६ मार्च रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० दरम्यान होणार आहे. या समारंभात डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. या प्रसंगी वसुंधरा महोत्सवाचे अध्यक्ष आर. आर. देशपांडे, फॅसिलिटेटर आनंद चितळे आणि किर्लोस्कर वसुंधराचे क्युरेटर डॉ. गुरुदास नूलकर उपस्थित राहणार आहेत.

## 'डी टू सी' व्यवसाय शिबीर

**पुणे :** डायरेक्ट टु कंझ्युमर (D2C) या सी-फूड अर्थात समुद्री अन्न या क्षेत्राशी निगडित ई-कॉमर्स व्यवसाय संकल्पनेबाबतची तीन तासांची विनामूल्य कार्यशाळा २९ मार्चला होणार आहे. सी-फूड संदर्भात व्यवसाय करण्याच्या विचारात असणाऱ्यांसाठी कार्यशाळा उपयुक्त आहे. कार्यशाळेत 'डी टू सी' व्यवसाय संकल्पना, व्यावसायिक स्पर्धक कमी असलेला हा व्यवसाय काय आहे, किमान अडीच ते तीन लाख रुपये भांडवली गुंतवणुकीतून महिना किमान १५ ते २० लाख उत्पन्न कसे मिळवायचे, हा व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांना प्रोजेक्टेड एलएलपी फर्ममध्ये पार्टनर कसे होता येईल, याबाबत माहिती दिली जाणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी आगाऊ नावनोंदणी आवश्यक आहे.

## सीएसआर प्रशिक्षण शिबीर शनिवारपासून

**पुणे :** एनजीओ व सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक गरज मोठ्या प्रमाणात असते. कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीमधून त्यांना ही गरज भागवता येते. मात्र हा निधी कसा मिळवावा, यासाठीचे नियम व कायदे काय आहेत, संस्थेचा अहवाल कसा सादर करावा याची बहुतेकांना माहिती नसते. या पार्श्वभूमीवरील सीएसआर ट्रेनिंग २९ व ३० मार्चला आयोजिले आहे. यामध्ये सीएसआर नेमके काय आहे आणि काय नाही, सीएसआर कायदा, अंमलबजावणी संस्थांची भूमिका, रिपोर्टींग फ्रेमवर्क, अंमलबजावणी करण्यापूर्वी, दरम्यान आणि नंतरची प्रक्रिया, सरकारच्या अपेक्षा, भूमिका आणि जबाबदाऱ्या, सीएसआर निधीसाठी कागदपत्रे व प्रक्रिया आदी बाबींवर मार्गदर्शन होणार आहे. हे प्रशिक्षण समाजसेवी संस्था, फाउंडेशन्स, सीएसआर क्षेत्रात कार्यरत कंपन्यांचे अधिकारी तसेच विद्यार्थी यांना उपयुक्त आहे. डॉ. अनिल धनेश्वर हे कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शन करतील.

## ई-कॉमर्सद्वारे उत्पादनांची विक्री

**पुणे :** ई-कॉमर्सद्वारे कृषी उत्पादनांची विक्री या संदर्भात मार्गदर्शन करणारी ऑनलाइन कार्यशाळा ५ एप्रिलला आयोजिली आहे. कार्यशाळेचे उद्दिष्ट शेतकरी, एफपीओ आणि कृषी उद्योजकांना डिजिटल साधनांचे प्रशिक्षण देऊन, त्यांना कृषी उत्पादने ऑनलाइन विक्रीसाठी सक्षम करणे आणि सोशल मीडियाच्या मदतीने मजबूत बाजारपेठ निर्माण करणे आहे. कार्यशाळेत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची ओळख, ऑनलाइन कृषी स्टोअर सुरू करणे आणि डिजिटल पेमेंट प्रणाली समजून घेणे, सोशल मीडियाच्या मदतीने उत्पादनांचे प्रमोशन कसे करावे, ग्राहकांचे लक्ष कसे वेधावे, जाहिरातींचे नियोजन, ग्राहकांशी थेट संपर्क साधून विक्री वाढवण्याचे मार्ग, खते, बियाणे इ. तसेच कृषी व अन्न प्रक्रिया उत्पादनांची विक्री आणि बाजार विस्तार यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन होणार आहे.

# 'अभय'ला 'कात्रजचा घाट'...!

### मिळकतकर भरा अन्यथा दंडात्मक कारवाई; महापालिकेचा इशारा

कोट्यावधी रूपयांचा पसारा असलेल्या महापालिका प्रशासनाचा खर्चाचा आणि उत्पन्नाचा ताळमेळ चांगलाच बिघडला असून ही घडी आता विस्कटत चालली आहे; त्यामुळे हा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे मिळकतकरच्या माध्यमातूनही जेमतेम उत्पन्न मिळत आहे, त्यातच 'अभय' योजना लागू होइल या आशेवर मिळकतधारक अवलंबून आहेत. त्यातूनच उत्पन्नाचा हा घाटा अधिकच बळकट होत आहे. परिणामी प्रशासन हतबल झाले आहे, त्यासाठी प्रशासनाने आता थेट या योजनेलाच 'कात्रजचा घाट' दाखविला असून कोणत्याही परिस्थितीत ही योजना लागू होणार नाही असे स्पष्ट संकेत दिले आहेत.




"'मिळकत कर विभागाकडे जमा होणाऱ्या कराचा आढावा दैनंदिन स्वरुपात घेतला जात आहे. कर वसुली करण्यावर भर दिला जात असुन, मिळकत कर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या साप्ताहीक सुट्टया देखील रद्द केल्या आहेत."

**-पृथ्वीराज बी. पी.** अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** थकबाकीदारांनी अभय योजना लागू होईल याची वाट पाहू नये. मिळकत कर भरून टाकावा, अन्यथा दंडात्मक कारवाई होईल, असा इशाराच महापालिका प्रशासनाने दिला आहे. अभय योजना लागु होणार नाही असे प्रशासनाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये मिळकत करातून दोन हजार ७०० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित धरले आहे. महापालिकेत ३४ गावांचा समावेश झाल्यामुळे आणि दरवर्षी टप्प्याटप्प्याने वाढत जाणाऱ्या कर रचनेमुळे आयुक्तांनी उत्पन्नाचा अंदाज वर्तविला होता. परंतु आर्थिक वर्ष संपायला जेमतेम एक आठवडा शिल्लक असताना आतापर्यंत दोन हजार कोटींपर्यंत उत्पन्न मिळाले आहे. समाविष्ट गावांतील थकबाकीदारांवर कारवाई करू नये, असे आदेश राज्य शासनाने दिल्यामुळेच उत्पन्न कमी झाल्याचा दावा मिळकत कर विभागाने केला आहे.



गावे वगळता उर्वरित जुन्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर थकबाकीदार आहेत. थकबाकीदारांच्या मिळकतींसमोर बँडपथक लावून वसुली थंडावली असून मागील वर्षीच्या तुलनेत थकबाकी असलेल्या मिळकती सील करण्याचे प्रमाणही थंडावले आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत बुधवारपर्यंत दोन हजार १८० कोटीचा मिळकत कर जमा झाला आहे.

दरम्यान, महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली महापालिका प्रशासनाने लाडक्या थकबाकीदारांसाठी अभय योजना राबविण्याच्या हालचाली सुरू केल्याचे बोलले जात होते. याबाबत प्रसार माध्यमांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर अभय योजना राबवण्यास अनेक व्यक्तींनी व सामाजिक संघटनांनी विरोध केला होता. मागील वेळी राबविण्यात आलेल्या अभय योजनेचा ज्यांनी फायदा घेतला, त्यांनीच पुन्हा मिळकत कर थकविल्याचा दावाही स्वंयसेवी संस्थाकडून केला जात आहे. तर दुसरीकडे काही राजकीय मंडळींनी फ्लेक्स लावून अभय योजनेच्या नावाखाली स्वतःची जाहीरात केल्याचे काही प्रकार समोर आले. या सर्व प्रकारामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निमार्ण झाले आहे. अभय योजना राबविली जाणार असल्याच्या समजातून अनेकजण कर भरण्यास टाळाटाळ करत आहेत.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने थकीत मिळकत करासाठी कोणत्याही प्रकारची अभय योजना राबविली जाणार नाही, असे यापुर्वी स्पष्ट केले होते.

मिळकत कर भरण्यासाठी आता शेवटचे सहा दिवस बाकी आहे. थकबाकीदारांनी अभय योजना राबविली जाईल या भरवश्यावर राहू नये, थकबाकी त्वरीत भरावी, अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**मिळकतकर वसूली का घटली**

- मिळकतदारांना 'अभय' योजनेची आशा
- महापालिकेचा 'बॅन्ड' वाजलाच नाही
- समाविष्ट गावात वसूलीला स्थगिती
- राजकीय नेत्यांनी 'अभय' योजनेची केलेली जाहिरातबाजी
- वसूलीत वाढत असलेला राजकीय हस्तक्षेप

## 'आरटीई' प्रवेशाला आणखी मुदतवाढ

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आरटीई प्रवेशासाठी यंदा राज्यातील ८ हजार८६३ शाळांमध्ये १ लाख ९ हजार ८७जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ३ लाख ५ हजार १५२ अर्ज दाखल झाले होते. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील आरटीई प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या नियमित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची मुदत संपुष्टात आल्यानंतर प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १८ ते २४ मार्चदरम्यान पहिल्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेतला. या प्रवेश प्रक्रियेला आता मुदतवाढ देण्यात आली असून, २५ मार्च ते १ एप्रिलपर्यंत विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे १ लाख १ हजार९६७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर १० मार्चपर्यंत ६९ हजार ७४१ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पहिल्या टप्प्यातील प्रवेश १८ मार्चपासून सुरू करण्यात आले, तर २४ मार्चला प्रवेशाचा शेवटचा दिवस होता. त्यासाठी आता मुदतवाढ देण्यात आली आहे. पहिल्या प्रतीक्षा यादीत ६ हजार ५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. नियमित आणि प्रतीक्षा यादी मिळून तब्बल ७५ हजार ७९६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेत साधारण प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी साधारण चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे २४ मार्च ते १ एप्रिल ही मुदतवाढ प्रवेशासाठी अंतिम मुदतवाढ राहणार असून, २ एप्रिलनंतर दुसऱ्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी संधी दिली जाणार असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रिक्त जागांनुसारच एसएमएस पाठवण्यात येईल. परंतु, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई संकेतस्थळावरील अर्जाची स्थिती पाहणे आवश्यक आहे.

पालकांनी प्रवेश मिळालेल्या पत्राची प्रत आणि आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून ऑनलाइन प्रवेश निश्चित करावा.

## दांडेकर पूलावर जलवाहिनी फुटली; लाखो लिटर पाणी वाया

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सदाशिव पेठ शिवाजीनगर भागामध्ये पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी १२०० मिमी व्यासाची दांडेकर पूल येथे फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले. रात्रीच्या वेळी ही जलवाहिनी फुटल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दोन दिवसात पुन्हा एकदा जलवाहिनी फुटली आहे.

पर्वती जलकेंद्रातून सदाशिव पेठ, शिवाजीनगर भागातील डेक्कन, आपटे रस्ता, गोखले रस्ता, जंगली महाराज रस्ता, मॉडेल कॉलनी आदी भागाला १२०० मिमी व्यासाच्या जलवाहिनीतून पाणी पुरवठा होतो. दांडेकर पुलावरून स्वारगेट कडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री साडेनऊच्या सुमारास ही जलवाहिनी फुटल्याने अचानक रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहण्यास सुरूवात झाली. पाण्याच्या प्रवाहामुळे रस्ता उखडला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. हे वेगाने वाहनारे पाणी वस्तीमध्ये घुसल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. दोन दिवसापूर्वीच याच भागात दुसरी एक जलवाहिनी फुटली होती. त्याचे दुरुस्तीचे काम सुरू असतानाच आता ही जलवाहिनी फुटली आहे. जलवाहिनी फुटल्याची माहिती मिळताच पर्वती जलकेंद्रातून पाणी बंद करण्यात आले.




**पुणे** सदाशिव पेठ शिवाजीनगर भागामध्ये पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी १२०० मिमी व्यासाची दांडेकर पूल येथे फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले. रात्रीच्या वेळी ही जलवाहिनी फुटल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टचे आत्मनिर्भर भारत निर्मितीकडे पाऊल



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** केवळ शालेय व महाविद्यालयीन शिक्षण आणि संस्कारवर्ग एवढयावरच न थांबता श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे कौशल्य विकास अंतर्गत विविध प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत १७१ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम नुकताच पार पडला. यामुळे ट्रस्ततर्फे आत्मनिर्भर भारत निर्मितीकडे एक पाऊल टाकण्यास सुरुवात केली आहे.

नवीन मराठी शाळेत झालेल्या कार्यक्रमाला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, विजय भालेराव, शेप अॅकॅडमीचे संचालक गणेश पाटील, प्राणंद कुलकर्णी, मंगेश सूर्यवंशी, पराग वाम्बुरे, राजाभाऊ पायमोडे आदी उपस्थित होते. शेप अॅकॅडमीच्या माध्यमातून विविध प्रकारचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्यामध्ये फॅशन डिझायनिंग मध्ये २२, ब्युटी थेरपीस्ट मध्ये ३४, डिजिटल मार्केटिंग ३८, ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन अँड अकाउंटिंग ७७ असे एकूण १७१ विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यामध्ये १०२ मुली आणि ६९ मुलांनी सहभाग घेतला.

विद्यार्थी मानस गरगटे म्हणाला, ट्रस्टकडून मिळालेल्या माहितीतून या कोर्सेसविषयी आम्हाला समजले. आज नोकरी करीत असताना या प्रशिक्षणांचा आम्हाला फायदा होत आहे. नेहमीच्या शिक्षणासोबत ही कौशल्ये देखील महत्वाची असून प्रत्येकाने असे कोर्स करणे गरजेचे असल्याचे त्याने सांगितले.

"विद्यार्थ्यांना रोजगारापर्यंत नेतील, असे कोर्सेस शेप अॅकॅडमीसोबत सुरु आहेत. विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास व्हावा, हा यामागील उद्देश आहे. हे सर्व प्रमाणपत्र कोर्सेस असून सौंदर्य थेरपी, आयटी निगडीत प्रशिक्षणाचा समावेश आहे. दगडूशेठ गणपती ट्रस्टचे सध्या २५ हून अधिक शैक्षणिक उपक्रम सुरु आहेत. तरी युवक-युवतींनी याचा लाभ घ्यावा.

— महेश सूर्यवंशी; अध्यक्ष श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट

# महापालिकेच्या जुन्या गाड्यांचा होणार लिलाव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातील जुनी वाहने भंगारात काढण्यासाठी सरकारने नुकतेच नवीन 'वाहन स्क्रॅप धोरण' लागू झाले आहे. या धोरणानुसार १५ वर्षे पेक्षा जून्या गाड्यांची पूर्ननोंदणी आरटीओ कार्यालयाने नोंदणी बंद केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या मालकीच्या ४७३ गाड्यांचा लिलाव करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे. त्यानुसार हा लिलाव होणार असून पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संस्थेने गाड्यांचा लिलाव केला जाणार आहे, अशी माहीती अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

केंद्र सरकाच्या वाहन स्क्रॅप धोरणानुसार महापालिकेच्या १५ वर्षे पेक्षा जून्या गाड्यांची नोंदणी आरटीओने रद्द केल्या आहेत. हे धोरण लागू होण्यापूर्वी महापालिकेकडून २४ ते २५ वर्षापर्यंत गाड्या वापरात आणल्या जात होत्या. त्यामुळे वाहने रस्त्यात बंद पडणे, गाड्यांचा पार्ट तुटणे असे प्रकार घडत होते. नवीन गाड्या घेण्यासाठी केली जाणारी दिरंगाई यामुळे महापालिकेच्या मोटार वाहन विभागाला या गाड्या दुरुस्त करुन वापरण्याची वेळ येत होती. परंतु आता केंद्राच्या धोरणानुसार महापालिकेच्या विविध विभागातील एकूण ४७३ गाड्यांचा लिलाव महापालिकेच्या नेमलेल्या समितीने निर्णय घेतला आहे.

जी वाहने केंद्र किंवा राज्य सरकारच्या चलनातून बाहेर काढली जातील किंवा जी अतिरिक्त आहेत किंवा दुरुस्त केली जाऊ शकत नाहीत, ती नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीकडे स्क्रॅपिंगसाठी पाठवली जातील. या व्यतिरिक्त, कोणत्याही वाहनांचा लिलाव, जप्त किंवा हक्क नसलेली वाहने नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग फॅसिलिटीवर वाहनांना स्क्रॅप केले जाईल याचे नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार महापालिकेची ४७३ वाहनांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. अशी माहिती मोटार वाहन विभागाचे प्रमुख जयंत भोसेकर यांनी सांगितले.

स्क्रॅप झालेल्या वाहनांची किंमत महापालिकेच्या समितीने तसेच राज्य सरकारने नेमण्यात आलेल्या यंत्रणेकडून किंमत निश्चित करण्यात आली आहे. ही किंमत गोपनीय असल्यामुळे या गाड्यांची किंमत सध्या जाहीर करता येणार नाही, असे भोसेकर यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने ४ चे ५ एजन्सी नेमल्या आहेत. एजन्सींच्या माध्यमातून गाड्यांची खरेदी केली जाणार आहे. या एजन्सींकडून बोली लावण्यात येईल, समितीने आणि राज्य सरकारच्या यंत्रणेने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा जी किंमत अधिक मिळेल, त्या किंमतीला या गाड्यांची विक्री केली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

● महापालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या कोठी, डेपो आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जुनी वाहने, लोखंडी बॅरीकेटस, जप्त केलेले लोखंडी स्टॉल, हातगाड्या आदी स्वरुपाचे भंगार मोठ्या प्रमाणावर पडलेले आहे. यासंदर्भात अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. म्हणाले, विद्युत विभागाशी संबंधित भंगाराची माहीती घेतली जात आहे. याचा लिलाव केला जाणार आहे. भंगारामुळे महापालिकेची जागा वापरात येत नाही, भंगारामुळे पावसाचे पाणी साठते, त्यामुळे डासांचा प्रार्दुभाव होतो, त्यासाठी पुढील काळात या प्रकारची उपाय योजना केली जाईल.



## जुन्या इमारतींचा पुनर्विकास कार्यशाळेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली' (यूडीसीपीआर) नियमामुळे महाराष्ट्रात मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जुन्या इमारतींचा पुनर्विकास (री-डेव्हलपमेंट) सुरु आहे किंवा होणार आहे. हा यूडीसीपीआर नियम काय आहे? त्यामुळे एफएसआय कसा व किती वाढला? त्याचा वापर कसा करायचा? फिसिबिलीटी रिपोर्ट कशासाठी काढतात? पीएमसी म्हणजे काय? आदींबाबत मार्गदर्शन करणारी कार्यशाळा ६ एप्रिलला आयोजिली आहे. यामध्ये इमारतींचा पुनर्विकास करण्याची पद्धत, त्यासाठीचे पेपर्स, विकसक कसा निवडावा, जुन्या सभासदांना होणारे फायदे, करारनामा कसा करावा, महारेरा रजिस्ट्रेशन आदी सर्व मुद्यांचे मार्गदर्शन होणार आहे. सोसायटी स्वयंपुनर्विकास करू इच्छिणारे, नवीन विकसक, ज्यांना रीडेव्हलपमेंट क्षेत्रात रस आहे असे रिअल इस्टेट एजंट यांच्यासाठी कार्यशाळा उपयुक्त आहे.



## थकित पगार न दिल्यास आंदोलनाचा इशारा

**खडकवासला :** पुणे जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी सफाई कर्मचारी आणि वाहन चालक यांचे मागील दहा महिन्यांचे पगार थकीत आहेत. त्यामुळे त्यांचे हाल होत आहेत. शैक्षणिक वर्ष संपत आले तरी काहींच्या मुलांची शाळेची फी त्यांना भरता आली नाही, तर काहींना कर्ज काढून भरावी लागली. सर्व सामान्य कटुंबातील हे लोक आहेत. त्यांना रोजचा खर्च भागवने मुश्किल झाले आहे. अनेक वेळा अर्ज आणि विनंती करून देखील पगार मिळत नाही म्हणून हे कर्मचारी हतबल झाले आहेत. शिवसेना खडकवासला विधानसभा प्रमुख नितीन वाघ यांचे निदर्शनास हि बाब आली असता, त्यांनी पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे कि या लोकांचे पगार तातडीने जमा करण्याचे आदेश संबंधित खात्याला द्यावेत. तसेच आशा सेविका यांचे देखील मागील तीन महिन्यांचे अनुदान थकीत आहे, ते देखील द्यावे अन्यथा शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा नितीन वाघ, अरुण घोगरे, अभिजित तावरे, रामदास गायकवाड, भरत गोगावले, पप्पू गायकवाड, पुंडलिक पवार यांनी दिला आहे.



## उबर ऑटोचे दर आता इतर ऑटोसारखेच

**पुणे :** पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील उबर ऑटो चालकांना एक एप्रिलपासून मीटर प्रमाणेच दर आकारावे लागणार आहेत. १८ फेब्रुवारी रोजी उबरने आपल्या नियमात बदल करत शेकडो ऑटो चालकासोबत करार केला. त्यामुळे एक एप्रिलपासून पुणे आणि पिंपरची चिंचवड परिसरात उबर ऑटो चालक आता इतर ऑटोसारखे मीटरप्रमाणेच दर आकारतील. एक एप्रिलपासून पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील उबर रिक्षाचालक मीटर प्रमाणेच दर आकारणार आहेत. कंपनी अ‍ॅग्रीगेटर मॉडेलचा वापर न करता मॉडेलचा वापर केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. उबरने रिक्षाचालकांबरोबर १८ फेब्रुवारी रोजी नवीन करार केला आहे, त्याची १ एप्रिलपासून अंमलबजावणी होणार आहे. नवीन करारानुसार उबर व रिक्षा चालक यांचा एकमेकांशी असलेला कायदेशीर संबंध बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नव्या करारानुसार कंपनी रिक्षा चालकांकडून कोणतेही कमिशन घेणार नाही, परंतु कंपनीने दिलेले सॉफ्टवेअर वापरण्यासाठी ठराविक नेमून दिलेली फी (सद्य परिस्थितीमध्ये १९ रुपये) दररोज घेईल.

## हुक्का पार्लर चालविल्यास हॉटेलचा परवाना रद्द

**पुणे :** कायद्याने हुक्क्यावर बंदी घालण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही कोणी हॉटेलमध्ये अशा प्रकारे हुक्का पार्लर चालवत असल्यास संबंधितांचे हॉटेलचे परवाने रद्द करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पुणे शहरात अनेक ठिकाणी विशेषतः महाविद्यालय परिसरात हुक्का पार्लर हॉटेल मध्ये बेकायदेशीर चालवली जातात. त्या ठिकाणी हुक्काच्या नावाखाली ड्रग्स, गांजा तसेच अमली पदार्थ मुलांना दिले जातात त्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. पुण्यात अनेक ठिकाणी ही प्रकार सुरू असून अशा हुक्का पार्लरला कोरेगाव पार्क तसेच परिसरात परवानगी दिली आहे का ? असा प्रश्न कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे आमदार सुनिल कांबळे यांनी विधानसभेत उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले.

## जादा परताव्याच्या आमिषाने ४९ लाखांची फसवणूक

**पुणे :** शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी तिघांची ४९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत खराडी, वानवडी आणि वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडीतील एका ३८ वर्षीय तरुणाला समाजमाध्यमांद्वारे संपर्क साधून, गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवत ३६ लाख ५५ हजार रुपयांना गंडा घालण्यात आला. सुरुवातीला काही परतावा दिल्यानंतर चोरट्यांनी उर्वरित पैसे दिले नाहीत. फसवणूक लक्षात येताच तरुणाने खराडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत एका महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण करीत आहेत.

हडपसरमधील दुसऱ्या ३५ वर्षीय तरुणाचीही अशाच प्रकारे आठ लाख ४१ हजार रुपयांची फसवणूक झाली. या प्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सत्यजित आदमाने करीत आहेत.

तसेच, वाघोलीतील बकोरी फाटा परिसरातील एका तरुणाला मास्टर कार्ड सुरू करण्याच्या बहाण्याने ओटीपी घेऊन तीन लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत ३६ वर्षीय तरुणाने वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंडित रेजितवाड करीत आहेत.

# लाभार्थी महिलांचा खर्च पालिकेच्या माथी

## ५२ लाख रूपयांच्या खर्चास 'स्थायी'ची मंजुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील बालेवाडी येथे झालेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमासाठी लाभार्थी महिलांची ने आण करण्यासह त्यांचा चहा, पाणी, नाष्टा व भोजन यांची व्यवस्थेच्या खर्चाचे बील महापालिकेच्या माथी मारण्यात आले आहे. या व्यवस्थेसाठी एकूण १५ क्षेत्रिय कार्यालयनिहाय झालेल्या एकूण ५२ लाख ५२ हजार २४० रूपयांच्या खर्चास स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मात्र, यामध्ये १५ क्षेत्रिय कार्यालयांपैकी १४ क्षेत्रिय कार्यालयांचा एक ते दोन लाखांच्या दरम्यान खर्च दाखवला असताना औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय या एकाच क्षेत्रिय कार्यालयाचा तब्बल २७ लाख ६८ हजार २८० रूपये खर्च झाल्यामुळे यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पुण्यात १७ ऑगस्ट २०२४ रोजी शुभारंभ कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल येथे पार पडला होता. या कार्यक्रमासाठी जमलेल्या गर्दीवरून अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. या कार्यक्रमास लाभार्थी महिला गेल्या होत्या की महापालिकेच्या कंत्राटी आणि कायमस्वरूपी सफाई कामगार असलेल्या महिलांना घेऊन जाण्यात आले याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले गेले होते. मात्र, या कार्यक्रमासाठी खर्चाचे बील पालिकेवर थोपवले आहे. याबाबत विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांच्यात झालेल्या बैठकीत महापालिकेकडे या कार्यक्रमाचे आयोजन सोपविण्यात आल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या कार्यक्रमाच्या ५२ लाख ५२ हजार २४० रूपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली.



### औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय २७ लाख ६८ हजारांचा खर्च

महापालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयामार्फत बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल येथे लाभार्थी महिलांची ने आण करण्यासह त्यांचा चहा, पाणी, नाष्टा व भोजन यांची व्यवस्था ठेकेदारामार्फत करण्यात आली. १५ पैकी १४ क्षेत्रिय कार्यालयांचा खर्च १ ते २ लाखांदरम्यान आहे. मात्र, केवळ औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालयाचा तब्बल २७ लाख ६८ हजार २८० रूपये खर्च झाल्यामुळे यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, पालिकेने जास्तीच्या खर्चाला हा कार्यक्रम याच क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येत असल्याने त्यांच्याकडून कार्यक्रमाच्या ठिकाणी अधिकारी वर्ग, उपस्थित कर्मचारी, पीएमपीएमएल बसचे कर्मचारी यांना अल्पोपहार, पिण्याचे पाणी तसेच लाभार्थी महिला यांना पाण्याची व्यवस्था केल्याने औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचा खर्च जास्त दिसत असल्याचे पालिकेने प्रस्तावात नमूद केले आहे.

### निवडणुकांमुळे प्रस्तावाला उशीर

● राज्यात विधानसभा निवडणुकांचा लागू झाल्यामुळे या कार्यक्रमाच्या बीलाच्या प्रस्तावाला वेळ लागला. तसेच, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडून जानेवारी २०२५ मध्ये प्रस्ताव प्राप्त झाला. या विलंबामुळे या कार्यक्रमाच्या बीलाचा प्रस्ताव उशीरा सादर केल्याचे नमूद करण्यात आले आहे.



# बनावट कंपनी स्थापन करून फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** घन कचरा व्यवस्थापनाशी निगडीत विविध बनावट कंपन्या स्थापन करुन त्यामध्ये गुंतवणूक करायला लावले. तसेच भाडे तत्वावर वाहने घेऊ, असे सांगून लोकांना कार, दुचाकी, जे सी बी अशी वाहने खरेदी करण्यास भाग पाडले. ही वाहने भाडेतत्वावर घेऊन ती परस्पर विकून टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. जवळपास ११० लोकांची २ कोटी ६६ लाख ९५ हजार ३०२ रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी वानवडी पोलिसांनी ७ जणांवर गुन्हा दाखल केला असून एकाला अटक केली आहे.

याबाबत ज्ञानेश खंडु शिंदे (वय २४, रा. अवसरी बु ता. आंबेगाव) यांनी वानवडी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी संकेत सुधीर थोरात (वय ३०, रा. हांडेवाडी), सोनु नवनाथ हिंगे (वय २९), रिजवान फारुख मेमन (वय ४४, रा. गणेश पेठ) यांना अटक केली आहे. प्रणय उदय खरे (वय ३२), वृषाली संतोष रायसोनी (वय २४, रा. बिबवेवाडी), विजय चंद्रकांत आशर (वय ६५, रा. ईस्कॉन मंदिराजवळ, टिळेकरनगर, कोंढवा) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या परिचयाचे सोनु हिंगे यांनी त्यांना सांगितले की, तो बायो फिक्स प्रो कंपनीचा व्हेंडर आहे. कंपनी घन कचरा व्यवस्थापनाचे काम करते. कंपनीत जे सी बीची आवश्यकता आहे. तसेच कंपनी जे सी बी भाडेतत्वावर घ्यावयास इच्छुक आहे. कंपनीमध्ये जे सी बी वापरण्यास दिले नंतर भाड्यापोटी कंपनी दरमहा १ लाख ३० हजार रुपये भाडे देणार आहे. त्या व्यतिरिक्त जीएसटीही कंपनीच ७ वर्षे भरणार आहे. ही स्किम चांगली वाटल्याने त्यांनी १४ डिसेबर २०२४ रोजी ३९ लाख रुपयांना जे सी बी खरेदी केला. दुसऱ्या दिवशी तो बायोफिक्स प्रो कंपनीस भाडेतत्वावर वापरण्यास दिला. त्यांना भाडेपोटी जानेवारी २०२५ मध्ये ६० हजार रुपये देण्यात आले. त्यांना उर्वरित रक्कम देण्यात आली नाही. त्यांचे जे सी बी कोठे आहे, हे ही सांगत नव्हते. त्यांचे जे सी बी उंड्री येथील गोदामात दिसून आले. त्यांनी रिजवान मेमन यांना विचारणा केली असता त्यांनी दर्पण ठक्कर यांच्या मध्यस्थीने अनेक जेसीबी, पॉकलॅन्ड खरेदी केल्याचे सांगितले. अधिक चौकशी केल्यावर या आरोपींनी बायोपिक्स प्रो ग्लोबल मुफेडको, म्युफ्याको कंपनी व भारत इंडस्ट्रिज कंपनी यामध्ये गुंतवणूकदारांना चांगले भाडे देण्याचे आमिष दाखवून त्यांना गाड्या खरेदी करण्यास भाग पाडून भाड्यापोटी ठरलेली रक्कम न देता त्यातील काही गाड्यांचा परस्पर अपहार केला.

# आचार्य नित्यानंदसुरीश्वरजी म. सा. यांना राष्ट्रसंत पदवी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूज्य आचार्य श्री विजय नित्यानंदसुरीश्वरजी म. सा. यांना श्री गोडवाड जैन श्वेतांबर मूर्तीक पूजक संघाच्यावतीने 'राष्ट्रसंत पदवी' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर प्रथमच पुण्यात आलेले आचार्य श्री नित्यानंदसुरीश्वरजी म. सा. यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. जयराज भवन येथे आयोजित विशेष कार्यक्रमात पंजाब केसरी पू. आ. विजय वल्लभसुरीश्वरजी यांचे पट्टधर व नुकतेच भारत सरकार द्वारे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले व महाराष्ट्र सरकारचे विशेष राजकीय अतिथी शांतीदूत पू. गच्छाधीपती आ. श्री विजय नित्यानंदसूरीश्वरजी म. सा. यांना अध्यक्ष फतेचंद रांका, सचिव गणपतराज मेहता व सर्व ट्रस्ट मंडळाच्यावतीने राष्ट्रसंत ही पदवी आणि सन्मानपत्र देवून सन्मानित केले. गुरुपूजनाचे लाभार्थी फतेचंदजी रांका परिवाराला गुरुदेव श्री यांच्यावर चादर अर्पण करण्याचा मान मिळाला.

विमलचंद संघवी यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. फतेचंद रांका यांनी सांगितले, की आपल्या गुरूच्या उपकारांचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही.



**पुणे** पूज्य आचार्य विजय नित्यानंदसुरीश्वरजी म. सा. यांना गोडवाड जैन श्वेतांबर मूर्तीक पूजक संघाच्यावतीने 'राष्ट्रसंत पदवी' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर प्रथमच पुण्यात आलेले आचार्य नित्यानंदसुरीश्वरजी म. सा. यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

# कल्पक योजना राबविल्यास मराठी शाळा टिकतील : ठाकूर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठी शाळांची अवस्था आज खूप बिकट आहेत. विपरित परिस्थिती असली तरी संधी येतात, हे लक्षात ठेवावे. मराठी शाळांनी कल्पक योजना राबविल्यास मराठी शाळा टिकतील, असे मत ढोल-ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांनी व्यक्त केले.

शिवाजीनगरमधील प्रा. नाथ हरि पुरंदरे प्राथमिक विद्यालयात गणेश पेठेतील श्री पोटसुळ्या मारुती मंडळाच्या सहकार्याने परिसर अभ्यासवर्ग हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ठाकूर बोलत होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते पियूष शहा, श्रीमंत पवार घराणे सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर पवार, गणेश उत्सव मंडळाचे कार्यकर्ते सचिन पवार, स्वप्नील दळवी, श्री पोटसुळ्या मारुती मंडळाचे अध्यक्ष कुणाल पवार, शाला समिती अध्यक्ष विशाखा भुरके, मुख्याध्यापिका डॉ. लता घोलप, प्रमोद कुदळे, साधना कुदळे आदी उपस्थित होते. परिसर अभ्यास वर्गासाठी मंडळाकडून साहित्य भेट देण्यात आले आहे.

परिसर वर्गामध्ये मुलांना विविध फळे, प्राणी, पक्षी, वाहने, वाहतुकीचे नियम, इंग्रजी महिने, ऋतू, दिशा, ऋतुचक्र, तरंगचित्रे, जलचर प्राणी, भारताचा नकाशा आदी साहित्याद्वारे अभ्यास करता येणार आहे. परिसर अभ्यासवर्गाचा दर वर्षी पहिली ते चौथीतील सुमारे 350 गरीब विद्यार्थांना लाभ होणार आहे, असे कुणाल पवार यांनी प्रास्ताविकात सांगितले.

मंडळाच्या कार्याचे कौतुक करून पराग ठाकूर म्हणाले, गणेशोत्सवाच्या कार्यकर्त्यांकडे समाज निरुद्योगी म्हणून पाहतो; परंतु मंडळाचे कार्यकर्ते सुशिक्षित आहेत. अशा कार्यकर्त्यांची समाजाला गरज आहे.

नवनव्या संकल्पनांमधून विद्यार्थी घडत जातात असे सांगून महेश सूर्यवंशी म्हणाले, शिक्षकांमुळे आजचे विद्यार्थी उद्याचे उत्तम नागरिक घडू शकतात. सध्याची सामाजिक परिस्थिती बघता शाळा-शाळांमधून संस्काराची चळवळ उभी राहिली पाहिजे. भविष्यातही शाळेला सहकार्य करू अशी ग्वाही कुणाल पवार यांनी या प्रसंगी दिली. मान्यवरांचा परिचय संध्या पांढरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन दत्तात्रय पोटे यांनी केले तर आभार महावीर काळे यांनी मानले.

## तनिशा हाडोळेची जेईईमध्ये अभूतपूर्व कामगिरी



**पिंपरी :** जानेवारीत घेण्यात आलेल्या परीक्षेत एआयसीटी डिझाईन अकॅडमीची विद्यार्थिनी तनिशा हाडोळे हिने जेईई मेन B.Arch परीक्षेत 99.95 गुण मिळवून उतुंग यश उत्तीर्ण झाली आहे.

तीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल एआयसीटीचे संचालक राजेश सप्रा, संचालिका लीना सप्रा, आर्किटेक्ट अपर्णा शिंदे, शिवानी सुर्वे, रवी द्विवेदी आणि एआयसीटी डिझाईन अकादमीच्या संपूर्ण स्टाफने तिचे अभिनंदन केले. संस्थेचे संचालक राजेश सप्रा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,जेईई मेन बॅचलर ऑफ आर्किटेक्चरची दुसरी संधी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात असेल नाटा परीक्षा मार्च ते जून २०२५ दरम्यान होणार आहे. विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करून अभ्यास करावा आणि स्मार्ट स्ट्रॅटेजी वापरावी.

## बेकायदेशीर दारू विक्री प्रकरणी थेरगाव येथे पोलीसांची कारवाई

**थेरगाव :** बेकायदेशीरपणे दारू विक्री प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाने थेरगाव येथे कारवाई केली. त्यामध्ये दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि.२३) संदीपनगर येथे करण्यात आली.

रोहित नामदेव गोंदील (वय २३, रा. थेरगाव), दिगूशेठ (थेरगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार गोविंद डोके यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संदीप नगर थेरगाव येथे एक व्यक्ती बेकायदेशीरपणे दारू विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. पोलिसांनी रोहित गोंदील याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २७५० रुपये किमतीची ५५ लिटर दारू जप्त करण्यात आली. दारू विक्रीचे साहित्य दिगूशेठ नावाच्या व्यक्तीचे असून तो दारू विक्रीचा व्यवसाय करत असल्याचे रोहित याने सांगितले. काळेवाडी पोलीस तपास करीत आहेत.



## दुचाकीस्वाराकडून १० किलो गांजा जप्त

**पिंपरी :** दुचाकीस्वाराला अटक करून त्याच्याकडून पाच लाख ८८ हजार रुपये किमतीचा १० किलो १३८ ग्रॅम गांजा, दोन मोबाइल, दुचाकी जप्त केली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (दि. 20) पिंपळे सौदागर येथे ही कारवाई केली. हरिश मगन सोनवणे (२७, रा. पिंपरीगाव, मूळ रा. वरवाडे, ता. शिरपूर, जि. धुळे) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## मोशी प्राधिकरणाला सेवा रस्त्याची प्रतीक्षा

**मोशी :** श्री नागेश्वर उपबाजार समिती ते मोशी प्राधिकरणाकडे येण्यासाठी पुणे - नाशिक महामार्गालगत सेवा रस्ता नसल्याने वाहन चालकांच्या डोक्यावर नेहमी अपघाताची टांगती तलवार असते. मोशी प्राधिकरणातील विविध ठिकाणी ये-जा करण्यासाठी महामार्गावरुनच विरुद्ध दिशेने वाहने चालवावी लागत आहेत. अनेक वेळा मागणी करुनही सेवा रस्ता होत नसल्याने स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

पुणे - नाशिक महामार्गालगत पेठ क्रमांक चार, सहा, नऊ आदी पेठांध्ये पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय, एमआयडीसी पोलिस ठाण्यासह टाटा मोटर्स, जग्वार असे विविध उद्योग समूह आहेत. येथील स्थानिक नागरिकांसह या कार्यालयांत विविध कामांसाठी ये-जा करण्यासाठी सेवा रस्ता नाही. कार्यालयांत तसेच निवासस्थानी ये-जा करण्यासाठी वाहनचालकांना सुमारे एक ते दीड किलो मीटर अंतरावरील राजा शिवछत्रपती चौकात जाऊन वळसा घालूनच यावे लागते.

## पोलिस आयुक्तांचा आज नागरिकांशी थेट संवाद

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरातील नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी व्हर्चुअल टाऊन हॉल मीटिंगचे आयोजन केले आहे. हे संवाद सत्र 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या माध्यमातून बुधवारी (ता. २६) सायंकाळी ४ ते ५ या वेळेत घेण्यात येणार आहे.

या संवाद सत्रात पोलिसांसाठी उचलण्यात आलेली परिवर्तनात्मक पावले, पोलिस ठाण्यांतील पायाभूत सुविधा, सायबर युनिट आणि त्याचा परिणाम मजबूत करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे, पोलिस ठाणे आणि कार्यालयांना भेट देताना नागरिकांना चांगल्या अनुभवासाठी सुधारणा करणे आदींचा समावेश असेल. इतरही विषयांवर प्रश्न विचारता येतील. ज्यांना प्रश्न विचारायचे आहेत ते #VirtualTownHall_2 यावर पोस्ट करू शकतात. यापूर्वीही ४ सप्टेंबर २०२४ ला अशा प्रकारे व्हर्चुअल टाऊन हॉल मीटिंगचे आयोजन झाले होते.

## संमेलन



**पुणे** महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था पुणे, बचपन वर्ल्ड फोरम, पुणे आणि समाजसुधारक कै.सौ. शैलाताई रतन माळी स्मारक समिती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय सत्यशोधक बालकुमार मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी अध्यक्ष वि.दा. पिंगळे. सोबत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या वेशभुषेतील बालक आणि संस्थेचे पदाधिकारी.

## नवीन पिढीमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम निर्माण करणे ही जबाबदारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज मुलांची घरातील भाषा आणि शाळा-महाविद्यलयातील ज्ञानाची भाषा यात भिन्नता आढळते. इंग्रजी माध्यमात शिकणारे विद्यार्थी मराठी मातृभाषेपासून दूर जाताना दिसत आहेत. मातृभाषेचे महत्त्व घरातूनच सांगणे आवश्यक आहे. नवीन पिढीला मराठी भाषेवर मनस्वी प्रेम करायला शिकवावे लागेल. त्यांना मातृभाषेत विचार करू देणे आणि अभिव्यक्त होऊ देणे ही काळाची गरज आहे, असे मत प्रसिद्ध कवी, लेखक, वक्ते,शिक्षक आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्यवाह वि.दा. पिंगळे यांनी व्यक्त केले. महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था पुणे, बचपन वर्ल्ड फोरम, पुणे आणि समाजसुधारक कै.सौ. शैलाताई रतन माळी स्मारक समिती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय सत्यशोधक बालकुमार मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून वि.दा. पिंगळे बोलत होते.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या वेशभुषेतील बालक, संमेलानाचे अध्यक्ष वि.दा. पिंगळे तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

# वीज उपकेंद्र उभारणीला वेग

### तळवडे औद्योगिक व रहिवासी भागासाठी दिलासादायक



- १) तळवडे परिसरात औद्योगिक व रहिवासी भागात वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे
- २) नागरिक व लघुउद्योजक अखंडित व पुरेशा दाबाने वीज पुरवठा होण्याची मागणी पूर्ण करणेकामी कॅनबे चौक, तळवडे एमआयडीसी येथे वीज उपकेंद्र उभारणी करणे काळाची गरज होती.
- ३) प्रस्तावित नवीन उपकेंद्राचा प्रकल्प अहवाल महावितरण विभागाने तयार केलेला आहे.
- ४) कॅनबे चौक तळवडे येथील एमआयडीसीच्या ताब्यातील वाटप न केलेले भूखंड शिल्लक आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळवडे :** तळवडे औद्योगिक क्षेत्रासह परिसराचा वेगाने विकास होत आहे. तुलनेत वीज पुरवठा यंत्रणेवर ताण येत वीज पुरवठा करणेकामी मर्यादा येत आहेत. त्यामुळे तळवडे एमआयडीसी क्षेत्रातील एमआयडीसीच्या ताब्यातील (कॅनबे चौक) जागा उपलब्ध झाल्याने महावितरणाचे वीज उपकेंद्र उभारणीस वेग आला आहे. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे माजी नगरसेवक पंकज भालेकर यांनी ऑक्टोबर २०२३ रोजी मागणी केली होती त्याला यश मिळाले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम क्रमांक २२ अ कलम ४० व महाराष्ट्र जमीन (शासकीय जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील नियम ५० मधील तसेच महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक जमीन ३/२०११/प्र.क्र / ५३/अ-१ दिनांक १२/०७/२०११ च्या तरतुदीनुसार कॅनवे चौक तळवडे येथील एमआयडीसीच्या ताब्यातील भूखंडाची जागा महावितरण उपकेंद्र उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य सरकार कडून महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळास पालकमंत्री अजितदादांनी ३२०० चौरस मीटर (३४४३२ चौरस फूट) जागा वीज उभारणीसाठी उपलब्ध करून देण्याचे ऑक्टोबर २०२३ मध्ये पुण्यातील सर्किट हाऊसमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. त्यानुसार २४ मार्च २०२५ रोजी MIDC कडून महावितरण कंपनीला ऑफर लेटर प्राप्त झाले आहे.



> कॅनबे चौक, तळवडे एमआयडीसी येथील शासकीय भूखंडावर वीज उपकेंद्र उभारले जाईल, ज्यामुळे परिसरात वीज पुरवठा सुधारेल आणि विकासाच्या वेगात मदत होईल. ३२०० चौरस मीटर जागेची उपलब्धता ही भविष्यातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.
> **-पंकज भालेकर,** माजी नगरसेवक

## उल्हास नवभारत साक्षरता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरात केंद्र सरकार पुरस्कृत 'उल्हास नवभारत साक्षरता अभियाना' अंतर्गत नोंदणीकृत निरक्षर व्यक्तींसाठी रविवारी १२५ केंद्रांवर परीक्षा पार पडली. पिंपरी-चिंचवड नवभारत उल्हास साक्षरता अभियान समितीच्या अध्यक्षा तथा शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान यशस्वीरीत्या राबवण्यात आले. शहरातील नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### १५० गुणांची परीक्षा, वाचन-लेखन-संख्याज्ञानावर भर

- महापालिकेच्या १२५ शाळांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत परीक्षा घेण्यात आली. एकूण १५० गुणांच्या या परीक्षेत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या तीन विभागांसाठी प्रत्येकी ५० गुणांचा समावेश होता. निरक्षरांना साक्षर करण्याच्या उद्देशाने राबवलेल्या या अभियानाला शहरवासीयांनी भरभरून साथ दिली.

### शिक्षक आणि नागरिकांचा उत्साह –

- पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पी. एम. श्री पब्लिक स्कूल, म्हेत्रे वस्ती येथील मुख्याध्यापिका मोरे मॅडम आणि त्यांच्यासह सर्व शिक्षकांनी या परीक्षेसाठी विशेष मेहनत घेतली. परीक्षा देणारे नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. या अभियानामुळे शहरातील साक्षरतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडल्याचे मानले जात आहे.

### "साक्षरतेमुळे आयुष्यात सकारात्मक बदल"

"उल्हास नवसाक्षरता अभियानातून मिळालेली साक्षरता नवसाक्षर नागरिकांच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल घडवेल," असा विश्वास समिती सदस्य अमोल फुंदे यांनी व्यक्त केला. त्यांनी या अभियानाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत नागरिकांच्या सहभागाचे कौतुक केले.

— **अमोल फुंदे**

## कडक उन्हात थंड उसाच्या रसाची मात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे गुरव :** उन्हाचा कडाका मार्चपासूनच जाणवू लागला असून, आगामी उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले असून, उन्हाच्या झळा कमी करण्यासाठी गारवा देणाऱ्या उसाच्या रसाला मोठी मागणी वाढली आहे. या वाढत्या उन्हाचा चटक्यावर थंडाव्याची मात्रा म्हणून उसाचा रस पिण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे रसवंतीतील लगबग वाढली आहे. तसेच ऊकाड्यात उष्णता कमी करून थकवा दूर करणारे सर्वांचे आवडते पेय म्हणजे उसाचा रस. त्यामुळे पिंपळे गुरव आणि नवी सांगवी भागांतील रसवंतीगृहे ग्राहकांनी फुलून गेली आहेत. उन्हाळ्यात उष्णता कमी करण्यासाठी आणि थकवा घालवण्यासाठी नागरिक उसाच्या रसाला प्राधान्य देत आहेत.

उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे ग्राहकांची रसवंतीगृहांवर मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे. 'उसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा थकवा दूर होतो. उन्हाळ्यात अनेकजण कोल्ड्रिंक्स आणि सोड्याचे सेवन करतात, त्यापेक्षा कमी किमतीत आणि अधिक आरोग्यदायी पर्याय म्हणून उसाच्या रसाला नागरिक पसंती देत आहेत,' अशी प्रतिक्रिया यावेळी ग्राहकांनी दिली.



**पिंपळे गुरव** कोणत्याही ऋतुत उसाचा रस अत्यंत लाभकारी मानला जातो. हा रस शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत तर करतोच सोबत यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा देखील मिळते. त्यामुळे नैसर्गिक थंडावा मिळणारे हे पेय पिण्यासाठी गर्दी होत आहे.

# देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतील रस्त्यासाठी संरक्षण मंत्र्यांना साकडे




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहूरोड :** देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत येत असलेल्या संरक्षण विभागाच्या झेंडे, काळोखे, हगवणे मळा परिसरातील नागरिक रस्त्यांच्या समस्येने त्रस्त आहेत. या भागात रस्ते करण्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाने निविदा प्रसिध्द केली आहे. मात्र, संरक्षण विभागाची कामास हरकत आहे. त्यामुळे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट सरंक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन या रस्त्याबाबत साकडे घातले आहे. यावर संपूर्ण माहिती घेऊन सदन कमांडच्या अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची ग्वाही सिंह यांनी दिली.

संरक्षण विभागामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे क्षेत्रफळ बाधित झाले आहे. संरक्षण विभागाची हद्द असल्याने नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील झेंडे, काळोखे, हगवणे मळा येथील एक हजार लोकसंख्या आहे. हे स्थानिक नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. ७५ वर्षांपासून तिथे रहात आहेत. सद्यस्थितीत या गावात जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. १९९० मध्ये देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने कच्चा रस्ता तयार केला होता. या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. रस्ता खराब झाल्याने या भागातील विद्यार्थी, नागरिकांना शाळा, वैद्यकीय उपचार, शेतीचे साहित्य आणण्यासाठी देहूरोड जावे लागते. रस्ता अतिशय खराब असल्याने विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने रस्त्या करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. निविदा काढली आहे. मात्र, हा रस्ता संरक्षण विभागाअंतर्ग येतो. संरक्षण कायद्यानुसार प्रतिबंधित आहे. पूर्वी सैन्य अधिकाऱ्यांनी रस्त्याचा प्रस्ताव फेटाळला आहे. याबाबतची संपूर्ण माहिती घेतो.



> देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने ३१ मार्च २०२३ रोजी प्रस्ताव मंजूर करून दक्षिणी कमांडला पाठविला होता. प्रस्तावित रस्त्याची लांबी १८८५ मीटर आणि रुंदी ३.५ मीटर आहे. हा रस्ता संरक्षण विभागाच्या सर्वे नंबर १६३, १६४, १६१ मधून जाणार आहे. त्यामुळे हा रस्ता निर्माण करण्यासाठी मान्यता द्यावी. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड निधी आणि खासदार, आमदारांच्या निधीतून हा रस्ता पूर्ण करेल..
> **— खासदार श्रीरंग बारणे**

संपादकीय विशेष

# टोकाची संवेदना आणि कायद्याला आव्हान

गेल्या काही वर्षांमध्ये कामरापासून ते समय रैनापर्यंत अनेक भारतीय विनोदी कलाकारांना त्यांच्या कंटेंटसाठी टीकेला सामोरे जावे लागले आहे, इतकेच नाही तर कायदेशीर कारवाईचादेखील सामना करावा लागला आहे. राजकीय व्यक्तींवर व्यंग्यात्मक टीका असो किंवा विशिष्ट समुहाला न आवडणारे विनोद; हे कॉमेडियन्स बऱ्याचदा चर्चेचा विषय राहिले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांबद्दल राज्यपालांसह अनेक महनीय व्यक्तींनी अनुद्गार काढले. चर्चेत राहण्यासाठी जणू त्यांनी जीभ सैल सोडली. राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर याच्यासह अनेकांना कुणाच्याही भावना दुखावण्याचा अधिकार जसा नाही, तसाच त्यांनी चूक केली, म्हणून कायदा हातात घेऊन न्याय करण्याचा अधिकारही कुणालाच नाही. भारतीय राज्यघटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्याय आदींबाबत स्पष्टता आहे. काही कलाकृती गाजल्या पाहिजेत, यासाठी मुद्दामही वादग्रस्त वक्तव्ये केली जात आहेत. चित्रपटांच्या वेळी तर मुद्दाम असे केले जाते. कामरा, अलाहाबादिया अशा सुमार बुद्धीच्या व्यक्तींच्या विडंबन किंवा भाष्यांना अधिक महत्त्व देऊन त्यांचे अकारण मार्केटिंग करण्यात आपण हातभार तर लावत नाही ना, याचा विचार केला पाहिजे. व्यंगचित्र, विडंबन केले म्हणजे संबंधित नेता किंवा महापुरुष लहान होत नाही, तर असे करणाऱ्यांना दुर्लक्षित करणे किंवा सहजतेने घेतले,तर त्यांचे महत्त्व वाढत नाही. पंडित नेहरू यांची व्यंगचित्रे काढून त्यांच्यावर के. शंकर टीका करीत; परंतु नेहरू यांनी शंकर यांच्यावर टीका न करता अशा व्यक्ती आम्हाला जमिनीवर येण्यास भाग पाडतात, आमच्या अहंकाराच्या फुग्याला टाचणी लावतात, असे म्हटले होते. शंकर विकलीचे प्रकाशनही नेहरू यांच्या हस्ते झाले होते. इंदिरा गांधी यांचे नाक व्यंगचित्रात लांब दाखवले जात होते, तरीही त्यांनी त्यावर भाष्य केले नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनी आपल्यावरची टीका ही सुधारणा मानली. शरद पवार यांच्यावर बाळासाहेब ठाकरे यांनी कितीतरी व्यंगचित्रे काढली. दोघेही वेगवेगळ्या पक्षात होते, तरीही पवार यांनी ठाकरे यांच्या व्यंगचित्रांना कधीच वाईट म्हटले नाही. ठाकरे कुटुंबात तर बहुतेक लोक कलेशी संबंधित. कुणी व्यंगचित्रकार, कुणी फोटोग्राफर तर कुणी अन्य. कलाकारांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले, तर त्यांच्या कलाकृती अभिजात होतात. बाळासाहेबांच्या विचारांवर आणि पक्षावर दावा सांगणाऱ्यांना मात्र विडंबन रुचले नाही. कामरा याच्यासारख्या सुमार विडंबनाचे भांडवल करून त्याच्या स्टुडिओची तोडफोड करून कायदा हातात घेणे चुकीचे आहे.

राज्यघटनेत जरी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उल्लेख केला असला, तरी त्यात या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होणार नाही, याची दक्षता घेण्यास बजावले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले, म्हणजे इतरांची मानहानी करण्याचा परवाना मिळाला असे नाही. कुणाल कामरा हा त्याच्या टोकदार राजकीय विनेदांसाठी ओळखला जातो. यापूर्वीदेखील त्याने केलेले विनोद वादात सापडले आहेत. या वेळी कुणालने एका प्रसिद्ध गाण्याचे विडंबन करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गद्दार असा उल्लेख केला. यानंतर शिंदे यांच्या कार्यकर्तांनी यावर आक्षेप घेतला आणि त्यांनी मुंबईतील द हॅबिटॅट कॉमेडी क्लब येथे मोडतोड केली. हा क्लब आता काही काळासाठी बंद करण्यात आला आहे. याप्रकरणी कामरा विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कामरा यापूर्वीदेखील वादाच्या केंद्रस्थानी राहिला आहे. पत्रकार अर्णब गोस्वामी यांच्याशी हुज्जत घातल्याप्रकरणी त्याच्यावर काही विमान कंपन्यांनी बंदी घातली होती. त्याने न्यायव्यवस्थेवर टीका करणारी पोस्ट केल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अंबानी आणि अदानी यांच्यावर टीका केल्याचे परिणाम आता त्याला भोगावे लागत आहेत. पंडित नेहरू ते डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंतच्या पंतप्रधानपदाचा काळ आता राहिला नाही. आता केलेली टीका देशद्रोह्याचा गुन्हा दाखल करण्यापर्यंत जाऊ शकते याचे भान ठेवले नाही, की काय होते हे मणिपूरच्या पत्रकारासह अनेकांनी अनुभवले आहे. समैय रैना याच्या 'इंडियाज गॉट लेटंट' या कार्यक्रमाचा एका भाग व्हायरल झाला आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाईची मागणी होऊ लागली. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या रणवीर अलाहबादिया याने एका स्पर्धकाला त्याच्या आई-वडिलांबद्दल आक्षेपार्ह प्रश्न विचारला. या प्रकरणाचे पडसाद संसदेत उमटले. सर्वोच्च न्यायालयाने त्याला समज दिली. २०२४ मध्ये बिग बॉस १७ च्या विजेतेपदानंतर तळोजा येथील एका शोमध्ये कोकणी लोकांबद्दल केलेल्या बेताल वक्तव्यामुळे मुनव्वर याच्यावर टीका झाली होती. 'सोशल मीडिया'वर येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे माफी मागावी लागली होती.

'एआयबी'चा सह-संस्थापक तन्मय भट याने २०१६ मध्ये एपीजे अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर आणि लता मंगेशकर सारख्या दिग्गजांची फेस फिल्टर वापरून नक्कल करणारे स्नॅपचॅट व्हिडीओ बनवले होते. कपिल शर्मा हा त्याच्या 'क्लिन कॉमेडी'साठी ओळखला जातो; पण तोदेखील वादापासून दूर राहू शकलेला नाही. सुनील ग्रोवर याबरोबरचा वाददेखील चांगलाच चर्चेत राहिला. या वादादरम्यान त्याने शिवीगाळ केल्याचे सांगितले जाते. २०२१ मध्ये वीर दास याच्या वॉशिंग्टनच्या केनेडी सेंटरमध्ये दिलेल्या 'टू इंडियाज' या मोनोलॉगने खळबळ उडवून दिली होती. आताही कामरा याच्या माफीची मागणी करण्यात आली. राहुल सोलापूरकर याच्यासह अनेकांनी त्यांच्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल माफी मागूनही त्यांच्याविरोधातील वक्तव्ये कमी झाली नव्हती. गेल्या काही दिवसांपासून महापुरुषांवर आक्षेपार्ह वक्तव्य, 'सोशल मीडिया' पोस्ट करण्यावरून राज्याचे राजकारण तापले आहे. आता तर संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह मजकूर असलेली जुनी पुस्तके, नाटके आणि चित्रपटांवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्य निर्मितीसाठी चरित्र साधने समिती नेमण्याबाबत सकारात्मक भूमिका सरकार घेत असले, तरी इतिहास आणि साहित्य यात फरक असतो, हे भांडवल करणाऱ्यांना आणि सरकारला ही कळत नाही. अशा पद्धतीने साहित्यावर बंदी घातली,तर एक काळ गाजवलेल्या साहित्यकृती कायमच्या स्मृतीतून नष्ट होतील आणि लेखकाचे कल्पना स्वातंत्र्य हा मुद्दा लक्षात घेतलाच जात नाही. त्यात वसंत कानेटकर, राम गणेश गडकरी यांची ऐतिहासिक नाटकेही आहेत. लेखकाच्या कल्पना स्वातंत्र्याचा मुद्दा गृहीत धरला, तरी लेखकांनी महापुरुषांच्या चारित्र्याचे हनन करू नये किंवा आदर्शांना विकृत दाखवण्याचा प्रयत्न करू नये, हे भान ठेवले पाहिजे.

# संयम पाळणे गरजेचे

**छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यातील काही भागावर आधारित 'छावा' हा चित्रपट पाहून लोकांच्या प्रक्षोभित झालेल्या भावना आणि त्यातून निर्माण झालेल्या विद्वेषाच्या भावनेतून उसळलेला हिंसाचार आपण पाहिला. त्यानंतर औरंगजेबाची कबर इथे हवीच कशाला, हा प्रश्न ऐरणीवर आला. मात्र तो सोडवण्याचे संवैधानिक मार्गही आहेत. रस्त्यावर उतरुन याचे उत्तर कधीच मिळणार नाही. उलटपक्षी, याने अनर्थच घडेल.**

लक्षवेधी

शमसुद्दिन तांबोळी
ज्येष्ठ अभ्यासक

औरंगजेबाच्या कबरीच्या निमित्ताने अलिकडेच महाराष्ट्रातील वातावरण पेटले आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिला. दोन्ही गटांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संवेदनशील विषयावरुन अनास्थेची कोणतीही स्थिती उत्पन्न होऊ नये, ही राज्यातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकाची अपेक्षा आणि इच्छा आहे. एकूणच सहिष्णुता, सर्वसमावेशकता आणि बहुविविधता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून वर्षानुवर्षे तिचे जतन होत आले आहे. आपल्या देशाला अनेक वर्षांचा इतिहास आहे. असा इतिहास असतो तेव्हा अनेक वैभवशाली, गौरवशाली घटना, व्यक्ती, राज्यकर्ते तसेच समाजाला दिशा देणारे धुरिणी असतात; त्याचबरोबर सर्वसमावेशक आणि बहुपेडी संस्कृतीला नख लावणारे किंवा अन्यायी, अत्याचारी, शोषणकर्ते आणि राज्यकर्त्यांचा उल्लेखही इतिहासाच्या याच पानांमध्ये केलेला असतो. त्यामुळेच इतिहासाच्या पाऊलखुणा शोधताना स्वाभाविकच आपल्याला चांगल्या गोष्टींबद्दल, आदर्शांबद्दल माहिती मिळते, त्याचप्रमाणे अशा अन्यायी प्रवृत्तींचीही ओळख होते. अशा दोन्ही प्रकारच्या मानसिकतेचा अभ्यास करत, त्यातून बोध घेत पुढची पिढी वा समाज घडतो.

सध्या महाराष्ट्रातील तापलेले वातावरण हे अलिकडच्या विचारांचे फलित नसून गेल्या काही वर्षांपासूनच हे मुद्दे धुमसत आहेत यात शंका नाही. आता या धुमसणाऱ्या विचारांनी उचल खाल्ली आहे, इतकेच म्हणावे लागेल. 'छावा' या चित्रपटाने या विषयाला पुन्हा एकदा हवा दिली. खरे पाहता 'छावा' असो वा यासारखा कोणताही ऐतिहासिक चित्रपट म्हणजे इतिहास नसतो. असे चित्रपट वा नाटके इतिहासातील काही घटनांवर आधारित असतात. मात्र 'छावा'ने अनेक हिंदू बांधवांच्या भावना प्रक्षोभित केल्या. विशेषत: चित्रपटाचा शेवटचा भाग पाहताना, आपण हा चित्रपट पाहतोय याचे भानही अनेकांना उरले नाही. भावनेचा हा उद्रेक परिस्थितीचे गांभीर्य वाढवण्यास कारक ठरला. खरे पाहता हा चित्रपट ज्यावर बेतला आहे, ती 'छावा' नावाची कादंबरी अनेकांनी वाचली असेल. मात्र ती बाजारात आली तेव्हा अशा प्रकारे कोणतीही परिस्थिती उद्भवल्याचे वा जनमत प्रक्षुब्ध झाल्याचे स्मरत नाही. मात्र भावना दुखावण्याला ताजे निमित्त पुरले आणि विषयाला नको ते वळण लागले.

अशाच प्रकारे महंमद पैंगबरांवर चित्रपट नको, अशी मागणी झाल्याने मुस्लीम समाजाच्या भावना क्षुब्ध झाल्याचे आपण पाहिले आहे. या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणीही केली गेली आहे. त्याचप्रमाणे मुस्लीम समाजाकडून सलमान रश्दी वा तस्लीमा नसरीन यांच्या अभिव्यक्तीवर घाला घालणारी आंदोलने झाली आहेत. त्यामुळे समाजभावनेचा उद्रेक होणे ही काही आजची व्यथा नाही. मात्र औरंगजेबाची कबरच उखडून टाका, या मागणीचा आताइतका जोर पूर्वी कधीच दिसला नाही. मात्र आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'छावा' बघताना आपण चित्रपट पाहतोय की वास्तव बघतोय याचे भान हरपले आणि हा प्रश्न नव्याने चर्चेत आला. चित्रपट पाहताना भावविवश होत लोकांनी पडदा फाडल्याची उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. दुर्दैवाने अशा प्रकारच्या लोकभावनेचा राजकीय लाभापोटी वापर करुन घेण्याचे तंत्र काही लोकांना सापडले आहे. खरे तर भावनातिरेकाने संतापलेल्या लोकांना शांत करणे, नियंत्रित करणे, समजावणे, एखाद्या गोष्टीकडे कशा दृष्टीने पहावे यासंबंधीची त्यांची समज वाढवणे गरजेचे असते. मात्र ते सोडून राजकारण्यांनी सद्यस्थितीत आपल्याला हवे ते मिळवले आहे.

इथे लक्षात घ्यायला हवे की, औरंगजेब हा भारतातील मुसलमानांचा आदर्श नाही वा दैवतही नाही. किंबहुना, इस्लाममध्ये कायमस्वरुपी कबर बांधण्यासही मान्यता नाही. चबुतराही बांधू नये, अशी शिफारस इथे केलेली आहे. त्यामुळेच मक्केला पैंगबरांच्या काबाला विरोध करणारे काही मुस्लीम विचारवंत, पंथ आहेत. अशा कट्टरपंथियांकडून काबा उडवून देण्याच्या धमक्याही दिल्या गेल्या आहेत. त्यांना ही कबर संस्कृतीच नको आहे. अल्ला एकच आहे, त्यामुळेच त्याचा प्रेषित असणाऱ्या पैंगबराचे थडगे असण्याचे काहीच कारण नाही, हा विचार ते मांडतात आणि मानतात.

औरंगजेबाबद्दल बोलायचे तर तो जुलमी होता, धर्मांध होता पण तेवढाच तो त्याच्या अंगाने धर्माप्रमाणे चालणारा होता. त्यामुळेच लोकांचा पैसे खासगी गरजांसाठी वापरायचा नाही, हा नियम त्याने पाळला. स्वत: टोप्या शिवून त्याने आपल्या अंत्यविधीसाठी पैसे जमा केले होते. तो स्वत:च्या हाताने कुराण लिहीत होता आणि त्यातून पैसे मिळवत होता. या आणि यासारख्या त्याच्या धार्मिकतेच्या गोष्टी व्यक्तिगत पातळीवरच्या आहेत. अशा या माणसानेही आपली कबर बांधलेली नसावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. औरंगजेबाचे यासंबंधीचे विचार व्यक्त करणारी दोन-चार वाक्ये आजही त्याच्या कबरीजवळ लिहिलेली आहेत. त्याला दफन केलेल्या जागी अगदी साधी माती होती. पण पुढे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी या स्थळाच्या जागी संगमरवरी बांधकाम केले. म्हणजेच औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनी त्या ठिकाणाला मिळालेले हे रुप आहे. त्यामुळेच आता हा केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या अख्यतारीत असणारा विषय उरतो.

औरंगजेब आपला आदर्श, दैवत नसताना आणि एकाही मुसलमानाच्या घरात त्याचा फोटोही नसताना हा मुद्दा चिघळण्याचे काहीही कारण नाही. धूर्त, धर्मांध असणाऱ्या औरंगजेबाच्या कबरीच्या जागी लोक श्रद्धेने जातात आणि पूजापाठ करतात, असेही नाही. त्याला दर्गाही म्हटले जात नाही. म्हणजेच तिथे भेट देणारे याकडे केवळ ऐतिहासिक स्थळ म्हणूनच बघतात. इतकेच त्या स्थळाचे महत्त्व आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.

असहिष्णुता आणि परधर्मद्वेषाच्या भावनेची अनेक उदाहरणे जगाने पाहिली आहेत. अफगाणिस्तानासारख्या मुस्लीम देशामध्ये बुद्धाच्या मूर्ती उद्ध्वस्त केल्या गेल्याचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. खरे पाहता बुद्धाने तिथे कोणतेही आक्रमण केले नव्हते, अत्याचार केले नव्हते. तरीही शांतता, अहिंसेचे प्रतीक असणाऱ्या बुद्धाच्या मूर्तींची तिथे विटंबना करण्यात आली. ही असहिष्णुता आहे. पण भारताचा इतिहास खूप वेगळा आहे. हिंदुस्तानचा वेगळा आदर्श आहे. आम्ही म्हणू तो कायदा, आम्ही म्हणू ती संस्कृती असा खाक्या इथे नाही. मात्र अफगाणिस्तानसारख्या देशांमध्ये दिसणारी ही प्रवृत्ती आता इथे दिसू लागली आहे का, अशी शंका ताज्या घटनांमुळे उत्पन्न होते, कारण आम्ही म्हणू तोच हिंदू समाज, आम्ही म्हणू तोच कायदा... हा विचार आता दामटवला जाताना दिसतो आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला पण त्यांनीच त्याच्या कबरीसाठी, तेथील दिवाबत्तीसाठी आर्थिक मदतही केली. शिवाजी महाराज असे होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर खुल्दाबादमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या कबरीचा भाग दुरुस्त केल्याचे वा देखभालीसाठी काही रक्कम मंजूर केल्याचे दाखले मिळतात. मुघलांच्या कैदेत असताना औरंगजेबाची मुलगी शाहू महाराजांची देखभाल करत असे. याचे स्मरण ठेवून मृत्यू झाल्यानंतर तिच्या स्मरणार्थ शाहू महाराजांनी साताऱ्यामध्ये मशीद बांधली होती. औरंगजेबाच्या मुलीच्या नावाने शाहू महाराजांनी बांधलेली ही 'बेगम मशीद' आजही बघायला मिळते. म्हणजेच हे शासक कोणत्याही एका धर्माचे विरोधक नव्हते, तर त्यांनी तशा मानसिकतेचा, अत्याचारी प्रवृत्तींचा विरोध केला होता. त्यामुळेच ती व्यक्ती संपल्यानंतर वैरही संपले. थोडक्यात मरणानंतर वैर संपते, हे आपल्या संस्कृतीनेच सांगितले, शिकवले आहे. राजांनी त्याचे पालन केले. हिंदू धर्माने कायमच सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणून आपण शिवाजी महाराजांकडे पाहतो. त्यामुळेच राजांचा आदर्श घेणाऱ्यांनी, त्यांना दैवत मानणाऱ्यांनी सहिष्णुतेचे धडे घेणे गरजेचे वाटते.

सध्याच्या वादामुळे सामान्य मुसलमानांच्या मनामध्ये भीती आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती दिसून येत असल्यामुळे धास्ती वाढत आहे. अलिकडेच रत्नागिरीमध्ये एका मशिदीच्या संदर्भात वादविवाद होऊन दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर विटे गावानजिकचा एक दर्गाही रात्रीतून उद्ध्वस्त केला गेला. असेच प्रकार नागपूर, औरंगाबादला पहायला मिळाले. यातून आपण नेमके काय साधणार आहोत, कारण इथे तर औरंगजेब नाही. तिथे अफजलखानही नाही. थोडक्यात यांच्या नावाखाली मुस्लीम समाजावर निशाणा साधण्याचे काम होत आहे. ही परिस्थिती खात्रीने हिंदुत्ववादी राजकारण उचल खात असल्याचे दर्शवते. यातून एकात्मतेपुढे येणारे प्रश्न अधिक जटील होण्याची भीती आहे. त्यामुळेच दोन्ही समाजांनी विचारपूर्वक वर्तन करायला हवे. मुस्लीम समाजाने औरंगजेबाच्या कबरीसंदर्भात बाऊ करण्याची गरज नाही. याविरुद्ध मत मांडायचेच असेल तर कायदेशीर मार्गांचा अवलंब करायला हवा. सरकार वा सांस्कृतिक मंत्रालयाच्या रास्त मागण्यांची दखल घेऊन. मात्र ते सोडून जनजीवन विस्कळित करणे, जाळपोळ, मारहाण करणे आणि संपूर्ण समाजाला धारेवर धरणे अत्यंत चुकीचे आहे. यातून वर्तमानाचे नुकसान होईलच खेरीज भविष्यासाठीही ही बाब दुर्दैवी असेल.

## खेचाखेची

### काय करावं ?

**शिक्षक** : बंड्या मला सांग, रात्री डास चावले तर काय करायला पाहिजे ?

.
.
.
.
.
.

**बंड्या** : काही नाही. खाजवून गप्प झोपायला पाहिजे. तुम्ही काय रजनीकांत नाही की त्याच्याकडून सॉरी म्हणवून घेऊ शकाल...!

## सुप्रभात — वेगळं काही

फ्रान्स आणि स्पेन या देशांच्या मध्ये असलेलं फँसेस हे बेट सहा महिने फ्रान्सकडे तर सहा महिने स्पेनकडे असतं. हे बेट ३०० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. फ्रान्स आणि स्पेनला वेगळं करणाऱ्या बिदाओसा नदीवर हे बेट वसलं आहे. फँसेस हे मानवनिर्मित बेट असून तिथे कोणीही रहात नाही. या बेटाला न्यूट्रल टेरीटरी असं म्हटलं जातं. १६५९ मध्ये फ्रान्स आणि स्पेन यांच्यात याच बेटावर युद्धबंदीबाबत चर्चा झाली होती. या दरम्यान शांतता करार करण्यात आला. यावेळी फ्रान्सच्या चौदाव्या किंग लुईसने स्पेनच्या चौथ्या किंग फिलिपच्या मुलीशी लग्न केलं. दोन्ही देशांच्या मध्ये असलेलं हे बेट वाटून घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## हेअर केअर

### चलती ब्लॅकबेरी शेडची

एकीकाळी काळेभोर केस हे सौंदर्याचं लक्षण मानलं जात असे. आता मात्र केसांवर विविध रंगाचे कलर्स लावले जातात. या छटा केसांचं सौंदर्य खुलवतात



त्याचप्रमाणे पांढरे केसही लपवतात. अर्थात हे रंग आकर्षित करणारे असले तरी ते वापरताना बरीच काळजी घ्यावी लागते. मात्र फारशी काळजी घेण्याची गरज नसणारेही काही रंग आहेत. त्यात ब्लॅकबेरी शेडचा समावेश होतो. सध्या ब्लॅकबेरी हेअर कलरची चलती आहे. या रंगाची फारशी देखभाल करावी लागत नाही. त्याचा बेस तयार करण्यासाठी घातक रसायनांची गरज लागत नाही. ब्लीचिंगसाठी केसांच्या मुळांपर्यंत जावं लागत नाही. त्वचेच्या रंगानुसार यातील योग्य शेडची निवड केली जाते. बरेच हेअर स्टायलिस्ट हा रंग कस्टमाइज करून देतात. ब्लॅकबेरी आणि ब्लू या रंगसंगतीमुळे वेगळा लूक मिळतो. हा रंग प्रभाव पाडतो. केस पूर्णपणे हायलाईट करण्यापेक्षा बटांना हा रंग दिला असता खुलून दिसतो. नैसर्गिक काळ्या केसांऐवजी ब्लॅकबेरी बेस्ट ठरतो. त्यामुळे केस रंगवायच्या विचारात असाल तर ब्लॅकबेरीची निवड करा. हा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाची शान अनेक पटींनी वाढवेल याची खात्री बाळगा.




## राशीभविष्य

- **मेष** : कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. उत्साहाने रहावं. भावंडांबद्दल चिंता संभवते.
- **वृषभ** : दुर्गुण त्यागावे. शारीरिक तक्रारी वाढतील. वाद टाळावे. अडचणी कमी होतील.
- **मिथुन** : सुखस्वास्थ्य लाभणार असून मनावरील दडपण कमी होणार आहे. रेंगाळलेले प्रश्न सुटतील.
- **कर्क** : आर्थिक समस्या कमी होतील. धडाडी वाढणार आहे. महत्त्वाच्या कामात अधिक लक्ष घालावे.
- **सिंह** : देणेकऱ्यांना चुकवू नका. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शिक्षणात समस्या संभवतात.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात संघर्ष करावा लागेल. ठाम विचाराने रहावं. स्थावर प्रश्न वाढवू नका. प्रवास टाळा.
- **तूळ** : जुनी येणी वसुल होतील. व्यर्थ चिंता करु नका. घाईने घेतलेले निर्णय नुकसानीचे ठरतील.
- **वृश्चिक** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. कोणास जामीन राहू नका. विचाराने गुंतवणूक करा.
- **धनु** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. घरात शुभकार्य घडतील. अपेक्षित कामं पूर्ण होतील.
- **मकर** : देण्याघेण्याच्या व्यवहारात लक्ष घालावे. कलागुणांचा विकास होईल. सुसंधी लाभतील.
- **कुंभ** : प्राप्तीचं प्रमाण साधारण राहील. अनावश्यक खर्च टाळावा. संततीशी मतभेद संभवतात.
- **मीन** : जबाबदाऱ्यांची विभागणी करावी. ताण फार वाढवू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

## सल्ला मोलाचा

### केस धुताना काळजी घ्या

केसांचं आरोग्य उत्तम राहावं यासाठीच्या टीप्स.

– आपले केस कोरडे, तेलकट आणि मिश्र यांपैकी कोणत्या प्रकारचे आहेत ते पाहून योग्य शांपूची निवड करा. – दर दिवसाआड केस रात्री तेलानं मालिश करून दुसऱ्या दिवशी शांपूने स्वच्छ धुवून टाका. केस धुण्याआधी दीड तास कोमट तेलानं मसाज केला तरी पुरेसं ठरतं. – केस गळू नयेत यासाठी शांपू लावण्याआधी केस चांगले ओले करून घ्या. शांपू लावल्यावर अर्ध्या मिनिटानं केस धुवून टाका. – केस धुण्यासाठी कोमट किंवा शक्य असेल तर थंड पाण्याचा वापर करा. – चमक यावी म्हणून चहाच्या पाण्यानंही केस धुवू शकता. – केसांना शांपू केल्यानंतर कंडिशनरचाही वापर करा. – केस वाळवण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करू नका. जर लवकर केस कोरडे करायचे असतील तर केसांभोवती पंचा गुंडाळून ठेवा. पंचाने केस जोरात पुसू नका. – पंख्याखाली वाळवून केस कोरडे करू नका.

## दिनविशेष

### २६ मार्च

- **१९९७** : ज्येष्ठ गांधीवादी आणि उद्योगपती नवकमल फिरोदिया यांचा मृत्यू.
- **२०१५** : विश्वकरंडक स्पर्धेमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव.
- **२०१६** : 'स्टिंग ऑपरेशन'मुळे उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरीश रावत अडचणीत.
- **२०१७** : राजकीय पक्षांसाठी 'नो ड्यूज' चा प्रस्ताव.
- **२०१८** : अमेरिकेने सात पाकिस्तानी कंपन्यांना आपल्या देशात व्यवसाय करण्यास बंदी घातली.

## जाणून घ्या

### औषधांविषयी

चला, औषधांच्या जगात एक फेरफटका मारू या. औषधांचे प्रकार आणि रंग वेगवेगळे असतात. एखादी गोळी निळ्या रंगाची असते तर एखादी पिवळ्या रंगाची असते. या गोळ्यांमुळे तुम्हाला बरं वाटतं. बरीचशी औषधं प्रयोगशाळांमध्ये तयार केलेली असतात. बऱ्याच औषधांमध्ये नैसर्गिक घटकांचा वापर केलेला असतो. निर्मिती केल्यानंतर औषधाची चाचणी केली जाते. या चाचण्या एक किंवा जास्त वेळाही केल्या जातात. काही चाचण्या माणसांवर तर काही प्राण्यांवर केल्या जातात. या चाचण्यांमधून वेगवेगळे निष्कर्ष काढले जातात. माणसांच्या वापराच्या दृष्टीने सुरक्षित असल्याचं सिद्ध झाल्यानंतरच ती औषधं पुढे पाठवली जातात. नवी औषधं हा जुन्याच औषधांचा पुढचा टप्पा असतो. लोकांना लवकरात लवकर बरं वाटण्याच्या दृष्टीने त्यात बदल केलेले असतात. आजारपण दूर करण्यासाठी लोक औषधं घेतात. तर अनेकदा प्रतिबंध म्हणूनही औषधं घेतली जातात. औषधांचे विविध प्रकार आहेत. प्रतिजैविकं हा प्रकार चांगलाच प्रचलित आहे. बऱ्याच मुलांना प्रतिजैविकं दिली जातात. ही प्रतिजैविकं विविध प्रकारच्या बॅक्टेरियांशी लढू शकतात.

## पंचांग

**बुधवार, २६ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १२, नक्षत्र: धनिष्ठा
चंद्रराशी : मकर, योग : सिद्ध,
सूर्योदय: ६.४०, सूर्यास्त: ६.४९

## फॉरवर्डस

**पहिलं प्रेम हे नेहमी पहिलं प्रेमच असतं...**

यकीन कर तेरे बाद हस हस के,
ठुकराए हैं मैने इश्क के कई मौके

## आरोग्यमंत्र

### म्हणून हृदय जपा

हृदय हा सतत कार्यरत राहणारा महत्त्वपूर्ण अवयव आहे. हृदय दररोज ७,००० लीटर रक्त पंप करतं (यापैकी ७०% रक्त मेंदुसाठी लागतं आणि उर्वरित शरीराला ३०% रक्त मिळतं). हे रक्त ७०,००० किमी पेक्षाही लांब रक्तवाहिन्यांमधे प्रवाहित होत असतं. एक टन वजन ४२ फूट उंचीपर्यंत उचलण्यासाठी आवश्यक असते तितकी शक्ती हृदय त्याच्या कार्यातून दररोज निर्माण करत असतं.



आपण थकल्यावर आराम करतो पण हृदयानं अवघी ४ ते ५ मिनीटं आराम केला तरी आपला कायमचा आराम मिळू शकतो. अशाप्रकारे हृदय सतत कार्य करू शकते कारण ते अनुशासनाच्या आधारावर काम करतं. सामान्य परिस्थितीमधे हृदय ०.३ सेकंद आकुंचन पावतं तर ०.५ सेकंद प्रसरण पावतं. या हिशोबाने ०.३ + ०.५ = ०.८ सेकंदात हृदयाचा एक ठोका पूर्ण होतो म्हणजे एका मिनीटात ७२ ठोके होतात जे सामान्य असतात. आरामाच्या ०.५ सेकंदात अशुध्द रक्त फुफ्फुसात जाऊन १००% शुद्ध होऊन येतं. असं असताना काही कारणानं शरीराला कमी वेळात जास्त रक्तपुरवठ्याची गरज निर्माण झाली तर हृदय जास्त रक्त पंप करण्यासाठी आरामाची वेळ कमी करतं. अश्या परिस्थितीत आराम ०.४ सेकंद झाला तर हृदयाचा एक ठोका ०.७ सेकंदात पूर्ण होऊन दर मिनीटाला ही संख्या ८२ च्या वर जाते आणि केवळ ८०% च रक्त शुध्द होतं. हे वारंवार झालं तर शरीरावर त्याचे परिणाम दिसून येतात.

## वाचा तर खरं

✻ गुलमर्ग– गुलमर्गचा अर्थ फुलांचा मार्ग. साठच्या दशकात गुलमर्गला बॉलीवूडची ओळख मिळाली. जम्मू काश्मीरच्या रमणीय प्रदेशात स्थित असलेलं गुलमर्ग विंटर स्पोर्टसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी बॉबी, जब तक है जान, हैदर, ये जवानी है दिवानी अशा अनेक चित्रपटांचं चित्रिकरण झालं.

✻ मुन्नार– केरळमधील चहाच्या सुंदर मळ्यांची चित्रपट दिग्दर्शकांना भूरळ पडली नाही तर नवलच! केरळमधील मुन्नार इथं चेन्नई एक्सप्रेस, निशब्द, लाईफ ऑफ पाय, गुप्त या चित्रपटांचं चित्रकरण झालं आहे. मुन्नारला येण्याची योग्यवेळ ऑक्टोंबर ते मे आहे.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## नव्या प्राप्तिकर विधेयकावर पावसाळी अधिवेशनात चर्चा

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात नव्या प्राप्तिकर विधेयकावर चर्चा होईल, अशी माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी दिली. लोकसभेत वित्त विधेयक २०२५ वरील चर्चेला उत्तर देताना सीतारामन म्हणाल्या की, १३ फेब्रुवारी रोजी सभागृहात सादर करण्यात आलेल्या नवीन प्राप्तिकर विधेयकाची सध्या प्रवर समितीकडून छाननी केली जात आहे. संसदेच्या पुढील अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापर्यंत प्रवर समितीला आपला अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन साधारणपणे जुलैमध्ये बोलावले जाते आणि ऑगस्टपर्यंत चालते.

# बांगलादेशमध्ये पुन्हा सत्तापालट?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**ढाका :** शेख हसिना यांची सत्ता पालटल्यानंतर काहीच महिन्यात आता बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा सत्तापालट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मोहम्मद युनूस चीनच्या दौऱ्यावर जाण्याआधीच लष्कराने त्यांना हटवण्याची तयारी सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. बांगलादेश लष्कराने राजकीय तणावादरम्यान एक आपत्कालीन बैठक घेतली असून त्यामध्ये देशातील प्रमुख लष्करी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर सेना लवकरच सत्तेवर ताबा मिळवू शकते, अशी अटकळ बांधली जात आहे.

बांगलादेशमध्ये विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसिना यांना सत्तेतून बाहेर पडावं लागलं होतं. तसेच त्यांना देशही सोडावा लागला होता. त्यानंतर देशाची सूत्रे नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्याकडे सोपवण्यात आली. आता त्यांच्या हातातूनही पुन्हा सत्ता काढून घेण्यासाठी लष्कराने हालचाली सुरू केल्याची माहिती आहे.

मोहम्मद युनूस यांनी सत्ता हाती घेतल्यापासून बांगलादेशात असंतोष आणि अविश्वास वाढत चालला आहे. विविध राजकीय पक्ष आणि विद्यार्थ्यांनीही लष्कराच्या विरोधात आवाज उठवला असून, त्यामुळे लष्करात विरोधाची परिस्थिती निर्माण झाली आहे. वृत्तानुसार, लष्कर आता राष्ट्रपतींवर आणीबाणी जाहीर करण्यासाठी किंवा मोहम्मद युनूस यांना सत्तेवरून हटवण्यासाठी दबाव आणू शकते.

लष्कर राष्ट्रीय एकता सरकार स्थापन करण्याचा विचार करत आहे, जे पूर्णपणे लष्कराच्या अखत्यारीत असेल. देशातील राजकीय अस्थिरता संपवणे हे या सरकारचे उद्दिष्ट असेल. युनूस सत्तेवर आल्यापासून लोकांमध्ये सरकारविरोधात असंतोष वाढला असल्याने लष्करी बंडाचे हे पाऊल उचलले जाऊ शकते, असे सूत्रांकडून समजते.

मोहम्मद युनूस लवकरच चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत, जो बांगलादेशासाठी महत्त्वाचा आहे. या भेटीमुळे केवळ देशाच्या राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो असे नाही तर चीन-बांगलादेश संबंधांमध्ये बदल घडवून आणू शकतात. त्याचा परिणाम प्रादेशिक सत्तेच्या समतोलावर होणार आहे.

दुसरीकडे, पदावरुन हवटण्यात आलेल्या शेख हसिना यांना पुन्हा एकदा पंतप्रधान पदाची सूत्रे देण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. मोहम्मद युनूस यांच्याकडून सत्ता काढून घेऊन ती शेख हसिना यांच्याकडे देण्यासाठी लष्कर प्रयत्नशील असल्याचा दावा विद्यार्थी संघटनांनी केला आहे.

बांगलादेशातील असंतोषाच्या पार्श्वभूमीवर लष्कराने तातडीची बैठक बोलावली होती. या बैठकीला ५ लेफ्टनंट जनरल, ८ मेजर जनरल, स्वतंत्र ब्रिगेडचे कमांडिंग अधिकारी आणि लष्कराच्या मुख्यालयातील इतर प्रमुख अधिकारी उपस्थित होते. राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या रणनीतीवर चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. या बैठकीपासून लष्कराने आपली सक्रियता वाढवली असून त्यामुळे सत्तापालट होण्याची भीती अधिक बळावली आहे.

# किल्ले देखभालीसाठी राज्याकडे द्या - शेलार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्ले संवर्धन आणि देखाभाल व दुरूस्तीसाठी राज्याच्या पुरातत्व विभागाकडे देण्यात यावेत, अशी विनंती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना केली आहे. आशिष शेलार यांनी याबाबतचं पत्र शेखावत यांना लिहिले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या बलाढ्य इतिहासाची साक्ष देणारे महाराष्ट्रात ५४ गड किल्ले हे केंद्र संरक्षित असून ६२ गड किल्ले राज्य संरक्षित किल्ले आहेत. या किल्ल्यांचे संरक्षण व जतन तसेच देखभाल व दुरूस्तीसाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. जर हे सगळे किल्ले राज्य शासनाच्या अखत्यारित दिल्यास त्यांची डागडुजी व देखभाल अत्यंत प्रभावीपणे करता येईल. म्हणून हे किल्ले राज्य शासनाकडे देण्यात यावेत, अशी विनंती आशिष शेलार यांनी केली आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आपल्या १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वात पॅरिस येथे जाऊन आले आहे.

पान १ वरून

## आदित्योत्सवाच्या झळा

आदित्य ठाकरे यांचं नाव ड्रग्सच्या बिझनेसमध्ये आल्यानंतर समीर वानखेडे असो किंवा नार्कोटिक्स ब्युरोचे इतर अधिकारी असतील, त्यांना आदित्य ठाकरेंवर कारवाई करण्यासाठी कोणी थांबवलं, असा प्रश्न ओझा यांनी उपस्थित केला आहे. त्यामध्ये, किती कोटींची डील झाली असाही सवाल ओझा यांनी विचारला. पोलिस आयुक्तालयात आमची जॉईंट सेक्रेटरी यांच्यासोबत चर्चा झाली, त्यानंतर त्यांनी पोलीस आयुक्तांशी फोनवरुन चर्चा करुन संबंधित प्रकरणात ही तक्रार दाखल करुन घेत असल्याचे म्हटले. त्यानुसार, आता एफआयआर दाखल झाल्याचेही ओझा यांनी सांगितले. आमच्या तक्रारीत आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे दोघेही आरोपी आहेत, अशी माहिती निलेश ओझा यांनी दिली.

दिशाचा सालियान हिचा एक मित्र होता. त्याचं नाव स्टिव्ह पिंटो होतं. तिच्या हत्येनंतर त्याने एक ट्विट केलं होतं. त्यात तो म्हणतो ७ जून २०२० ला एकता कपूरच्या घरी पार्टी झाली. त्यात परमबिर सिंह, सुशांत राजपूत, दिशा सालियन, आदित्य ठाकरे हे होते. शिवाय हत्या कशी झाली याचे संकेतही त्याने या ट्विटच्या माध्यमातून दिले आहेत. त्या दिवसापासून तो गायब आहे. त्याची ही चौकशी झाली पाहीजे अशी मागणीही त्यांनी या ट्विटचा आधार घेत केली आहे.

## पाकव्याप्त काश्मीर भारताचाच

दहशतवादाला खतपाणी देतो, असेही भारताने सांगितले. भारताच्या सार्वभौमत्वाला धक्का पोहोचविणाऱ्या कोणत्याही आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरील वक्तव्याला भारताचा विरोध आहे, असे भारताने स्पष्ट केले.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत संबोधित करताना भारताचे स्थायी प्रतिनिधी, राजदूत पार्वतनेनी हरीश यांनी जम्मू आणि काश्मीरचा पाकिस्तानकडून करण्यात आलेला वारंवार उल्लेख 'अयोग्य' असल्याचे म्हटले. तसेच त्यांनी हा प्रदेश भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील, अशा शब्दांत पुनरुच्चार केला.

भारताला याची दखल घ्यावी लागत आहे की पाकिस्तानच्या प्रतिनिधीने पुन्हा एकदा भारताचा केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीरबाबत अनावश्यक टिप्पणी केली. असा वारंवार उल्लेख केल्यामुळे त्यांचे बेकायदेशीर दावे सिद्ध होत नाहीत अथवा त्यांच्या सीमापार दहशतवादाचे समर्थन होत नाही, असे हरीश यांनी पाकिस्तानला बजावून सांगितले. या चर्चेत भारताने सध्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याबाबत चर्चा केली. दहशतवाद आणि आधुनिक शस्त्रास्त्रांबाबत चिंता व्यक्त केली. कोणत्याही देशाच्या सुरक्षेसाठी लष्कर, पोलीस आणि त्यांना पुरेशा बजेटची गरज असते. याशिवाय महिला शांततेसाठी मोठ्या प्रमाणात योगदान देत आहेत, असेही ते म्हणाले. अनेक अवघड ऑपरेशन्समध्येही महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा स्थितीत महिलांना शांततेत भूमिका बजावता येणार नाही, असा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही.

## राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे विधानसभेचे....

त्यांची बिनविरोध निवड झाली आहे, त्यांच्या नावाची घोषणा बुधवारी होणार आहे.विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांचं नाव चर्चेत होतंच. मात्र, त्यांच्या नावाशिवाय लातूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री संजय बनसोडे, तसेच गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार राजकुमार बडोले या तिघांची नावं चर्चेत होती. मात्र, अखेर अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. अण्णा बनसोडे अजित दादा समर्थक आमदार आहेत. त्याचबरोबर पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत.

## न्यायाधीश वर्मांच्या

निवासस्थानी नोटांची बंडले सापडली. कोट्यवधी रूपये सापडल्यानंतरही कुठला तपास होताना दिसत नाही. वर्मा यांनी राजीनामा द्यायला हवा, अशी भूमिका आपचे नेते संजय सिंह यांनी मांडली. रोकड प्रकरणावर केंद्र सरकारने संसदेत निवेदन द्यावे, अशी मागणी काँग्रेसचे खासदार कार्ती चिदंबरम यांनी केली.

## सुप्रिया सुळे, रोहित पवारांचेही नाव



देखील झाली होती. त्यानंतर अचानक हे प्रकरण उकरून काढले गेले." फडणवीस म्हणाले की, अशा प्रकरणांमध्ये कुटुंबात, समाजात अपमान होईल या भीतीपोटी प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र मी जयकुमार गोरे यांच्या हिमतीची दाद देतो. त्यांना ज्यावेळी लाचेची मागणी झाली त्यावेळी त्यांनी पोलिसात तक्रार केली. तेव्हा ट्रॅप लावण्यात आला. सगळी मागणी, संवाद टेप झाला. पोलीस विभागाची खात्री पटल्यानंतर सापळा रचून कॅश देताना आरोपीला पकडण्यात आले. त्यामुळे हा ब्लॅकमेलिंगचाच प्रकार होता, असं मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले.

## भाजपकडून मुस्लिमांना ईदीचे वाटप

**नवी दिल्ली :** ईदपूर्वी भारतीय जनता पक्षाने गरीब मुस्लिमांना भेटवस्तू वाटण्याची मोहीम सुरू केली आहे. 'सौगत-ए-मोदी' अभियान राबवून भाजप ३२ लाख गरीब मुस्लिमांना भेटवस्तू देणार आहे. दिल्लीतील निजामुद्दीन येथून या मोहिमेला सुरुवात होणार आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा या मोहिमेवर देखरेख ठेवणार आहेत. गरीब मुस्लिमांना अभिमानाने ईद साजरी करता यावी यासाठी त्यांना एक किट ही भेट देण्यात येणार असल्याचे भाजपचे म्हणणे आहे. भाजपच्या ३२ हजार कार्यकर्त्यांवर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता याची जबाबदारी घेईल. अशा प्रकारे देशभरातील ३२ हजार मशिदींचा समावेश करण्यात येणार आहे. यानंतर गरीब मुस्लिमांना ईदपूर्वी भेटवस्तू दिल्या जातील.

# प्रशांत कोरटकरला तीन दिवसांची पोलीस कोठडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना फोन करुन धमकावणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपमानजनक टिप्पणी करण्याचा ठपका असलेल्या प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर जिल्हा न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे प्रशांत कोरटकर याचा कोल्हापुरातील मुक्काम वाढला आहे. प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर पोलिसांच्या पथकाने सोमवारी दुपारी तेलंगणात अटक केली होती. त्याला घेऊन पोलीस पथक सोमवारी कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाले होते. हे पथक कोरटकरला घेऊन मंगळवारी सकाळी कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलीस ठाण्यात पोहोचले होते.

यानंतर दुपारी १२ च्या सुमारास प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर जिल्हा न्यायालयात नेण्यात आले.

न्यायालयातील सुनावणी दरम्यान सरकारी वकिलांनी प्रशांत कोरटकर याच्या ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्याच्या आवाजाचे नमुने घ्यायचे असून त्याच्या चौकशीसाठी सात दिवसांची कोठडी हवी असल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले होते. मात्र, जिल्हा न्यायालयाने प्रशांत कोरटकर याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. न्यायमूर्ती एस.एस. तट यांनी हा निर्णय दिला. त्यामुळे एरवी थाटात राहणाऱ्या प्रशांत कोरटकर याला आणखी तीन दिवस कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात काढावे लागणार आहेत. प्रशांत कोरटकर हा तब्बल गेल्या महिनाभरापासून फरार होता. कोल्हापूर पोलिसांची पथके त्याचा कसून शोध घेत होती.

## परीक्षा आता सकाळच्या सत्रातच

परीक्षा एप्रिलअखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. राज्याच्या वेगवेगळ्या भागातील उन्हाची तीव्रता, पाण्याची टंचाई याबाबतच्या अडचणींमुळे शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक, पालकांकडून या वेळापत्रकाला विरोध करण्यात आला आहे. मात्र, या विरोधानंतरही राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने वेळापत्रकात बदल केलेला नाही.

या पार्श्वभूमीवर, महसूल आणि वन विभागाचे अवर सचिव संजीव राणे यांनी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात जिल्हा स्तरावरून उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभाग, महापालिका, नगरपालिका, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी करायच्या मार्गदर्शक सूचना नमूद करण्यात आल्या आहेत.

### Public notice

Notice is hereby given that one Vikas Baban Kumbhar and Shobha Vikas Kumbhar (herein after referred to as the said mortgagor) have agreed to create mortgage in respect of the G.P. property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our client s Piramal capital and housing finance ltd br Pandharpur Dist. Solapur in respect of the property described herein. That the said property originally owned and in possession of Baban Nivrutti Kumbhar after his death said property came in to the name of Vikas Baban Kumbhar as heir of Baban Nivrutti Kumbhar and As per the G.R. name of Shobha Vikas Kumbhar also shown in owners column of property extract. So I have given this notice to all persons having any claim against or in respect the said G.P. property more particularly described in the schedule hereunder or any part thereof by way of sale, exchange, mortgage (equitable or registered or otherwise) Gift, trust, inheritance family arrangement, maintenance, bequest partnership, possession lease sublease tenancy, license, lien charge, pledge, easement or otherwise howsoever are hereby requested to notify the same in writing to me / us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hereof, failing which the claim or claims, if any of such person/s or person/s shall be considered to have been waived and or abandoned and my client shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of the said.

DESCRIPTION OF THE PROPERTY

G.P. Milkat no. 675 area 3360 sq feet within the limit of village Lumewadi Tal. Indapur Dist. Pune

East:- Maruti Mandir

South:- House Sanjay Sarvan Ambad

West:- House of Dattatraya Vijaykumar Kale

North:- House of Santosh Mahadev Mane

Place:-Pandharpur

Dt. 14-04/2025

शिक्का

Adv. R.N Shinde (Panel advocate)

### जाहिर नोटीस

[illegible]

शिक्का

Adv. R.N Shinde (Panel advocate)

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की मिलींद विलास गायकवाड राहणार सर्व्हे नंबर २०/१/१/१६, यश निल बिल्डिंग, फ्लॅट नंबर ६, विजयनगर, दिघी, पुणे. ४११०१५. यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले दोन चाकी वाहन नंबर MH 14 HX 2354 असा असून त्याचा चासीस नंबर ME2B64BY1KWF21713 व इंजिन नंबर DHYWKF19591 असा असून, सदर वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती प्रियांका मिलींद गायकवाड यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

१०/०३/२०२५

**श्रीमती प्रियांका मिलींद गायकवाड**
राहणार सर्व्हे नंबर २०/१/१/१६, यशनिल बिल्डिंग,फ्लॅट नंबर ६, विजयनगर, दिघी, पुणे ४११०१५.

### उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय

७, निलगिरी बंगला, क्विन्स गार्डन, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१.

### नोटीस

क्र. आरटीएस/अपिल /८००/२०२३
दिनांक २०/०१/२०२५

सुरेश गणपत ढमाले
रा. बेलावडे ता. मुळशी जि. पुणे
तर्फे कु. मु.धारक ज्ञानेश्वर पांडुरंग गरुड
रा. टाकवे खु. ता. मावळ जि. पुणे — **वादी**

**विरुद्ध**

१) कामगार तलाठी वडकी
२) मंडल अधिकारी हडपसर
३) रामचंद्र दगडोबा जगताप
रा. मु.पो. नाना धुमाळ पेट्रोल पंपामागे सासवड ता. पुरंदर जि. पुणे
४) तुकाराम भगवंतराव मोडक
रा. वडकी ता.हवेली, जि. पुणे — **प्रतिवादी**
५) विजय विठ्ठल जाधव
रा.ए-७०३ लुंकड आर्चिड विमाननगर पुणे

मौजे वडकी, ता.हवेली, जि. पुणे येथील येथील जमीन सर्व्हे नंबर / गट नंबर १२३४ बाबत फे. फा.**क्र.६९०६ व इ.** या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी इकडे दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी **उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवन मागे, पुणे - ४११००१ येथे दिनांक ०३/०४/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी आपण नेमलेल्या तारखेस व वेळी पुराव्याच्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. सदरहू तारखेस व वेळी आपण गैरहजर राहिल्यास तुमचे काही एक म्हणणे नाही असे समजून सुनावणीत एकतर्फी निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. प्रतिवादींना अपिलासोबतची कागदपत्रे पुरविण्याची जबाबदारी अपिलार्थीची राहील.

**सही/ उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे करीता**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टातील नमूद मिळकत ही आमचे अशील श्री.शंकर जयवंत खेडकर त्यांचे भाऊ श्री महेश जयवंत खेडकर आणि वडील श्री. जयवंत बबन खेडकर यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्काच्या व वहिवाटीच्या असून सदर मिळकतीचे त्यांचेमध्ये रजिस्टर वाटणीपत्र झालेले असून त्यामध्ये सदर मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ०० हे ५१ आर क्षेत्र आमचे अशीलांचे भाऊ श्री. महेश जयवंत खेडकर यांचे हिश्यास आलेले आहे. तसेच सदरचे महेश जयवंत खेडकर यांच्या हिश्याचे ५१ आर क्षेत्रपैकी १२ आर क्षेत्र हे सदर गट न. ९३३ चे अंतर्गत जाणे-येणेचे २० फुटी रस्त्यासाठी ठेवण्यात आलेले होते. असे असताना महेश जयवंत खेडकर यांनी सदरचे रस्त्याचे क्षेत्र सोडून उर्वरित ३९ आर क्षेत्राची विक्री करणे आवश्यक असताना त्यांनी संपूर्ण ५१ आर क्षेत्राची बेकायदेशीरपणे विक्री केलेली आहे. त्यामुळे सदरचे झालेले सर्व बेकायदेशीर व्यवहार रद्द करून मिळणेसाठी आमचे अशिलानी पुणे येथील दिवाणी न्यायालयात स्पे.दि.मु.न. २६६/२०२५ हा दाखल केलेला आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदीखत, गहाणखत, विसारपावती दस्त, मोर्गेज अथवा अन्य कोणताही स्वरूपाचा व्यवहार करू नये, अश्या प्रकारचा कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर असेल व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व अशा वेळी आमचे अशील हे सर्व संबंधितांविरुद्ध योग्य ती दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका शिरूर, मे. सब रजिस्टर साहेब शिरूर व तळेगाव ढमढेरे यांचे हद्दीतील जिल्हा परिषद पुणे यांचे हद्दीतील येथील जमीन मिळकत गाव मौजे रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे येथील मिळकत गट नं. ९३३ यांसी क्षेत्र ०० हे. ६४ आर, अधिक पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०२ आर, असे एकूण पोटखराब्यासह क्षेत्र ०० हे. ६६ आर क्षेत्र ही मिळकत.

ही संपूर्ण मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय असे.

पुणे
दि.२५/०३/२०२५

शिक्का

**गणेश वि. कातोरे पाटील, ॲडव्होकेट**
ऑफिस नं. १०४, अलका इलिगंट सोसायटी, पहिला मजला, सि टी एस नं. ६१४ ए आणि ६१४ सी, निवडुंग विठोबा मंदिराजवळ, पारशी अग्यारी व इंडियन बँकेसमोर, नाना पेठ, पुणे- ४११००२ मो.नं. ९७६७३६८०३८

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६१/२०२४/५७७२

**अर्जदार**
साक्षी समर्थ रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ३५, हि.नं. १, नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४१.
तर्फे, अध्यक्षः श्री. विजयचंद पांडूरंग गावडे, सचिव : श्री. श्रीकांत विनायक इनामदार

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. साक्षी समर्थ डेव्हलपर्स, तर्फे भागीदार, अ. श्री. विजय वसंतराव यादव
रा. सर्वे नं. ३७, कमल कुंज, बंगला नं.७, पुर्ती हाउसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे- ४११ ०४३.
ब. श्री. दिलीप निवासराव जगताप, रा. स. नं. ३६/१२, घर नं. २५५, श्री सदगुरु कृपा, केशव नगर, धनकवडी, पुणे- ४११ ०४३.
जाब देणार नं. २ श्री. विजय वसंतराव यादव
रा. सर्वे नं. ३७, कमल कुंज, बंगला नं. ७, पुर्ती हाउसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे- ४११०४३.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये साक्षी समर्थ रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. ३५, हि.नं.१, नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०४१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५६१/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०४/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक १ व २ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २४/०३/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की माझे अशील श्री सुधाकर शंकर डाळिंबे राहणार धानोरी पुणे, ह्यांचा पत्नी कै.सुनंदा सुधाकर डाळिंबे, दिनांक ०१/११/२०१७ रोजी पुणे येथे मयत झाल्या आहेत. मयत कै. सुनंदा सुधाकर डाळिंबे यांच्या पश्च्यात पती श्री सुधाकर शंकर डाळिंबे, व दोन मुले श्री मधुकर सुधाकर डाळिंबे आणि श्री संतोष सुधाकर डाळिंबे हे मयतास कायदेशीर वारस आहेत. तरी कोणाला कसलाही वरील कायदेशीर वारस आक्षेप असल्यास त्यांनी मला संबंधित कागदपत्रे घेऊन खालील पत्त्यावर सात दिवसांच्या आत कळवावे.

दिनांक- २३/०३/२०२५

**ॲड. वनश्री क्षीरसागर**
**वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड**
**३६३१३, एफ पी नं -ZISI३, अपार्टमेंट नं ३, दुसरा मजला, ए विंग, ; प्रतिसाद जोग कॉंडोमिनियम, शिवाजीनगर, पुणे -४११००४ - मोब नं - ९८२३५९८८०१, ईमेल - vanashree.kshirsagar@vastuhfc.com**

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६०/२०२४/५७७३

**अर्जदार**
मिकासा जी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१, ८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे-
तर्फे
अध्यक्षः श्री. विनोद प्रभाकर वेठेकर, सचिव : श्री. सतिश गजानन ठाकरे

**विरुध्द**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
महाराष्ट्र शविकसक / प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. प्रगन ग्लोबल डेव्हलपर्स
पत्ताः ऑफिस नं. ३०८, सिटी पॉइंट बिल्डींग, ढोले पाटील रोड, पुणे - ४११००१ तर्फे भागीदार, अ. श्री. जसप्रीतसिंग आर. राजपाल, ब. श्री. मोहित जगदीश गोयल
अ.क्र.१अ व १ब हे अ.क्र. २ ते ८ तर्फे कुलमुखत्यार म्हणून
पत्ताः १०२, लापिस लझुली, कोरेगाव पार्क, लेन नं ५, पुणे- ४११ ००१.
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. बाबूराव बाळासाहेब सातव, (स्वतः करिता व हिंदु एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून)
३. सौ. आशा बाबूराव सातव, ४. सौ. आशा प्रदीप देवकर, ५. श्रीमती भिकाबाई बाळासाहेब सातव
अ.क्र. २ ते ५ रा. गट नं. ८७८ (पै) आणि ७८९ (पै), वाघोली, ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०७.
६. श्री. नरेंद्र जगन्नाथ मित्तल, रा. बी / ४०२, सुजय गार्डन, पुणे- ३७
७. श्री. धिमान धिरेन सन्नामथ्, रा. केसनंद फाटा, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०७.
८. सौ. जनाबाई रंगनाथ कटके, रा. कटकेवाडी, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे- ४१२ २०७.
९. मे. गगन ग्लोबल डेव्हलपर्स, पत्ताः ऑफिस नं. ३०८, सिटी पॉइंट बिल्डींग, ढोले पाटील रोड, पुणे- ४११ ००१.
तर्फे भागीदार, अ. श्री. जसप्रीतसिंग आर. राजपाल, ब. श्री. मोहित जगदीश गोयल
पत्ताः १०२, लापिस लझुली, कोरेगाव पार्क, लेन नं ५, पुणे- ४११ ००१.
इतर सहकारी गृहरचना संस्था / इतर इमारत
१०. मिकासा सी-१ आणि सी-२ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१, ८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे-
११. मिकासा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, (मिकासा डी, इ व एफ इमारत)
१२. मिकासा ए- १ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
१३. मिकासा ए- २ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
१४. मिकासा बी- १ आणि बी- २ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
१५. मिकासा एच- १ आणि एच - २२ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
अ.क्र.११ ते १५ रा.पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१, ८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०७.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये मिकासा जी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१, ८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली, ता. हवेली, जि.पुणे- ४१२२०७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५६०/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ११/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. आदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १५ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते १५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते १५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २४/०३/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

## राजस्थानमध्ये २.८६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव




**जयपूर :** राजस्थानमध्ये २०२३-२४ मध्ये २.८६ कोटी रुपयांच्या नवीन गुंतवणुकीचे प्रस्ताव आले आहेत, जे वर्षभरापूर्वी १.५९ कोटी रुपये होते. एमएसएमई ईपीसीचे अध्यक्ष डी. एस. रावत यांनी "प्रगतीशील राजस्थानमध्ये गुंतवणूक, विकास आणि विकास २०२०-२१ ते २०२३-२४" हा अहवाल प्रसिद्ध केला. २०२३-२४ मध्ये ५१,७८० कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रकल्प पूर्ण झाले, तर २०२२-२३ मध्ये ४१,०१५ कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण झाले, असे रावत म्हणाले.

## पीडित महिला आयोगासमोर हजर



**नवी दिल्ली :** पाद्री बजिंदर सिंग याने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडलेली महिला मंगळवारी राष्ट्रीय महिला आयोगासमोर हजर झाली. पंजाबमधील जालंधर जिल्ह्यातील एका गावातील चर्चचे पादरी आणि स्वयंघोषित ख्रिश्चन धर्मोपदेशक बजिंदर सिंग (४२) यांच्यावर एका २२ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून लैंगिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या तक्रारीत महिलेने म्हटले आहे की, बजिंदर सिंग तिला मेसेज पाठवत असे आणि रविवारी चर्चमधील एका केबिनमध्ये तिला एकटे बसवायचे, ज्यादरम्यान त्याने तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला.

## पलक्कडमध्ये केएसयूच्या ४ कार्यकर्त्यांना अटक



**पलक्कड (केरळ) :** फेसबुक पोस्टवर केलेल्या वक्तव्यावरून केएसयूच्या चार कार्यकर्त्यांना त्यांच्या महाविद्यालयात एका विद्यार्थ्याला बेदम मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येथील ओट्टापालम एनएसएस कॉलेजमध्ये इतिहासाच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीला सोमवारी दुपारी चार विद्यार्थ्यांनी बेदम मारहाण केली. संशयित हे काँग्रेसची विद्यार्थी संघटना केरळ स्टुडंट्स युनियनचे (केएसयू) पदाधिकारी असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपींनी धातूच्या वायरने पीडितेचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला.

## हॉस्पिटलची १७ लाख ६५ हजारांची फसवणूक

**ठाणे :** ठाण्यातील एका रुग्णालयाच्या निधीतून १७ लाख ६५ हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी एका महिला लेखापालावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमएफसी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपींनी ऑपरेशन चार्जेससह रुग्णांच्या देयकातील रक्कम वैयक्तिक वापरासाठी वळविल्याचा आरोप आहे. कल्याणच्या सिंडिकेट भागात असलेल्या या हॉस्पिटलच्या निधीचा अपहार तिने गेल्या वर्षी जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत अकाऊंटंट म्हणून केला होता.

## प्रवेश शुल्क आकारणाऱ्या खासगी शाळांवर कारवाई

**रांची :** पुनर्प्रवेशाचे आमिष दाखवून शुल्क आकारणाऱ्या खासगी शाळांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती झारखंड सरकारने मंगळवारी विधानसभेत दिली. खासगी शाळांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षणपाहण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांच्या नियमित बैठका घेण्यात येतील, अशी ग्वाही शिक्षणमंत्री रामदास सोरेन यांनी दिली. खासगी शाळांनी प्रवेश शुल्क आकारल्याबाबत भाजपचे आमदार प्रदीप प्रसाद आणि नवीन जयस्वाल यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सोरेन म्हणाले की, खासगी शाळांनी प्रवेशाच्या नावाखाली शुल्क आकारल्याबाबत जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार केल्यास सरकार नक्कीच कारवाई करेल.

## रोड रोलरच्या धडकेत ३ मजुरांचा मृत्यू

**ढेंकनाल (ओडिशा) :** ओडिशातील ढेंकनाल जिल्ह्यात एका बांधकाम साइटवर ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला. कामाक्ष्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेकुला गावाजवळ मालवाहू वाहनाने चार कामगारांना धडक दिल्याने अपघातात तिघांचा रोड रोलरखाली चिरडून मृत्यू झाला. कामाख्यानगरचे एसडीपीओ ज्ञानरंजन मिश्रा यांनी सांगितले की, हे कामगार कामाख्यानगर-ढेंकनाल रस्त्याच्या बांधकामात गुंतले होते.

# शुल्कप्रकरणी अमेरिकेचे पथक भारतात

### व्यापार करारासाठीची आज पहिली बैठक

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील शुल्काबाबत दिलेली २ एप्रिलच्या मुदतीपूर्वीच अमेरिकेचे एक पथक भारतात दाखल झाले आहे. ट्रम्प प्रशासनासोबत व्यापार कराराचा पहिला टप्पा अंतिम करण्यासाठी हे पथक भारतीय अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठका घेणार आहे. बुधवार, २६ मार्चपासून ही बैठक सुरू होणार आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत व्यापार कराराचा पहिला भाग पूर्ण करण्याबाबत दोन्ही देश चर्चा करतील. ट्रम्प यांनी नुकतीच भारतावरील आयात शुल्क वाढवण्याची धमकी दिली होती, त्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. परस्पर व्यापाराचे प्रश्न सोडविणे आणि शुल्कवाद कमी करणे हे अमेरिकन संघाचे ध्येय आहे.

या चर्चेत कराराची रूपरेषा आणि कालमर्यादा निश्चित केली जाणार असून, त्याची अंमलबजावणी दोन टप्प्यात होण्याची शक्यता आहे.



**व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्यावर भर**

● अमेरिकी दूतावासाच्या प्रवक्त्याने सांगितले की, भारत सरकारसोबत व्यापार आणि गुंतवणुकीच्या मुद्द्यांवर सुरू असलेल्या चर्चेला आम्ही महत्त्व देतो आणि रचनात्मक, समन्यायी आणि अग्रगामी दृष्टिकोनातून या चर्चेचा पाठपुरावा करण्यास उत्सुक आहोत. भारतीय अधिकाऱ्यांनी या कराराच्या फायद्यांविषयी मौन बाळगले आहे, परंतु एका अधिकाऱ्याने सांगितले की व्यापार करारामुळे शुल्क आणि नियमांमध्ये स्थैर्य येईल आणि आर्थिक एकात्मतेला चालना मिळेल. मजबूत व्यापार करारामुळे द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे ते म्हणाले. गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वॉशिंग्टन दौऱ्यात भारत आणि अमेरिकेने द्विपक्षीय व्यापार चर्चा पुन्हा सुरू करण्याचे लक्ष्य ठेवले होते आणि २०३० पर्यंत व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी (यूएसटीआर) मधील दक्षिण आणि मध्य आशियाचे सहाय्यक प्रतिनिधी ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील एक पथक भारताच्या वाणिज्य विभागाचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेणार आहे. सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत कराराचा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे या चर्चेचे उद्दिष्ट आहे.

ही चर्चा अद्याप प्राथमिक टप्प्यात असली तरी पहिल्या टप्प्यात दोन्ही देशांकडून शुल्क कपातीवर भर दिला जाऊ शकतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतीय बाजारपेठेतील लक्झरी कार, इलेक्ट्रिक वाहने, व्हिस्की आणि कृषी उत्पादनांवरील शुल्क कमी करण्यावर भर देत आहेत. या आठवड्याच्या अखेरीस तीन दिवसचालणारी चर्चा पूर्ण होईपर्यंत याबाबत अधिक स्पष्टता अपेक्षित आहे. ट्रम्प यांनी 'प्रत्युत्तरात्मक शुल्क' लादण्यासाठी २ एप्रिलही अंतिम मुदत दिली आहे, ज्याला ते आता 'मुक्ती दिन' म्हणून संबोधतात. मात्र, या वाटाघाटीदरम्यान अमेरिका शुल्क वाढवणार की नाही, हे स्पष्ट झालेले नाही.


दोन्ही देशांच्या नेत्यांच्या निर्देशानुसार भारत अमेरिकेसोबत व्यापार आणि आर्थिक क्षेत्रात आणखी सहकार्य करण्यास कटिबद्ध आहे, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. हे सहकार्य दोन्ही देशांची समृद्धी आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी आणि पुरवठा साखळी एकात्मता अधिक दृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

आम्ही अमेरिकेच्या शिष्टमंडळाबरोबर फलदायी आणि रचनात्मक चर्चेसाठी उत्सुक आहोत जेणेकरून आमचे द्विपक्षीय व्यापार आणि आर्थिक संबंध परस्पर फायदेशीर मार्गाने वाढविले जाऊ शकतील. आतापर्यंत व्हर्च्युअल माध्यमातून चर्चा होत होती, मात्र पहिल्यांदाच अधिकारी समोरासमोर बसून चर्चा करणार आहेत. मात्र, या आठवड्यात चर्चेची रूपरेषा आणि कार्यपद्धती यावर एकमत झाल्यानंतरच औपचारिक चर्चा सुरू होईल.

# आंबा महोत्सवला मोदींची उपस्थिती

### दिल्लीकरांना देवगड, रत्नागिरी चाखण्याची संधी

**नवी दिल्ली :** दिल्लीकरांना अस्सल देवगड व रत्नागिरी हापूस आंब्याची चव चाखता यावी, यासाठी नवीन महाराष्ट्र सदनात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन) दरम्यान होणार आहे. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या अभिनव संकल्पनेच्या मध्यमातून दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या आंबा महोत्सवाच्या उद्घाटनास उपस्थित राहण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मान्यता दिली आहे.





■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

ही अभिनव संकल्पना त्यांना आवडल्यामुळे त्यांनी या महोस्तवाच्या उद्घाटनास येण्याची तयारी दर्शवली आहे. उद्घाटन पंतप्रधान यांच्या हस्ते व्हावे यासाठी खासदार रविंद्र वायकर यांनी सोमवारी त्यांची भेट घेऊन निमंत्रण दिले. यावेळी पंतप्रधान यांनी प्रत्येक राज्यातील उत्पादित होणाऱ्या फळांना जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी राज्यांनी प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले.

कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात खूपच प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्याना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या उदात्त हेतूने खासदार रविंद्र वायकर यांनी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनमध्ये ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन) पर्यंत आंबा महोस्तवाचे आयोजन केले आहे.

या भेटी दरम्यान खासदार वायकर यांनी मुंबईतील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन गारगाई-पिंजाळ प्रकल्प पूर्ण करण्यात यावी अशी विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली, यावर रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाची जास्तीत जास्त व्याप्ती वाढवण्यावर अधिक भर देण्याची अवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले. तसेच एम्सच्या धर्तीवर मुंबईत एक रुग्णालय सुरु करण्यात यावे यामध्ये कॅन्सर रुग्णांवर उपचाराची सुविधा करण्यात यावी, अशी विनंती पंतप्रधान यांच्याकडे केली. यावर त्यांनी सकारात्मकता दर्शवली.

# फुटीरतावादी संघटनांपासून घेतली फारकत

### गृहमंत्री अमित शाह यांनी केले स्वागत

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावादाला प्रोत्साहन देणाऱ्या हुर्रियत कॉन्फरन्सच्या दोन गटांनी वेगळा मार्ग स्वीकारला आहे. हुर्रियतच्या जम्मू-काश्मीर पीपल्स मूव्हमेंट आणि डेमोक्रॅटिक पॉलिटिकल मूव्हमेंट या दोन गटांनी फुटीरतावादाशी संबंध तोडल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केली. मी त्यांचे स्वागत करतो, असे ते म्हणाले. अमित शहा यांनी याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास धोरणांना दिले.

अमित शाह म्हणाले की, आमच्या सरकारमध्ये विकास होत असून सर्वांना सोबत घेऊन हे काम केले जात आहे. त्यामुळे फुटीरतावादी कारवाया कमी झाल्या आहेत. एक्सवर ही माहिती देताना गृहमंत्र्यांनी लिहिले की, काश्मीरमध्ये फुटीरतावाद हा आता इतिहास झाला आहे. मोदी सरकारच्या एकात्मता धोरणामुळे जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद संपुष्टात येत आहे.

'जम्मू-काश्मीर पीपल्स मुव्हमेंट' आणि 'डेमोक्रॅटिक पॉलिटिकल मूव्हमेंट' या दोन हुर्रियत संघटनांनी फुटीरतावादाशी सर्व संबंध तोडण्याची घोषणा केली आहे. भारताची एकता बळकट करण्याच्या दिशेने उचललेल्या या महत्त्वपूर्ण पावलाचे मी स्वागत करतो आणि अशा सर्व गटांना आवाहन करतो की त्यांनी पुढे यावे आणि फुटीरतावाद कायमचा संपवावा. त्याचबरोबर इतर फुटीरतावादी संघटनांनीही शिकून एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास, शांतता आणि एक भारत या धोरणांचा विजय आहे. या महिन्याच्या सुरुवातीला केंद्र सरकारने हुर्रियत कॉन्फरन्सशी संबंधित दोन गटांवर बंदी घातली होती.

हे गट देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावाद वाढत असून दहशतवाद्यांनाही मदत मिळत आहे. या गटांमध्ये मीरवाइज उमर फारूक यांच्या नेतृत्वाखालील अवामी कृती समिती आणि जम्मू-काश्मीर इत्तेहादुल मुस्लिमीन यांचा समावेश आहे. इत्तेहादुलचे नेतृत्व मोहम्मद अब्बास अन्सारी करत आहेत. ते देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाला धोका बनत असल्याचे सांगत गृह मंत्रालयाने त्यांच्यावर बंदी घालण्याची अधिसूचना जारी केली होती. या दोन्ही संघटनांवर सरकारने बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यान्वये ५ वर्षांची बंदी घातली आहे.

# सिलिंडरच्या स्फोटाने मुंबईकर हादरले ; ८ जणांविरोधात गुन्हा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** धारावीतील सायन कॉलनीत सोमवारी रात्री झालेल्या सिलेंडर स्फोटामुळे भीषण आग लागली. नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ट्रकमधील अनेक सिलेंडरचा स्फोट झाला. शंभर मीटर परिसरातील वाहने जळून खाक झाली. जीवितहानी झाली नाही, पण मोठे आर्थिक नुकसान झाले.
पोलिसांनी २८३ सिलेंडर जप्त केले आहेत आणि कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मुंबईच्या धारावी परिसरामध्ये सिलेंडरचे स्फोट झाले आहेत. काल रात्री सिलेंडर नेणारा एक ट्रक धारावीतील एका भागात नो पार्किंगमध्येच पार्क करण्यात आला होता. आणि रात्रीच्या सुमारास त्या ट्रकमधील एका सिलेंडरचा स्फोट झाला, त्यामुळे ट्रकमधील इतर सिलेंडर्सचेही एकामागोमाग स्फोट झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. एकूण १० ते १२ सिलेंडरचा स्फोट झाल्याने मोठा भडका उडाला आणि आजूबाजूच्या शंभर मीटरपर्यंत उभ्या असलेल्या गाड्या तसेच ट्रकही आगीत भस्मसात झाला. २४ तासांपूर्वी भडकलेली ही आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. परिसरात उडालेल्या सिलेंडरचा शोध घेऊन सिलेंडरवर पाणी मारत कुलिंग करायचे काम सुरू आहे.

दरम्यान धारावी सिलिंडर स्फोट प्रकरणात ८ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. सिलिंडरची वाहतूक करणा-या टेम्पोचालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध पार्किंग करणा-या इतर ७ ते ८ जणांवर वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**गाझा पट्टी** गाझा शहरात इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यादरम्यान पॅलेस्टिनींनी स्वतःला वाचवण्यासाठी अशा पद्धतीने आश्रय घेतला.

# 'वन नेशन, वन इलेक्शन' किती दिवस रखडणार?




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** 'वन नेशन वन इलेक्शन'च्या दोन दुरुस्ती विधेयकांवरील संसदेच्या संयुक्त समितीचा कार्यकाळ पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत वाढविण्यात आला आहे. १७ डिसेंबर रोजी हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले होते. लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या दोन्ही विधेयकांवर विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संसदेच्या संयुक्त समितीचा कार्यकाळ यंदाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत मंगळवारी वाढविला. या संयुक्त समितीचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे खासदार पी. पी. चौधरी यांनी या समितीची मुदत वाढविण्याचा प्रस्ताव लोकसभेत मांडला, त्याला सभागृहाने आवाजी मतदानाने मंजुरी दिली.

लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची तरतूद करणारे संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२४ यावर संसदेच्या ३९ सदस्यीय संयुक्त समितीकडून विचार सुरू आहे. या समितीला अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले होते. गेल्यावर्षी १७ डिसेंबर रोजी हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील नरेंद्र मोदी सरकारने 'वन नेशन-वन इलेक्शन'वर उच्चस्तरीय समिती नेमली होती, या समितीने आपल्या अहवालात या संकल्पनेचे समर्थन केले होते. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने समितीच्या शिफारशी मान्य केल्या, सरकारने लोकसभेत दोन विधेयके मांडली, त्यापैकी एक म्हणजे घटना दुरुस्ती विधेयक. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी भाजपचे खासदार, माजी कायदा राज्यमंत्री पी. पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ३९ सदस्यीय संयुक्त संसदीय समिती स्थापन केली होती. १९५१ ते १९६७ या काळात लोकसभा, विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या. १९९९ मध्ये विधी आयोगाच्या अहवालातही याची शिफारस केली होती. २०१५ मध्ये संसदीय समितीच्या ७९ व्या अहवालात एकाच वेळी निवडणुका घेण्याचे मार्ग सांगितले होते.

● एकाच वेळी निवडणुका घेतल्यास खर्च आणि वेळ दोन्ही वाचतील, असे सरकारचे म्हणणे आहे. याशिवाय विकासकामांना गती देण्यात येणार आहे. मात्र, विरोधकांना ते पटत नाही. हे राज्यघटनेच्या रचनेचेच उल्लंघन आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

# दळणवळण झोन आरक्षण रद्द करा

## आमदार आपल्या दारी उपक्रमात आमदार शंकर जगताप यांना साकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका विकास आराखड्यातील - वाहतूक दळणवळण झोन रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. पुणे लोणावळा लोहमार्गाच्या दापोडी ते भेगडेवाडी रेल्वे हद्दी नंतर २५ मीटर वाहतुक दळवण हे शासनाच्या योजना पुस्तिकेत दर्शविण्यात आलेले आहे. सदरचे वाहतूक दळणवळण झोन आरक्षण रद्द करण्याची मागणी शाम भोसले यांनी केली आहे.

या संदर्भात आयोजित आमदार आपल्या दारी उपक्रमात आमदार शंकर जगताप यांना भोसले यांनी बाधितांचे वतीने साकडे घातले आहे. आरक्षण नाशिक - पुणे नियोजित लोहमार्गासाठी असल्याचा उल्लेख केला आहे. मात्र दळणवळण जागा आरक्षित ठेवणे बाबत अद्याप निर्णय झालेला नाही असा उल्लेख करण्यात आला आहे. रेल्वे विभागाकडे याबाबत माहिती मागितली असता त्यांच्या कडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. महानगरपालिका देखील समाधान कारक उत्तर देत नसल्याने सदरचा झोन रद्द करण्याची मागणी होत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दापोडी ते किवळे रेल्वे हद्दी नंतर दळणवळण झोन साठी जागा उपलब्ध नाही, पिंपरी चिंचवड प्रारुप विकास योजनेतील नकाशात रावेत ते किवळे हद्दी पर्यंत वाहतूक दळणवळण झोन दर्शविला आहे. या परिसरातील शेतकरी बांधवांच्या यापुर्वी काही जमिनी बी.आर.टी रस्त्यासाठी बाधित झालेल्या आहेत. उरलेले क्षेत्र वाहतूक दळणवळण झोन आरक्षणात दर्शविलेले असल्यामुळे शेतकरी भुमीहिन झाले आहे. तसेच किवळे हा परिसर महापालिकेत समाविष्ट होण्यापुर्वी रेल्वे हद्दी नंतर नागरिकांनी ग्रामपंचायत व जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने बांधकामे केली आहेत. महापालिकेने रेल्वे हद्दी नंतर २० ते २५ फुट रस्त्याचे काम करून वृक्षारोपण केले आहे.

भविष्यात वाहतूक दळणवळण झोन रद्द न झाल्यास या भागातील २८५ बांधकामे बाधित होतील सदर आरक्षण रद्द करण्याची मागणी आहे. सन २०२१ मध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शाम भोसले यांनी समक्ष भेटून निवेदन दिले होते. या निवेदना नुसार अजित पवार यांनी आयुक्त यांना सदर आरक्षणा बाबत उचित कार्यवाही करण्या संदर्भात सुचना दिल्या होत्या. मात्र सुचने नुसार प्र.उपसंचालक नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका या कार्यालयाने उपसंचालक नगररचना विकास योजना विशेष घटक व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांना सुचना या कार्यालयास दिनांक १७ सप्टेंबर २०२१ आणि २४ फेब्रुवारी २०२३ रोजी सुचना देवून यावर अद्यापही कार्यवाही झाली नाही. नुकतेच महानगरपालिका अतिक्रमण विभागाने रावेत मध्ये कार्यवाही केली आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



### अनावश्यक आरक्षण

● किवळे - रावेत येथील अनावश्यक वाहतूक दळणवळण आरक्षण रद्द करण्याची मागणी असून आमदार आपल्या दारी या कार्यक्रमात येथील स्थानिक नागरिक शाम भोसले यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांना निवेदन देऊन लक्ष वेधले आहे. यावेळी आरक्षण रद्द करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले असल्याचे भोसले यांनी सांगितले.

# सुर्यकांत मोरे यांच्या तपासणीचे आदेश







■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हवेली तालुका मोजणी कार्यालयानंतर पुणे जिल्हा अधीक्षक कार्यालयाला शासनाने दणका दिला असून जिल्हा अधीक्षक सुर्यकांत मोरे यांच्याही कारभाराची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. जमाबंदी आयुक्त कार्यालयाच्या अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक सरिता नरके यांनी गोपनीय कार्यालयीन आदेश पारित केले आहेत.

हवेली मोजणी कार्यालयाचा गलथान कारभार चव्हाट्यावर आणल्यानंतर अधिक्षक अमर पाटील यांच्या कामकाजाची तपासणी करण्याचे आदेश नुकतेच पारित झाले आहेत. त्याचबरोबर पुणे जिल्हा अधिक्षक सुर्यकांत मोरे यांच्या कार्यालयीन कामकाजाची तपासणीही सुरू झाली आहे. त्यामुळे 'दाल मे कुछ काला है, या पुरी दाल ही काली है" अशी म्हणण्याची वेळ मोजणी कार्यालयाच्या कारभारामुळे आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे नागरिकांनी मोजणी कार्यालयाच्या गलथान कारभार, अनियमितता व हवेलीतील मोजणीबाबत तक्रारी केल्या होत्या. यावरून महसूलमंत्री बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलीच तंबी दिली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी आपल्या कारभारात कोणतीही सुधारणा केली नसल्याने नागरिकांनी अधिकाऱ्यांच्या कारनाम्याबाबत महसूलमंत्री महोदयांकडे पुन्हा तक्रारी दाखल केल्या आहेत.

पुणे जिल्हा भूमि अभिलेखचे जिल्हा अधिक्षक सुर्यकांत मोरे यांनी पुण्यात कार्यभार स्विकारल्यापासून ते आजपर्यंत केलेल्या कामकाजाची तपासणी सुरू झाली आहे. हवेली तालुका आणि पुणे जिल्हा अधिक्षकांची तपासणी सुरू झाल्याने खएकच ळबळ उडाली असून कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये सन्नाटा पसरला आहे.

विहीत कालावधीत अर्धन्यायीक अपील प्रकरणे निकाली न काढणे, अपील प्रकरणांतील अनियमितता तसेच तालुका उप अधिक्षकांच्या कामकाजावर देखरेख न ठेवणे, कार्यालयीन कामकाजात विलंबाचा प्रकार, मावळ व हवेली तालुका उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील अनागोंदी कारभाराबाबत ठोस निर्णय न घेणे, या गोष्टी सुर्यकांत मोरे यांना भोवणार असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. जिल्हा अधीक्षक सुर्यकांत मोरे यांच्या कारभाराची तपासणी शासननियुक्त पथकाकडून सुरू आहे.

या पथकामध्ये छत्रपती संभाजीनगरचे नगर भूमापन अधिकारी समीर दाणेकर, जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालयाचे अधीक्षक संजय कुंभार, राजू रोकडे, वरिष्ठ लिपीक सचिन एकबोटे, उप अधीक्षक भूमि अभिलेख चांदवड मुख्यालय सहाय्यक दयानंद जोशी आणि नाशिक विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेखचे दुर्बिण भूमापक प्रशांत भोंडे यांचा समावेश आहे.

# प्रशांत बेडसे यांची खेड तहसीलदारपदी नियुक्त करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) व मुंबई उच्च न्यायालयाने तहसीलदार ज्योती देवरे यांची खेड येथील नियुक्ती ही नियमबाह्य असल्याने रद्द केली होती. तसेच त्या ठिकाणी पुन्हा तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांची नियुक्ती करण्याचे आदेश सरकारला दिले होते. त्याविरोधात ज्योती देवरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने सदर याचिकेमध्ये कोणतेही तथ्य नसल्याने, याचिका दाखल करून घेण्यास पात्र नाही असे नमूद करीत ती फेटाळली आहे. त्यामुळे बेडसे यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सुनावणीदरम्यान महाराष्ट्र शासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केली आहे की नाही? याबाबत देखील सर्वोच्च न्यायालयाने विचारणा केली. त्यावेळी अंमलबजावणी झाली नसल्याचे सांगितले असता त्यावर आश्चर्य व्यक्त केले.

तसेच शासकीय नोकराने या पद्धतीने अमुक एकच ठिकाणी काम करायचे आहे, असे नमूद करीत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणे, हे देखील आश्चर्यकारक असल्याचे सुनावणी दरम्यान न्यायमूर्तींनी नमूद केले. तसेच माजी आमदार दिलीप मोहिते यांनी बेडसे पाटलांची खेड येथून बदली करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना देखील पक्षकार केले होते. परंतु, न्यायालयात त्यांनी कोणतीही बाजू मांडली नाही.

न्यायालयाचा आदेश हा बंधनकारक असल्याने त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने देखील बेडसे पाटलांच्या बाजूने निर्णय दिला असल्याने महाराष्ट्र शासन आता किती दिवसात त्याची अंमलबजावणी करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



### ज्योती देवरे यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

# जारकवाडीत उन्हाळ्यात ओढ्याला पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** डिंभे धरणाच्या (हुतात्मा बाबू गेनू जलसागर ) उजव्या कालव्याला सध्या पाण्याचे आवर्तन चालू असून आंबेगाव तालुक्या बरोबरच शिरूर तालुक्यातील काही गावांना या पाण्याचा फायदा होतो. त्यामुळे उजव्या कालव्याच्या दोन्ही बाजूनी शेतकयांना शेतीसाठी या पाण्याचा मोठा फायदा होत आहे. या कालव्याचे बऱ्यापैकी अस्तरीकरण झाल्याने, पाणी वाया जात नाही. पण काही शेतकरी रात्री-अपरात्री पोटचाऱ्या फोडून ओढ्याला किंवा शेतामध्ये किंवा तळ्यात, नाल्यात पाणी सोडतात. त्यामूळे लाखो लिटर पाणी मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

ऐन दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.ऐन दुष्काळी परिस्थितीत पाणी वाया जात असताना जलसंपदा विभागाचे कर्मचारी अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते.

### जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, वडगावपीर, मांदळेवाडी, शिरदाळे या ठिकाणी पाण्याचे टॅंकर सुरू आहेत. तर पहाडधरा-ठाकरवाडी व धामणी येथे पाण्याचे टॅंकर सुरू करण्याचे प्रस्ताव दिले असून, लवकरच येथेही टॅंकर सुरू होतील.

त्यामुळे या गावातील नागरीकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे लाखो लिटर पाणी वाया जाते. एका बाजूला पाणी-पाणी करणारे नागरीक-शेतकरी तर दुसरीकडे पाण्याचा अपव्यय करणारे शेतकरी, अशी परिस्थिती आहे. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना पाण्याचे महत्व तरी कधी कळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सध्या लोणी, वडगावपीर, मांदळेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई जाणवत आहे. त्यामूळे खऱ्या अर्थाने या भागात पाणीबाणी असल्याचे पहायला मिळते. एका बाजूला शेतकरी, ग्रामस्थांसह जनावरांचा पाणी प्रश्न भेडसावत आहे, तर दुसरीकडे पाण्याचा अपव्यय असे चित्र पहायला मिळत आहे.

● डिंभे धरणाच्या उजव्या कालव्याला पाणी आले की, पोटचारी व कालव्यातून पाणी बाहेर काढण्यासाठी जणू काही शेतकर्यांमध्ये स्पर्धाच सुरू होते.त्यामुळे अशा शेतकऱ्यांवर जलसंपदा विभागाने कारवाई करणे गरजेचे आहे. काही ठिकाणी पोटचारी व ओढ्याला पावसाळ्यासारखी परस्थिती पहायला मिळत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असताना, जलसंपदा विभाग याकडे का दुर्लक्ष करतो, असा प्रश्न शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना पडला आहे.



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील जारकवाडी येथे ओढ्यातून वाहणारे पाणी.

# जेजुरीतील उद्योजकांवर प्रशासनाचा अंकुश नाही




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** तीर्थक्षेत्र जेजुरी येथील औद्योगिक वसाहतीमधील कारखानदार/उद्योजकांवर प्रशासनाचा कोणताही अंकुश राहिलेला नसून मनमानी पद्धतीने अनेक बेकायदेशीर पणे कारखानदार व उद्योजक आपले काम करीत आहेत. नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असून कुशल अकुशल महिला व पुरुष कामगारांना आरोग्यासह सोयीसुविधा, कामाच्या वेळा, आदींबाबत पिळवणूक होत असल्याच्या अनेक तक्रारी येत असून, स्थानिक भूमिपुत्रांना डावलून बाहेरच्या ठेकेदारांना येथे विविध सेवा पुरविण्याचे काम दिले जाते. कारखानदार तुपाशी आणि भूमीपुत्र उपाशी अशी येथील अवस्था झालेली आहे. याबाबत औद्योगिक विकास महामंडळ जेजुरी शाखेसह सर्व कारखान्यांना निवेदन देण्यात आले असून, पुढील आठवड्यात बैठकीचे आयोजन करण्यात यावे अन्यथा जिसा संघटनेसह संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, त्याला सर्वस्वी जबाबदार प्रशासन व कारखानदार राहतील असा इशारा यात देण्यात आला आहे. या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष व जिसा संस्थेचे अध्यक्ष संदीप जगताप, संपत कोळेकर, महेश उबाळे, नजीर शेख, अजय जगताप, विक्रम फाळके, विकास झगडे, बाळासाहेब जरांडे, महेश ढमाळ, विकास पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जेजुरी एमआयडीसी मध्ये कंपनीच्या गेटबाहेर धोकादायक पद्धतीने मॅन्युफॅक्चरिंग केले जाते. तसेच अवजड वाहने रस्त्यावर लावल्यामुळे मोठे अपघात झाले आहेत. यामध्ये काही कामगार मृत्यूमुखी पडले असून, काहीजण कायमचे अपंग झाले आहेत. गरजवंताला प्लॉट न देता काही कारखानदारांना पाच ते सहा प्लॉट वितरित करण्यात आले आहेत. तर काही उद्योजकांनी १० वर्ष होऊनही उत्पादन सुरू न करता ते बंद ठेवले आहेत. काही उद्योजक मनमानी पद्धतीने काम करत असून कामगारांची पिळवणूक होत आहे. कामगार कायद्यानुसार किमान वेतन दिले जात नाही, महिलांना आरोग्याच्या सोयी सुविधा नाहीत. कामगारांच्या वाहनांना सुरक्षित पार्किंग नाही, रस्त्यावर धोकादायक वाहने लावलेली असतात, कंपनीमध्ये चहा, अल्पोपहार, अपघात विमा आदी सुविधा नाहीत. वैद्यकीय तपासण्या करण्यात येत नाहीत, कामांच्या तासांचे मूल्यमापन नाही अशा अनेक तक्रारी यात करण्यात आल्या आहेत.

## गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न



**उरुळी कांचन :** युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून करीत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील पदव्युत्तर विध्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नाला अभिवादन करावे असेच हे कार्य आहे, त्याचा विस्तार महाराष्ट्राच्या बाहेर देखील व्हावा असे प्रतिपादन आयुष मंत्रालयाचे सल्लागार वैद्य मनोज नेसरी यांनी केले. ते युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या वतीने कै. डॉ. बी.एन.देशपांडे व डॉ.विनोद डोंबे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला निवृत्त पोलीस महासंचालक प्रबोध कुमार,आयएएस अधिकारी सागर डोईफोडे, डॉ.महेश दळे,आयपीएस अधिकारी डॉ.केतन पाटील, सागर खरडे, राज देशमुख, संस्थेचे अध्यक्ष डॉ.विक्रम गायकवाड, संस्थेचे विश्वस्त डॉ. समीर ननावरे, डॉ. कल्पेश वाणी, रोहन बोरसे, डॉ. सोनल भालेराव, डॉ.मयुर पुस्तके, डॉ. प्रशांत पाटील तसेच सन्मानार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक द्वारे नोव्हेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बीएएमएस परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच संस्थेच्या मोफत यूपीएससी, एमपीएससी मार्गदर्शन व शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम नुकताच हडपसर येथे संपन्न झाला. यावेळी बीएएमएस अंतिम परीक्षेत विद्यापीठात प्रथम तीन क्रमांक मिळवणारे डॉ. काथार तेजस, डॉ. खडकीकर आदिती आणि डॉ. साक्षी राठोड तसेच विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या डॉ. अश्विनी पैठाणे (कायचिकित्सा) आणि डॉ. खडकीकर आदिती (शल्यतंत्र) हे गौरवाचे मानकरी ठरले. संस्थेच्या मार्गदर्शनातून यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या सोहम तेबरीवाल, शुभम थिटे, मंगेश खिलारे, प्रितेश बाविस्कर यांचा तसेच एमपीएससी परीक्षेत यश संपादन केलेल्या विनय पवार, धनंजय घुले,कु. किशोरी घोरपडे आणि मंगेश सुरुशे यांचा गौरव करण्यात आला. सीएपीएफ (CAPF) परीक्षेत यश मिळवलेल्या अक्षय कारंडे, तुषार जाधव, ओंकार शिंदे आणि पीएसआय परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तुषार खेतमाळीस व अजित पाटील यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे विश्वस्त डॉ. समीर ननावरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन डॉ. निशिगंधा अभंग यांनी केले.

## दोनशे झाडे अज्ञाताने जाळून टाकली



**सासवड :** सासवड येथील सोपान नगरच्या जवळ सुमारे साडेचारशे विविध प्रकारची झाडे आम्ही झाडकरी या मित्रांनी लावली होती. याचे संगोपन देखील चांगले केले होते. सोमवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात इसमांनी या ठिकाणी आग लाऊन सर्व झाडे जाळुन टाकली. या आगीत एकही झाड वाचले नाही, अशी माहिती मिलींद गुजर यांनी दिली. या झाडांचे आम्ही सर्वांनी अत्यंत जिवापाड संगोपन केले होते. यात आंबा, जांभूळ विविध प्रकारची झाडांच्या बिया आणुन त्यांचे संगोपन केले होते. झाडे मोठी झाल्यामुळे ट्रिप पध्दतीने पाणी सोडले जात होते. ही झाडे पावसाळ्यात विविध ठिकाणी लावण्याचा आमचा प्रयत्न होता. मात्र, कोणीतरी अज्ञाताने सोमवारी रात्री उशिरा या ठिकाणी आग लागली यात ट्रिप सह सर्व झाडे जळून खाक झाली.

## पिकअप चोरणारे तिघे जेरबंद




**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई, ता. शिरुर येथील आयुब तांबोळी यांनी घरासमोर लावून ठेवलेली पिकअप चोरीला गेल्याची घटना घडल्याने खबाल उडाली असता सदर चोरीतील आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले असून असिफ अब्दुल रफिक, मुजाहिद उर्फ बबलू नजीर मलिक व सद्दाम अकबर शेख असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. कान्हूर मेसाई येथील आयुब तांबोळी यांनी त्यांची पिकअप रात्री घराशेजारी ग्रामपंचायत समोरील मोकळ्या जागेमध्ये लावून ठेवली असताना रात्री अज्ञात चोरट्यांनी ती चोरून नेली. याबाबत आयुब शेखलाल तांबोळी (४७, रा. कान्हूर मेसाई ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. नाशिक येथे एक संशयित पिकअप मिळून आल्याने नाशिक पोलिसांनी पिकअप चालकांकडे चौकशी केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांना संशय आला. ही पिकअप शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीतून चोरी गेल्याचे समोर आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चौधर व पोलीस हवलदार संतोष शेळके यांनी नाशिक येथे जात असिफ अब्दुल रफिक, मुजाहिद उर्फ बबलू नजीर मलिक व सद्दाम अकबर शेख या तिघांना अटक करत पिकअप जप्त केली.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनांची गरज



**शिक्रापूर :** मनुष्याला चांगले आरोग्य टिकवण्यासाठी पर्यावरण चांगले राहणे गरजेचे असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनांची गरज असल्याचे प्रतिपादन शिरुर वनविभागाच्या वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांनी केले आहे. करंदी, ता. शिरुर येथील विद्या विकास मंदिर येथे शिरुर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक वन दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे बोलत होत्या, याप्रसंगी नियतक्षेत्र वनअधिकारी बबन दहातोंडे, वन्यजीव बचाव पथकाचे गणेश टिळेकर, शेरखान शेख, अमोल कुसाळकर, पोलीस पाटील वंदना साबळे, प्राचार्य दत्तात्रय बनसोडे यांसह आदी उपस्थित होते. यावेळी मानवी जीवनामध्ये वनांचे महत्व काय तसेच वृक्षतोडीचे दुष्परिणाम तसेच वृक्ष लागवडीचे फायदे याबाबतची माहिती वनपरीमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांनी उपस्थित विद्यार्थांना सांगितली, तर वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख यांनी बिबट व मानव संघर्ष टाळण्याबाबतच्या उपाय योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्राचार्य दत्तात्रय बनसोडे यांनी आभार मानले.

## सासवड पालिकेचे मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण यांना पदोन्नती



**सासवड :** सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ कैलास नागेश चव्हाण यांची राज्य शासनाकडून नुकतीच श्रेणी एक पदी पदोन्नती झाली आहे. पदोन्नती झाली असली तरीही ते सासवड नगरपालिकेचाच कारभार पाहणार आहेत. मुळचे कुर्डुवाडी गावचे डॉ कैलास चव्हाण वैद्यकीय क्षेत्रातील बीएएमएस पदविका प्राप्त असुन सुरुवातीचा काहीं काळ त्यांनी आरोग्य विभागांत काम केले आहे.मुख्याधिकारी म्हणून त्यांनी यापूर्वी पन्हाळा, कवठे महांकाळ, आष्टा आदी ठिकाणी कार्यभार पाहिला आहे. ऑगस्ट २०२३ पासुन ते सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या पदोन्नती बद्दल सासवड येथील अनेक सामजिक संस्थांनी व पालिका कर्मचाऱ्यांनी त्यांचें अभिनंदन केले आहे. सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने देखील डॉ कैलास चव्हाण यांचे नुकतेच पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले आहे. प्रशासकीय कारभार असुनही शहराच्या विकासासाठी अधिक भरीव काम केले जाईल, असा विश्वास डॉ चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

## शिरुरला स्कॉलरशीप विशेष तालुका दर्जा देण्याची मागणी



**शिक्रापूर :** शिरुर तालुक्याला स्कॉलरशीप विशेष तालुका दर्जा देण्यासाठी आपण लढणार असून शिरुरच्या सर्व शिक्षकवृंदांसह स्कॉलरशीप प्राप्त विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन योजनांसाठी हा लढा असल्याचे शिरुर तालुका पद्वीधर शिक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्षा शोभा तिकांडे यांनी जाहीर केले. शिरूर तालुका पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या शिरुर तालुकाध्यक्षपदी शोभा तिकांडे यांची नुकतीच निवड करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष अनिल पलांडे यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले असून यावेळी बोलताना शिरुरला स्कॉलरशीप विशेष तालुका दर्जा देण्याची मागणी आपण करणार असल्याचे शोभा तिकांडे यांनी सांगितले. शिरुर तालुक्याचे नाव स्कॉलरशीप निकालाबाबत राज्यभर आहे. गेली चाळीस वर्षे हे स्थान अबाधित ठेवण्याचे काम शिरुरच्या प्राथमिक शिक्षकांनी केले, मात्र त्यांचेसाठी शासनाकडून अद्याप कुठलीही विशेष योजना सुरू केली नसून कुठल्याही प्रोत्साहनात्मक बाबी केलेल्या नाही. शिक्षक दिवसरात्र काम करुन विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न करीत असताना राज्यातील इतर शिक्षकांप्रमाणेच गणले जाते. याच पार्श्वभूमीवर शासनाने संपूर्ण शिरुरकर शिक्षकांची दखल घ्यावी, त्यांच्यासाठी खास योजना राबवाव्या, शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणात खास सवलती देण्यासाठी धोरण आखावे यासाठी शिरूर तालुका पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना प्रयत्न करणार असून आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकालात या कामाला गती मिळावी म्हणून प्रदेशाध्यक्ष अनिल पलांडेंसह सर्व संघटना पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे शोभा तिकांडे यांनी सांगितले.

## किरकोळ वादातून युवकाच्या खुनाचा प्रयत्न

**शिक्रापूर :** कारेगाव, ता. शिरुर येथे जुन्या किरकोळ वादातून युवकाचा कोयत्याने पोटावर व डोक्यावर वार करत खून करण्याचा प्रयतन केल्याची घटना घडली. रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गिरीश कराळे, रोहन बोटे, शंकर करंजकर, ओंकार देशमुख, ओम चव्हाण, रोहन गाडे यांसह दोन अनोळखी युवक यांच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारेगाव येथील सौरभ राठोड व यश धनवटे हे दोघे गप्पा मारताना ओंकार देशमुख, गिरीश कराळे सह काही युवक तेथे आले त्यांनी सौरभ राठोड यास तू ओंकारकडे खुन्नस देऊन का बघितले, ओंकार कोण आहे तुला माहित आहे का, तुला जिवंतच ठेवत नाही असे म्हणून त्यांच्याजवळील कोयत्याने सौरभच्या पोटावर, डोक्यावर वार केले. यश धनवटे सौरभला सोडवत असताना, आलेल्या सर्वांनी यशला देखील शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली. या घटनेत सौरभ श्रीराम राठोड (१७, रा. अमरदिप सोसायटी, कारेगाव ता. शिरुर) हा जखमी झाला असून, याबाबत यश राजू धनवटे (१७, रा. कारेगाव ता. शिरुर) या युवकाने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

# यशवंतच्या जमीन विक्रीला स्थगिती द्या

## शेतकरी सभासद कृती समितीचे साखर आयुक्तांना निवेदन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी कांचन :** गेल्या महिन्यात थेऊर (ता. हवेली) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जमीन विक्री प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, आता या प्रस्तावाला शेतकरी सभासद कृती समिती सदस्यांनी विरोध दर्शवत 'यशवंत'च्या जमीन विक्रीच्या निर्णयाला स्थगिती देण्यात यावी. तसेच संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी साखर आयुक्ताकडे लेखी स्वरूपात निवेदन देऊन केली आहे. हे निवेदन विकास लवांडे, अलंकार कांचन, लोकेश कानकाटे, राजेंद्र चौधरी यांनी सदस्यांच्या वतीने दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, यशवंत कारखान्यावर गेल्या काही महिन्यांपासून संचालक मंडळ कार्यरत आहे. सदर कारखाना गैरव्यवहार, गैरकारभारामुळे आलेल्या कर्जबाजारीपणामुळे मागील १४ वर्षापासून बंद अवस्थेत आहे. कारखान्याच्या मालकीची थेऊर येथील ९९. २७ एकर जमीन पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीला विक्री करण्याच्या मनमानी निर्णयाला आमचा विरोध असून त्या निर्णयाला स्थगिती द्यावी. कारखान्याच्या रयत सर्व सेवा संस्थेकडून कारखान्याला जवळ पास १३-१४ कोटी रुपये येणे आहे. हे अनेक लेखा परीक्षण अहवालात व कलम ८३ कलमच्या चौकशी अहवालात स्पष्ट झालेले आहे.

त्याशिवाय १० डिसेंबर २०१४ रोजी प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत दाखल केलेल्या अहवालानुसार तत्कालीन अध्यक्ष व संचालक मंडळावर जबाबदारी निश्चिती केलेली आहे. त्यानुसार दिनांक ०६/०२/२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ अन्वये वसूली प्रमाणपूर नोटिस संबंधितांना प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग यांनी बजावली होती. सदर रक्कम जवळपास १४ कोटी रुपये वसुलीसाठी आपल्या कार्यालयाकडून अथवा विद्यमान अध्यक्ष संचालक मंडळाने कणतीही कार्यवाही केलेली नाही. विद्यमान अध्यक्ष व संचालक मंडळाने सभासदांना विश्वासात न घेता मनमानी कारभार चालविला असून सहकारी कायदे, नियम पायदळी तुडविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

यशवंत कारखान्याच्या मालकीची जमीन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे. त्यांच्या संमती शिवाय कारखान्याची जमीन विक्रीस काढली आहे. कारखान्याला एकूण देणी किती आहेत? यांचा कोणताही ताळेबंद हिशोब सभासदांना अद्यापपर्यंत दिलेला नाही. तसेच जाहीर लिलाव पद्धत वापरली नाही. सभेपूर्वी नियमानुसार कारखान्याच्या सभासदांना अंदाजपत्रक, ताळेबंद, सभेची नोटीस दिलेले नाही. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात गटवार सध्या किती ऊस क्षेत्र आहे यांची अधिकृत कोणतीही माहिती संचालक मंडळांनी जाहीर केलेली नाही.

कारखान्याला विविध प्रकारची २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त येणी आहेत. त्याबाबत काहीच कार्यवाही न करता केवळ कारखान्याची मालकीची राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात असलेली जमीन मनमानी पद्धतीने विक्रीस काढली आहे. दोन दिवसांत या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी मागणी देखील निवेदनातून करण्यात आलेली आहे.

# पुरंदर विमानतळासाठी ड्रोन सर्व्हेक्षण

## एमआयडीसी करणार सर्व्हे, दरनिश्चितीसाठी मदत





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुरंदर विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीचा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) वतीने ड्रोन सर्व्हे करण्यात येणार आहे. मोजणीपूर्वी हा सर्व्हे केला जाणार आहे. त्यामुळे नेमक्या बागायत, जिरायत जमिनी किती आहेत, त्याचे प्रमाण किती, झाडे किती, इमारती, विहिरी किती आणि कोठे आहेत याची माहिती या सर्व्हेतून मिळणार असून दरनिश्चिती करताना त्याचा फायदा होणार आहे.

पुरंदर विमानतळासाठी वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधून २७५३.०५३ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी २६७३.९८२ हेक्टर क्षेत्र हे खासगी क्षेत्र आहे. तसेच ७९.०७१ हेक्टर क्षेत्र हे सरकारी जमीन आहे. खासगी क्षेत्र २६७३.९८२ हेक्टर क्षेत्रापैकी ४२८.२१ हेक्टर हे जिरायत क्षेत्र आहे.

तसेच २२३५.३५२ हे बागायत क्षेत्र आहे. तसेच १०.४२ हेक्टर क्षेत्र हे बिनशेती आहे. त्यामुळे या जमिनींचा ड्रोन सर्व्हे करून प्रत्यक्षात त्याची माहिती संकलित केली जाणार आहे. त्यानंतर एमआयडीसी आणि भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त मोजणीवेळी ड्रोन सर्व्हेच्या अहवालातील बाबींची पडताळणी केली जाणार आहे.

यापूर्वी पुणे रिंगरोडसाठी सुद्धा जमिनीचे संपादन करण्यापूर्वी ड्रोन सर्व्हे करण्यात आला होता. त्या वेळी संपादित करण्यात येणाऱ्या गावांमधील झाडे, इमारती, जमिनीच्या प्रतवारीची माहिती सर्व्हेद्वारे घेण्यात आली होती. तोच प्रयोग आता पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनापूर्वी केला जाणार आहे. दरम्यान, पुरंदर विमानतळासाठी संपादित केल्या जाणाऱ्या सात गावांमध्ये ७५.५० हेक्टर क्षेत्र हे वन जमीन आहे. हे वनक्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वर्ग करण्यासाठी फॉरेस्ट डायव्हर्जन प्रपोजल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.



**पुरंदर विमानतळासाठीच्या सात गावांतील जमिनीचे संपादन करण्यासाठी भूसंपादन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश अद्याप काढण्यात आले नाहीत. ते आदेश आल्यानंतर जमिनीची संयुक्त मोजणीसाठी शुल्क भरण्यास एमआयडीसीकडून कार्यवाही केली जाईल. तत्पूर्वी ड्रोन सर्व्हे करून तेथील जमिनीची माहिती घेतली जाणार आहे.**

— **जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी

# सभापतीपदी राजेंद्र नरवडे

## उपसभापतीपदी नागवडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** शिरूर तालुका खरेदी-विक्री संघाच्या सभापतीपदी महायुतीचे राजेंद्र नरवडे, तर उपसभापतीपदी बाळासाहेब नागवडे यांची बिनविरोध निवड झाली असल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी अरुण साकोरे यांनी केली. खरेदी-विक्री संघावर महायुतीचा प्रभाव राहिल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) ला मोठा फायदा झाला आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार अशोक पवार यांच्या चार समर्थकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे अशोक पवार यांच्या गटाला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

**शिरूर तालुका खरेदी-विक्री संघ**

सोमवारी सकाळी ११ ते ११:३० दरम्यान, सभापती व उपसभापती पदासाठी अर्ज दाखल करण्याची वेळ होती. राजेंद्र नरवडे आणि बाळासाहेब नागवडे यांच्याच उमेदवारी अर्जाची नामनिर्देशन पत्रे आल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली. ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक जिल्हाध्यक्ष अण्णा महाडिक यांनी बंद लिफाफ्यात दोन नावे आणली होती. त्यानुसार, सभापतीपदी राजेंद्र नरवडे, तर उपसभापतीपदी बाळासाहेब नागवडे यांची नावे निश्चित करण्यात आली.

ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर (माऊली) कटके, माजी आमदार पोपटराव गावडे, माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील, राष्ट्रवादी युवकचे माजी जिल्हाध्यक्ष स्वप्नील गायकवाड, मानसिंग पाचुंदकर, तालुकाध्यक्ष रवींद्र काळे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे, बाजार समितीचे माजी संचालक आबाराजे मांढरे, भाजपा माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल पाचर्णे, बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार, पंचायत समितीचे माजी सभापती विश्वास कोहोकडे, राजेंद्र कोरेकर, माजी सभापती शरद कालेवार, माजी सरपंच प्रकाश थोरात, श्रीनिवास घाडगे, आणि श्रुतिका झांबरे यांनी मेहनत घेतली.

### महायुतीचा पुढील निर्धार

● या निकालानंतर महायुतीने बाजार समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही एकजूट दाखवून विजय मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट), भाजपा आणि शिवसेना (शिंदे गट) यांनी एकत्र राहून पुढील निवडणुकीत विजय मिळवण्याचे लक्ष्य ठरवले आहे.


# सरपंचपदासाठी सोडत जाहीर

## कारभारी निवडण्यासाठी जोरदार चुरस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२४ ते ४ मार्च २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची सरपंच पदाची आरक्षण सोडत निवडणूक २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे जाहीर केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्या गावांच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत निवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

सरपंचाची निवड ही थेट जनतेतून आहे. त्यामुळे या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी चुरस वाढली आहे. स्थानिक राजकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुका या महत्त्वपूर्ण आहेत. ग्रामीण भागातील राजकारणावर पकड मजबूत करण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीत रस घेतला आहे. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होताच सरपंच आणि सदस्यपदासाठी कोणते उमेदवार सरस ठरू शकतात याची चाचपणी करण्यास सुरुवात झाली आहे.



ग्रामपंचायतची निवडणूक ही कुठल्याही राजकीय पक्षाच्या चिन्हावर लढविली जात नसली तरी स्थानिक स्तरावर पॅनल तयार करून या निवडणुका राजकीय पक्षांच्या नेतृत्वात लढविल्या जातात. त्यातच सरपंचाची निवड ही थेट जनतेतून करण्यात येणार आहे. त्यामुळे या निवडणुकीला अधिक महत्त्व आले आहे. निवडणुका जाहीर झाल्यानंतर ग्रामीण भागातील राजकारण तापले असून गावातील चौका-चौकात आता निवडणुकीच्या चर्चा सुरू झाल्याचे चित्र आहे.

भावी उमेदवार जनसंपर्क वाढवित असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. ग्रामपंचायत निवडणुकांमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापले आहे. भावी उमेदवारांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर भावी उमेदवारांनी भाऊ राम-राम म्हणण्यास सुरुवात झाली आहे. कधी राम-राम न घेणारे आता आर्वजून राम-राम घेत आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर भावी उमेदवारांनी मतदार याद्या गोळा करून आपल्या वॉर्डात किती मतदार आहेत. यापैकी किती जणांचे मतदान आपल्याला मिळू शकते याचा अंदाज घेत सरपंच की सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा याची तयारी करण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे.

# आळंदीकरांना रोज पाणी मिळण्यासाठी प्रयत्न करेन

## मुख्याधिकारी माधव खांडेकर यांचे आश्वासन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** गेल्या दोन दिवसांत सर्वांनी पाण्याची समस्या सांगितली. हा दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वाचा मुद्दा आहे. गेल्या पाच-सहा महिन्यांत ही समस्या निर्माण झाली असून, मी तिच्या मुळाशी जाण्याचा आणि दीर्घकालीन उपाय शोधण्याचा प्रयत्न करेन. माझ्या कार्यकाळात आळंदीकरांना रोज पाणी मिळेल, यासाठी प्रयत्न करेन, असं आश्वासन नूतन मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिलं.

आळंदी नगरपरिषदेचे नवे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी कार्यभार स्वीकारताच सक्रियपणे कामाला सुरुवात केली आहे. हरिपाठ उद्यानाजवळील ह.भ.प. गुरुवर्य शांतीनाथ महाराज मठाकडे जाणाऱ्या रस्त्यावर १३ नव्या पथदिव्यांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आलं. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात झालेल्या या सोहळ्यास पालिकेचे बांधकाम अधिकारी सचिन गायकवाड, विष्णूकुमार शिवचरण, संजय घुंडरे, प्रकाश कुऱ्हाडे, दीपक पाटील, उमेश कुऱ्हाडे, मनोज कुऱ्हाडे, संकेत वाघमारे, अनिल वाघमारे, अशोक कांबळे, अशोक उमरगेकर, रंगनाथ महाराज, माऊली बनसोडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी खांडेकर यांचा सत्कार केला.

सन्मानापूर्वी बोलताना खांडेकर म्हणाले, वडिलांच्या पुण्याईने मला तीर्थक्षेत्र आळंदीत सेवा करण्याची संधी मिळाली. पहिल्यांदा आलो तेव्हा माऊलींच्या संजीवन समाधीवर नतमस्तक झालो आणि त्यांना सेवा करण्याची संधी मागितली. माऊलींनी ती संधी दिली असून, मी ती सोनं करेन. मागील मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी शहरात विकासाचा मजबूत पाया घातला; त्याचप्रमाणे सर्वांना सोबत घेऊन मी काम करेन. त्यांनी पाणी समस्येवर विशेष भर दिला. खांडेकर यांनी १५-२० दिवसांत या समस्येचा उलगडा करून रोज पाण्यासाठी प्रयत्न करण्याचं आश्वासन दिलं. सरकारकडून निधी आणून ही समस्या मिटवेन, असंही ते म्हणाले. नव्या मुख्याधिकाऱ्यांच्या या सक्रियतेमुळे आळंदीकरांमध्ये आशा निर्माण झाली आहे.

## टेस्टी मँगो मफिन्स

रसगंधा

स ध्या आंब्याचा हंगाम ऐन भरात आहे. आंबाशौकिन रसाच्या जेवणावर मनसोक्त ताव मारत आहेत. पण केवळ रसावर समाधान न मानता आंब्यापासून अन्य पाककृतीही बनवून पहाव्यात. करुन पहा अशीच एक भन्नाट रेसिपी...

**साहित्य –** आठ टेबलस्पून चॉकलेट चिप्स, चार टेबलस्पून मँगो पल्प, एक वाटी मैदा, अर्धा टीस्पून बेकिंग पावडर, चिमुटभर खाण्याचा सोडा, अर्धा कप कंडेन्स्ड मिल्क, चार टेबलस्पून तूप, व्हॅनिला इसेन्स इत्यादी.



**कृती –** एका बाऊलमध्ये मैदा, बेकिंग पावडर, खाण्याचा सोडा हे सर्व साहित्य मिसळून घ्यावं. दुसऱ्या बाऊलमध्ये कंडेन्स्ड मिल्क, मँगो पल्प, तूप, व्हॅनिला इसेन्स घ्यावं आणि ढवळून एकजीव करावं. आता पहिल्या बाऊलमधील मिश्रण या बाऊलमध्ये मिसळावं. त्यात दोन टेबलस्पून पाणी मिसळावं. हे मिश्रण ब्लेंडरच्या सहाय्याने चांगलं ब्लेंड करावं. मफिन्सच्या मोल्डमध्ये पेपर कप ठेवावे. त्यात ब्लेंड केलेलं मिश्रण भरावं. त्यावर चॉकलेट चिप्स पसरावे. २०० अंश से.ला ओव्हन प्रीहीट करुन घ्यावा. त्यात १५ मिनिटं मफिन्स बेक करुन घ्यावेत. बाहेर काढून सर्व्ह करावेत.

---

## ‘ती’ च्या हाती उद्योगाची दोरी

मानिनी

**कोणत्याही व्यवसायाची निवड करताना खरेदी, विक्री, नफा-तोटा, याचा अभ्यास हवा, तसेच अवास्तव कर्ज न घेता खेळतं भांडवल वापरून व्यवसायाला उभारी यायला हवी. सोबत जोखीम पत्करायचं धाडस तर हवंच आणि इतरांना बरोबर घेण्याची इच्छादेखील हवी. हा हिशेबच आपल्या व्यवसायाचं प्रतिबिंब दाखवतो असे कमल कुंभार सांगतात तेव्हा त्यांच्यातील दारिद्र्याच्या चिखलातही कमळ फुलवण्याच्या क्षमतेचा परिचय होतो.**



उ द्योजिका म्हणून कमल कुंभार यांचा जीवनपट उलगडून बघताना अनेकींना प्रेरणा मिळू शकते कारण अठराविश्व दारिद्र्य पाचवीला पुजलेलं असतानादेखील त्यांनी जागेपणी व्यावसायिक होण्याची स्वप्नं पाहिली आणि ती सत्यात उतरवली.

कमल विष्णु कुंभार या उस्मानाबादच्या राहणाऱ्या. उस्मानाबाद म्हणजे दुष्काळी प्रदेश. घरात हलाखीची परिस्थिती... तशात जेमतेम दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केलं. मग घरच्यांनी आत्येभावाशी लग्न लावून दिलं. सासरही गरीबच होतं. पती शेतकरी होता. अशिक्षीत होता. हे लग्न फार काळ टिकलं नाही. मग पोट भरण्यासाठी त्यांना मजुरीची कामं करावी लागली; परंतु स्वावलंबी आणि स्वाभिमानी बाणा मात्र त्यांना शांत बसू देत नव्हता. आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचं ठरवलं. यात आईचा उत्तम पाठिंबा होता. सुरुवातीला त्यांना केवळ पाचशे रुपयांत बांगड्या विकण्याचा व्यवसाय सुरु केला. त्यानंतर विविध प्रकारचे आणखी सहा उद्योग सुरु केले. जागतिक महिला दिनानिमित्त २०२१ मध्ये उद्योजक म्हणून त्यांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'नारी शक्ती' पुरस्काराने गौरविण्यात आलं. आज त्यांचा पोल्ट्री व्यवसाय तेजीत असून 'एकता प्रोड्युसर कंपनी'च्या त्या संस्थापक आहेत. सुरुवातील गावोगावी पायी फिरून बांगड्या विकणारी महिला आज लाखो रुपयांमध्ये नफा कमवत आहे.

रोजच्या मजुरीतून वाचवलेल्या पैशातून त्यांनी दोन हजार रुपये भांडवलामध्ये व्यवसाय सुरु केला. २००७ पर्यंत या व्यवसायाचं रुपांतर सूक्ष्म उद्योगात झालं. २०१७ मध्ये त्यांना मायक्रो-एंटरप्राईझ श्रेणीमध्ये 'सीआआय फाउंडेशन वुमन एक्झाम्प्लर' पुरस्कार मिळाला. त्या स्वतः स्वावलंबी बनल्या आहेतच खेरीज आपल्यासारख्या अनेक महिलांनादेखील त्यांनी स्वावलंबी बनवलं आहे. रोजगार आणि लघुउद्योग चालवण्यासाठी आवश्यक असलेलं प्रशिक्षण देऊन त्यांनी दुष्काळग्रस्त भागातील सुमारे तीन हजारपेक्षा जास्त महिलांना प्रोत्साहन दिलं.

उस्मानाबादसारख्या जिल्ह्यात यशस्वीरित्या पोल्ट्रीफार्म चालवून त्यांनी महिलांचं उत्पन्न वाढवलं. कमल सांगतात, 'पूर्वी मी फक्त स्वतःचा विचार केला; पण इतर महिलांशी संवाद साधायला सुरुवात केली तेव्हा जाणवलं, की स्वतःपेक्षा इतरांकडे लक्ष देण्याची गरज आहे. खेरीज आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी एकापेक्षा जास्त व्यवसाय करायला हवे आणि चिकाटी बाळगायला हवी. तसंच यशस्वी व्यवसायाचं सूत्र म्हणजे रेकॉर्ड मेंटेन केलं पाहिजे. बरेचदा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला सहा महिन्यांच्या आताच तो बंद्ही करतात.

तसं न करता सातत्य असायला हवं. बारीक सारिक गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं.' असे सांगणाऱ्या कमल बांगडी व्यावसायिक, आशासेविका, ऊर्जा सखी, 'सोलर बल्ब'शी संबंधित व्यवसाय, रेडीमेट टॉयलेट तयार करणं तसंच ग्रामीण भागात टॉयलेट बांधून देणं अशा अनेक कामांसाठी ओळखल्या जातात. आसपासच्या चार गावात त्यांनी सुमारे शंभर टॉलेट बांधून दिली आहेत.

या जोडीने त्या कुकुटपालन, शेळी पालनाचा व्यवसायही करतात. या निमित्तानं त्यांना इंडोनेशिया, न्यू यॉर्कला जाण्याची संधी मिळाली. त्यांनी दोन वर्षात पाच हजार महिलांना शेतीपूरक व्यवसायाचं ट्रेनिंग दिलं, त्यापैकी तीन हजार सहाशे महिलांनी स्वतःच्या व्यवसायाला सुरुवातही केली आहे. आणखी नउ हजार महिलांना शेतीपूरक व्यवसायाचं प्रशिक्षण देवून सक्षम करायचा त्यांचा मानस आहे. त्यांची ही इच्छा पूर्ण होवो हीच सदिच्छा.

---

## पेरणी करा सकारात्मकतेची

पालकत्व

आ जकाल काही मुले नेहमी तणावाखाली असतात. कोणतेही काम करताना त्यांना ताण येतो. मात्र बरेचदा यामागील कारण त्यांच्या घरातील वातावरणाच्या परिणामस्वरुपात दडलेले असते. घरातील वातावरणाचा मुलांच्या विकासावर दीर्घ परिणाम होत असल्याचे मानसशास्त्र सांगते. त्यामुळे मुलांच्या वागण्यातील फरक लक्षात घेत घरातील वातावरण नेहमी हसते-खेळते आणि आनंदाने भरलेले ठेवणे ही पालकांबरोबरच घरातील सर्व सदस्यांची जबाबदारी असल्याचे लक्षात घ्यायला हवे. त्यांनी मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचे मनोबल वाढवले पाहिजे जेणेकरुन मुलांमधील आत्मविश्वास वाढेल. अशा परिस्थिती, मुलांना स्मार्ट आणि आत्मविश्वासू बनवण्यास मदत करणाऱ्या काही टिप्सही जाणून घेऊ या.

✽ **नेहमी सकारात्मक रहा–** कोणत्याही प्रकारच्या यशामागे आपली सकारात्मकता असते. त्यामुळेच मुलांना नेहमी सकारात्मक राहण्यास प्रेरित करा आणि त्यांच्या काही कृती अयशस्वी झाल्या तरीही त्यांना प्रोत्साहित करा. विजय आणि पराभव हा जीवनाचा भाग आहे आणि त्यांनी त्यातूनच शिकले पाहिजे, हे विचार मुलांच्या मनावर बिंबवा.

✽ **मुलांना कल्पना समजण्यास मदत करा–** मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांच्यात आत्मपरीक्षणाची भावना निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी आपण त्यांना त्यांचे विचार आणि शक्ती समजून घेण्यास मदत केली पाहिजे. ध्येयमंत्र आणि ध्यान हे यादृष्टीने उपयुक्त ठरणारे मुद्दे आहेत. त्यांची जीवनमूल्ये समजून घेण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी सर्वप्रथम कामावर श्रद्धा आणि प्रयत्नात सातत्य ठेवण्याचे महत्त्व समजून सांगा. शक्ती आणि विश्वासाची भावना जागृत झाल्याचे कोणतेही काम अशक्य राहात नाही.



✽ **अध्यात्माची ओळख करून द्या–** मुलांचे मानसिक आरोग्य अधिक लवचिक ठेवण्यासाठी त्यांचा आध्यात्मिक विकासही महत्त्वाचा आहे. यामुळे मुलांमध्ये विचारशक्ती विकसित होते तसेच त्यांना योग्य आणि अयोग्य यातील फरक समजण्यास मदत होते. सहाजिकच यामुळे त्यांच्यामध्ये निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते.

✽ **आपल्यातील सर्वोत्तम ते मुलांना द्या–** नेहमी मुलांमध्ये सर्वोत्तम कार्य करण्याच्या भावनेला प्रोत्साहन द्या. त्यात आपण यशस्वी व्हाल की नाही याची काळजी करू नका, असे त्यांना सांगा. त्यांना जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी तयार करा आणि जे काही करत आहात त्याचे यशात रुपांतर करणे हेच जगणे असते, हे विचार त्यांच्यामध्ये विकसित करा. यशासाठी सराव केल्याने मुलांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होते आणि निर्णय घेण्याची क्षमता देखील वाढते.

---

## मोशन सिकनेसचा त्रास?

उ न्हाळ्याच्या सुट्ट्या लागताच अनेक कुटुंब सहलीचे नियोजन करू लागतात. परंतु कुटुंबातील एखाद्या सदस्याला प्रवासात उलट्यांचा त्रास होण्याची समस्या असतेच. प्रवासात वारंवार उलट्या होणाऱ्या लोकांना चक्कर येणे, थकवा, पोटदुखी, ॲसिडिटी इत्यादी समस्यांचाही त्रास होऊ लागतो. पण काही गोष्टींचा अवलंब करुन तुम्ही हा मोशन सिकनेस टाळू शकता.

✽ **मानसिक भीतीचा प्रभाव–**

लक्षात घ्या

प्रवासादरम्यान उलट्या होणे, चक्कर येणे किंवा अस्वस्थ वाटणे हे मोशन सिकनेसमुळे होते. हा प्रवासाचा मानसिक परिणाम असल्यामुळे मार्गस्थ होताच त्यांना उलट्या होऊ लागतात. अशा वेळी मोशन सिकनेसची भीती आधी मनातून काढून टाकणे गरजेचे आहे. योग्य तयारीने प्रवास सुरु केला तर मोशन सिकनेस सहज टाळता येऊ शकतो.

✽ **प्रवास करण्यापूर्वी औषध घ्या–** मोशन सिकनेसची समस्या दूर करण्यासाठी प्रवास सुरु करण्याआधी दोन तास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सिनारिझिन, मेक्लिझिन, सायक्लिझिन किंवा डायमेनहायड्रीनेट यापैकी कोणतेही एक औषध घेऊ शकता. इच्छित असल्यास, आपण कानाच्या मागे स्कोपोलामाइन पॅच देखील लागू करु शकता. हा पॅच ७२ तास काम करतो.

✽ **हायड्रेटेड रहा–** वारंवार उलट्या झाल्यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. हे टाळण्यासाठी प्रवासादरम्यान इलेक्ट्रोलाइट्स आणि इतर द्रवपदार्थ घेत राहा.

✽ **विश्रांती आवश्यक आहे–** प्रवासादरम्यान योग्य स्थितीत बसले नसाल तरीही उलट्या होण्याची शक्यता असते. त्यामुळे डोक्याला विश्रांती देणाऱ्या स्थितीत बसा. कारमधील आरामदायी वाटते अशा आसनावर बसा. कमी हालचाल जाणवेल अशा आसनावर बसल्यास मोशन सिकनेस कमी होतो.

✽ **झोपण्याचा प्रयत्न करा–** लांबच्या प्रवासाला जायचे असेल तर रात्रीची वेळ निवडा.

---

## असं वापरा सनस्क्रीन

स्कीन केअर

ता पमानवाढीने कहर केला आहे. उन्हाचा हा तडाखा त्वचेसाठी त्रासदायक असतो. अतिनील किरणांमुळे त्वचेच्या कॅन्सरसारखा घातक आजार होण्याची शक्यता बळावते. त्यामुळे बाहेर पडताना सनस्क्रीन लोशनचा वापर योग्य ठरतो. पण सनस्क्रीन लावण्याची योग्य पद्धत कोणती हेदेखील जाणून घ्यायला हवं.

✽ सनस्क्रीन लावण्याआधी मॉईश्चरायझर लावा. यामुळे त्वचेतील आर्द्रता टिकू राहते शिवाय उन्हापासून संरक्षणही होतं.

✽ अनेकजणी बाहेर पडण्याच्या थोडा वेळ आधी सनस्क्रीन लावतात. पण ही पद्धत अयोग्य आहे. बाहेर पडण्याच्या किमान वीस मिनिटं आधी लोशन लावावं. सनस्क्रीनमधील घटक त्वचेवर सक्रिय होण्यास जवळपास वीस मिनिटांचा कालावधी लागतो हे लक्षात ठेवावं.

✽ अनेकीना बाहेरुन आल्यानंतर लगेचच चेहरा धुण्याची सवय असते. पण हे योग्य नाही. बाहेरुन आल्यानंतर शरीराला सामान्य तापमानाशी जुळवून घ्यायला पुरेसा अवधी द्यायला हवा. त्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवावा. बाहेरुन आल्यानंतर लगेच चेहरा धुतल्याने रक्तवाहिन्या विस्तारण्याचा धोका संभवतो.

✽ चेहरा धुतल्यानंतर टोनर लावणं चांगलं. त्यामुळे त्वचेच्या रोमछिद्रांमधील धूळ निघून जाण्यास मदत होते.



✽ भर दुपारी बाहेर पडल्यानंतर काही वेळातच त्वचा टॅन होते. होरपळल्याने काळी पडते. पण टॅनिंगसाठी लगेचच ट्रीटमेंट घेऊ नका. त्याऐवजी फेस मास्कची मदत घ्या. त्यामुळे त्वचेला थंडावा मिळण्यास मदत होईल.

✽ सनस्क्रीन चोळून चोळून लावू नये. हलक्या हाताने त्वचेवर पसरावं.

✽ डोळ्यांच्या आसपासच्या भागावर सनस्क्रीन लावणं टाळावं.

---

## कामाचा ताण जाणवतोय?

ऑफिस ऑफिस

जी वनात ताणतणाव नसणारी व्यक्ती शोधूनही सापडत नाही. प्रत्येकाच्या ताणाची कारणं वेगवेगळी असतात इतकंच! असं असलं तरी कॉर्पोरेट क्षेत्रातील लोक इतरांपेक्षा अधिक तणावात असल्याचं एका सर्वेक्षणातून समोर आलं आहे. वेळीच उपचार घेतले नाहीत तर तणावाचं रुपांतर क्रॉनिक तणावात होण्याची शक्यता असते. म्हणूनच कामाचा ताण जाणवत असेल तर काही बाबी लक्षात ठेवणं गरजेचं आहे.

कामाबद्दल अतिविचार करण्यापेक्षा योग्य नियोजनावर भर द्यावा. तुमच्या जीवनशैलीला कामाचा ताण प्रभावित करत असेल तर काही वेळासाठी ब्रेक घेणं उत्तम ठरतं. या काळात स्वतःसाठी वेळ द्या. वेळेत काम संपवण्यात नेमक्या कोणत्या अडचणी येतात याची नोंद घ्या. कामाचा प्राधान्यक्रम ठरवताना कोणतीही गफलत होत नसल्याची खात्री करा. कोणत्या कामाला किती वेळ पुरेसा आहे, याचा अंदाजही तुम्ही घेऊ शकता. यासाठी ऑफिसमध्ये



गेल्यानंतर लगेचच आजच्या दिवशी किती कामं उरकायची आहेत याचा अंदाज घ्या. या कामासाठी पाच–दहा मिनिटांचा वेळ पुरेसा आहे. त्यानंतर नियोजनाप्रमाणे काम संपवण्यास सुरुवात करा. काम सुरु करताना वेळ कुठे वाया जातो हे तपासून बघा. कामाला उशीरा सुरुवात करणं, सोशल मीडियावर बराच वेळ घालवणं, सहकाऱ्यांशी गप्पा मारणं हे तुमच्या कामातील कच्चे दुवे असू शकतात. काही प्रमाणात या सर्व बाबी गरजेच्या असल्या तरी यासाठी विशिष्ट वेळेची मर्यादा असणं गरजेचं असतं.

काही प्रमाणात ऑफिसमधील वातावरणाचाही कामावर परिणाम होत असतो. त्यामुळे आसपासचं वातावरण सकारात्मक ठेवण्याचा प्रयत्न करा. बरेचदा ऑफिसमध्ये राजकारण होत असतं. तुम्हाला टार्गेट केलं जात असतं. पण अशा बाबींचा कामावर किती परिणाम होऊ द्यायचा हे ठरवणं तुमच्या हातात असतं. त्यामुळे नकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा. नवीन कामाची जबाबदारी घेताना मनाची सकारात्मक स्थिती जपा. त्यामुळे कामाचा ताण जाणवणार नाही.

---

## मांड दुसरा डाव

समुपदेशन

मी बत्तीस वर्षांची युवती असून एका मोठ्या कंपनीमध्ये कार्यरत आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर मी नोकरी करायचं ठरवलं. शिकत असतानाही पार्ट टाईम जॉब करत असल्यामुळे माझ्याकडे एक चांगली धनराशी जमली आहे. जगभ्रमंती करायची, एखादी जग फिरायचं हे माझं स्वप्न असून त्यासाठीच मी पैसे साठवत आहे. पण आईबाबांना माझ्या या स्वप्नाशी काहीही घेणं-देणं नाही. पहिले लग्न असफल ठरलेलं असूनही, माझा घटस्फोट झालेला असूनही ते दुसऱ्या लग्नासाठी तगादा लावत आहेत. पण आता मला संसाराच्या व्यापात पडायचं नाही. काय करू? आईबाबांना कसं समजावू.




– सखी, तू लहान वयात बरचं काही सोसलं आहेस. अध्यतिच संसाराचा डाव मोडल्याचं दुःख अनुभवलं आहेस. त्यामुळे पुन्हा या नात्याचं ओझं नको, ही तुझी मानसिकता मी समजू शकते. जगभ्रमंतीचं स्वप्नही समजण्यासारखं आहे. या मानसिक स्थितीतून बाहेर येण्यासाठी काही काळ जावा लागेल जो तू घ्यावास हेदेखील मी सांगते. पण त्यानंतर भावी आयुष्याचा विचार करावाच लागेल. तुझ्यापुढे उभं आयुष्य आहे. या दीर्घ प्रवासात सुयोग्य जोडीदाराची साथ मिळाली तर तू चांगल्या पद्धतीने जगण्याचा आनंद घेऊ शकशील. आयुष्याला नवा अर्थ देवू शकशील. एक डाव फसला म्हणजे दुसरा फसलेच असं नाही. शिवाय तुझं लग्नाचं वयही उलटून गेलेलं नाही. त्यामुळे भावनेच्या आधारे नव्हे तर बुद्धीच्या आधारे विचार कर. चांगला जोडीदार शोध. स्वतःसाठी काही काळ घेतलास तरी हरकत नाही, पण आयुष्य एकटीने काढू नकोस असंच मी सांगेन.

---

### मेक अप मंत्रा

#### उन्हाळ्यातील सौंदर्यसाधना

उन्हाळ्यात घराबाहेर पडताना सनस्क्रीनचा अवश्य वापर करा. हे सूर्याच्या तीव्र अतिनील किरणांपासून त्वचेचं संरक्षण करते. तुम्ही घरच्या घरी एसपीएफ ३० सनस्क्रीन वापरू शकता. पण, बाहेर जात असाल तर फक्त एसपीएफ ५० सनस्क्रीन वापरा. रात्री झोपण्यापूर्वी त्वचेवर उपयुक्त घटकांचा मसाज अवश्य करा. त्वचेला ग्लो आणण्यासाठी नाईट रुटीन खूप प्रभावी सिद्ध होते. तुम्ही नित्यनियमाने एलोवेरा जेल वापरू शकता. यामध्ये असणारे घटक त्वचेची उत्तम काळजी घेतात.



### शॉपिंग मॅनिया

#### साबणाचा अट्टहास नको

साबण वापरल्याशिवाय त्वचा स्वच्छ होत नाही, असा अनेकींचा समज असतो. पण साबणाचा जास्त वापर करणे चेहऱ्याच्या त्वचेसाठी चांगले नाही, हे सर्वप्रथम जाणून घ्या. साबणामध्ये काही रसायने त्वचा निर्जीव बनवतात. इतकेच नाही तर त्यांच्या वापराने त्वचा कोरडी होते आणि त्वचेतील नैसर्गिक तेल आणि सीबम नाहिशी झाल्यामुळे आर्द्रताही कमी होते. अशी त्वचा खूप लवकर खराब होऊ लागते. हे टाळण्यासाठी साबणाऐवजी घरगुती वस्तूंचा वापर करून चेहऱ्याची त्वचा निरोगी ठेवू शकता. बाजारात काही नैसर्गिक फेसवॉश उपलब्ध आहेत. त्यामुळे त्वचा कोरडी आणि निर्जीव न होता उत्तम संरक्षण होते. त्यामुळेच नैसर्गिक घटकांनी युक्त फेस प्रॉडक्ट वापरण्याकडे कटाक्ष ठेवा. त्याआधी आपली त्वचा कोणत्या प्रकारातील आहे, हे जाणून घ्या.

### किचन क्वीन

#### आर्थिक आघाडी सशक्त हवी

प्रत्येक महिलेने अर्थनियोजनाचे महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने आणीबाणीच्या खर्चासाठी तुमच्या बजेटमध्ये काही पैसे नेहमी बाजूला ठेवण्यास विसरु नका. हे पैसे खर्च झाले नाहीत तर पुढील महिन्याच्या निधीत जमा करुन तुम्ही हळूहळू चांगली रक्कम जमा करू शकता. कोणतेही विलंब शुल्क भरणे टाळण्यासाठी सर्व बिले वेळेवर भरा. मोबाईल खूप वापरत असाल तर बऱ्याच सुविधा देणारा बिलिंग प्लान आवर्जून घ्या. पोस्ट ऑफिसची छोटी कामे स्वतः करण्याचा रिवाज ठेवा. आजकाल पोस्ट ऑफिसमध्ये महिलांसाठी अनेक योजना सुरु आहेत. त्यातील योग्य त्या कोणत्याही योजनेत सहभागी होऊन तुम्ही बचत आणि गुंतवणूक करू शकता.



---

## साडीमध्ये दिसा स्लीम

स्टाईल स्टेटमेंट

भा रतीय स्त्रीच्या मनात साडीला अनन्यसाधारण स्थान आहे. कोणत्याही खास प्रसंगी आवर्जून साडी नेसली जाते. पण साडीमध्ये लठ्ठपणा उठून दिसतो, अशी अनेकींची तक्रार असते. अर्थात बहुतांश फॅशन डिझायनर्स हा दावा खोडून काढतात. काही सोप्या ट्रिक्सचा अवलंब केल्यास साडीमध्येही स्लीम दिसणं सोपं होतं. या विषयी अधिक जाणून घेऊ या.

✽ साडीचं फॅब्रिक कसं आहे यावर बांधा कसा दिसेल हे ठरतं. टस्सर, रॉ सिल्कसारखं फॅब्रिक हेवी लूक देऊ शकतं तर जॉर्जेट, शिफॉन, क्रेप यासारखं हलकं फॅब्रिक स्लिम लूक देऊन जातं.

✽ जाडी लपवायची तर साडी निवडताना काळजी घ्यावी. रुंद काठ असणाऱ्या साडीमध्ये बांधा बेढील दिसू शकतो. याउलट अरुंद काठाची साडी स्लिम लूक देण्यास मदत करते.

✽ हात जाड असतील तर साडी नेसल्यावर हेवी लूक मिळतो. म्हणूनच फुगीर हात असणाऱ्या महिलांनी शक्यतो स्लीव्हलेस किंवा आखूड बाह्याचे ब्लाऊज घालणं टाळावं. त्याऐवजी लांब किंवा ३/४ स्लीव्हजचे ब्लाऊज घालावेत.

✽ ब्लॅक, ब्राऊन,ब्लू यासारखे गडद रंगी तुम्हाला स्लीम आणि ट्रीम दिसायला मदत करतील.

✽ पेटीकोट कसा आहे यावरही लूक ठरतो. पेटीकोट जास्त ढगळ किंवा साडीच्या रंगाशी मिसमॅच असेल तर सगळा लूक बिघडतो. यामुळे पेटीकोटची निवड करताना फिटींग योग्य आहे का, याची खात्री करून घ्यावी.









# दिलीप गावितची सुवर्णधाव!

## खेलो इंडिया पॅरा स्पर्धा, दिल्ली २०२५; साईवर्धन, साहिल, चैतन्यला रौप्य



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये ॲथलेटिक्स प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंची दमदार कामगिरी सुरूच आहे. नाशिकच्या दिलीप गावित याने पुरुषांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-47 या प्रकारातून सुवर्णपदक पटकावले. कोल्हापूरचा साईवर्धन पाटील, कराडचा साहिल सय्यद, चैतन्य पाठक हे रूपेरी यशाचे मानकरी ठरले.

जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर स्पर्धेतील ॲथलेटिक्सचा थरार सुरू आहेत. नाशिक जिल्ह्याच खेळाडू असलेल्या दिलीपने 48.76 सेकंद वेळेत शर्यत जिंकली. हरयाणाच्या जसबीरने (49.88 सेकंद) रौप्य तर गुजरातच्या भाविककुमारने (51.08) कांस्यपदक प्राप्त केले.



पुरुषांच्या एफ 37 लांब उडी प्रकारात कोल्हापूरच्या साईवर्धन पाटीलला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अवघ्या 34 सेंटीमीटरने त्याचे सुवर्णपदक हुकले. साईवर्धनने 11.59 मीटर लांब उडी मारली. साईवर्धन हा पॅरालिम्पिकमधील पदकविजेता सचिन खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. खेलो इंडिया तील त्याचे हे पहिलेच पदक ठरले.

कराडच्या साहिल सय्यद याने पुरुषांच्या गोळाफेकमध्ये 7.82 मीटरचा टप्पा गाठत रौप्यपदकाचा मान पटकावला. यात तमिळनाडूच्या इम्रान रसूलने (29.20) सुवर्ण जिंकले. पुरुषांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-13 प्रकारात चैतन्य पाठक याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याने 54.99 सेकंदात हे अंतर पार केले.

### प्रशिक्षक वैजनाथ काळे यांच्यामुळे घडला दिलीप

● नाशिक जिल्ह्यातील तोरण डोंगरी या आदिवासी पाड्यातील रहिवासी असलेल्या दिलीपचा वयाच्या दहाव्या वर्षी अपघात झाला. घरासाठी सरपण गोळा करण्याकरिता फांद्या तोडण्यासाठी तो झाडावर चढला होता. त्यावेळी टोल जाऊन झाडावरून पडल्याने त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्याने त्याचा हात कोपरापासून कापावा लागला.

## इम्पॅक्ट प्लेअरमुळे आयपीएलमध्ये धावांचा पाऊस?

**पुणे :** आयपीएलमधील इम्पॅक्ट प्लेअर नियमावर अनेकांकडून टीक केली जाते आहे. या नियमामुळेच आयपीएलमध्ये फलंदाजांना फायदा होत असून गोलंदाजांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला जातो आहे. यादरम्यान बीसीसीआयने हा नियम २०२७ पर्यंत लागू राहणार असल्याचंही स्पष्ट केलं आहे. अशातच आता चेन्नई सुपरकिंग्जचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनीनेही यासंदर्भात भाष्य केलं आहे.महेंद्र सिंह धोनीने जिओ-हॉटस्टारशी बोलताना इम्पॅक्ट प्लेअर नियमावर प्रतिक्रिया दिली. आयपीएलमध्ये धावांचा पाऊस पडतोय त्याला कारण केवळ इम्पॅक्ट प्लेअर नसून खेळाडूंची मानसिकता बदलली आहे. तसेच परिस्थिती ही फलंदाजासाठी अनुकूल झाली आहे, असं तो म्हणाला.



"हा नियम जेव्हा लागू झाला तेव्हा मला वाटलं होतं की खरंच याची गरज आहे का? पण एका अर्थाने मला याचा फायदाही झाला, तसंच नुकसानही झालं आहे. मी यष्टीरक्षण करतो, त्यामुळे मी इम्पॅक्ट प्लेयर होऊ शकत नाही. मला पूर्ण सामना खेळावा लागतो. अनेक जण म्हणतात की या नियमामुळे धावसंख्या वाढली आहे. पण माझ्या मते याला कारणीभूत खेळपट्टी आणि खेळाडूंच्या वाढलेला आत्मविश्वास आहे", असे तो म्हणाला. पुढे बोलताना, "फक्त एका अतिरिक्त फलंदाजामुळे धावा होत नाहीत, तर संघाच्या मानसिकतेमुळे होतात. या नियमामुळे संघांना एका जादा फलंदाज खेळण्याची हमी असते, त्यामुळे ते आक्रमकपणे खेळतात, त्यातून धावा होतात. तसेच खेळाडूंचा आत्मविश्वासही वाढतो", असंही धोनीने सांगितलं.

## CSK vs RCB सामन्याच्या तिकिटाची किंम्मत तब्बल ७५०० रूपये

**मुंबई :** शुक्रवारी, २८ मार्च रोजी चेपॉक मैदानावर चेन्नई सुपर किंग्ज व रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू या पारंपारिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये सामना रंगणार आहे. दोन्ही संघांनी आपला पहिला सामना जिंकला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू संघाने रजत पाटीदारच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्सला पराभूत केले. तर ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वात चेन्नई सुपर किंग्ज संघाने मुंबई इंडियन्सला हरवले. त्यामुळे दोन विजयी संघांमधील सामन्यासाठी प्रेक्षक प्रचंड उत्सुकता दाखवत आहे. सामन्याच्या तिकीट विक्रीला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

वेगवेगळ्या आसन व्यवस्थेनुसार तिकीटांची किंमत देखील वेगवेगळी आहे. C/D/E Lower येथील आसनांची किंमत १७०० रूपये आहे. 1/J/KUpper २५०० रूपये, I/J/KLower ४००० रूपये, C/D/EUpper ३५०० रूपये, तर , KMK Terrace येथील किंमत ७५०० रूपये आहे.

## माजी टेनिसपटू प्रशांत सुतार 'एमएसएलटीए'चे नवे अध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माजी राष्ट्रीय टेनिसपटू, प्रमाणित टेनिस प्रशिक्षक आणि दक्षिण आशियातील एकमेव एटीपी २५० टेनिस स्पर्धा असलेल्या टाटा ओपन महाराष्ट्रचे माजी स्पर्धा संचालक प्रशांत सुतार यांची महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या (एमएसएलटीए) अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

सांगलीतुन खेळाडू म्हणून टेनिस कारकिर्दीची सुरुवात करणारे श्री सुतार यांनी भरत ओझा यांच्याकडून अध्यक्षदाची सुत्रे नुकतीच स्विकारली. ओझा यांची महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या व्यवस्थापकीय परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली आहे. एसएसएलटीए परिषदेचे सदस्य असलेले सुतार महाराष्ट्र सरकारशी जुळवून समन्वय साधून डेव्हिस करंडक, एटीपी, डब्ल्यूटीए स्पर्धांसह प्रमुख



आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धा सुरु करण्यात आघाडीवर आहेत. नागपूर येथील एमएसएलटीएच्या महत्वाकांक्षी आदिवासी प्रकल्पातही सुतार यांचा सहभाग होता.

सुतार यांनी आपल्या व्यावसायिक कंपनीच्या माध्यमातून रोहन बोपण्णा, सुमित नागल, अनिरुद्ध चंद्रशेखर आणि अन्य कुमार खेळाडूंना प्रायोजित केले आहे.

पुणे जिल्ह्यातील बहुराष्ट्रीय कंपनी आर्यन्स पंप्स ॲण्ड एन्व्हायरो सोल्युशनचे सुतार अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत.

### एआयएफएफ सब ज्युनियर २०२४-२५ लीग

## स्पोर्ट्स मॅनियाचा डिसोझा एफएकडून पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एआयएफएफ सब ज्युनियर २०२४-२५ लीगच्या ब गटामध्ये मुंबईतील कूपरेज येथे सोमवारी झालेल्या सामन्यात स्पोर्ट्स मॅनियाला डिसोझा एफएकडून १-२ असा निसटत्या पराभवाचा धक्का बसला. विजयी संघाकडून प्रत्येक हाफमध्ये एक गोल झाला. दोन्ही गोल कृष्ण शेट्टीने केले.

सोमवारच्या पराभवामुळे स्पोर्ट्स मॅनियाला एकही गुण मिळाला नाही. लीगमध्ये आतापर्यंत खेळलेल्या ७ सामन्यांनंतर त्यांच्या नावे ११ गुण आहेत. पुणे येथील स्पोर्ट्स मॅनियाचा त्यांच्या 'अवे' मोहिमेतील (५ गुण, ४ सामने) हा पहिला पराभव आहे. चार 'अवे' सामन्यांमध्ये १ विजय, १ पराभव आणि २ अनिर्णित निकालाचा समावेश आहे.

दरम्यान, स्पोर्ट्स मॅनिया संघाचा त्यांच्या घरच्या मैदानावर (होम' ग्राउंड) खेळलेल्या 3 सामन्यांमध्ये दोन विजय (6 गुण) मिळवले असून एकदा पराभव झाला आहे.



सोमवारी, दुपारी झालेल्या सामन्यात, पहिल्या सत्रात कृष्ण शेट्टीने (35+2') डिसोझा एफए संघाचे खाते उघडले.

मध्यंतरानंतर, कृष्ण शेट्टीने (67') वैयक्तिक दुसरा गोल करताना डिसोझा एफए संघाची 2-0 अशी आघाडी वाढवली.

दुसऱ्या हाफमध्ये बदली खेळाडू अरमान दवेने केलेल्या गोलमुळे स्पोर्ट्स मॅनिया संघासाठी गोल केला. दुसऱ्या सत्रात अरमान हा आर. कार्तिकेयच्या जागी आला होता.

यापूर्वी 'होम' मैदानावर स्पोर्ट्स मॅनिया संघाने डिसोझा एफए संघाला 3-2 असे हरवले होते.

स्पोर्ट्स मॅनिया संघ एआयएफएफ सब-ज्युनियर लीगमध्ये 27 मार्च रोजी 'होम' सामन्यात महाराष्ट्र ओरांजे एफसी संघाविरुद्ध खेळेल.


## सुरज राठी, सोनु मातंग, गौरव देशमुख, पिनाक अनाप यांनी गाजवला उद्घाटनाचा दिवस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फ्लेक्स् एन फ्लो फिटनेस स्टुडिओ यांच्या तर्फे आयोजित 'अमानोरा फ्लेक्स्एनफ्लो करंडक' स्नुकर अजिंक्यपद निमंत्रित स्पर्धेत अभिजीत रानाडे, सुरज राठी, सोनु मातंग, गौरव देशमुख आणि पिनाक अनाप यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचे पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला.

हडपसर येथील अमानोरा फर्न क्लब येथे आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन फ्लेक्स् एन फ्लोचे फिटनेस स्टुडिओचे संचालक सचिन संचेती यांच्या हस्ते करण्यात आले.





सलामीच्या सामन्यामध्ये अभिजीत रानाडे याने कैवल्य चव्हाण याचा ६५-२८, ३१-५६, १३-४५, ६९-३२, ५९-३५, ६६-२२ असा पराभव केला. पुना क्लबच्या सुरज राठी याने क्यु क्लबच्या अभिषेक बोरा याच्यावर ११-५४, ६५-३१, ५५-२३, २२-४९, ७२-३२, ६७-३६ असा विजय मिळवून अनपेक्षित निकाल नोंदविला.

मानांकित युवा खेळाडू सोनु मातंग याने पीवायसी हिंदू जिमखानाच्या निमिष कुलकर्णी याचा ५५-२२, २१-४९, ६८-३२, ४४-५६, ६८-३४, ५९-२१ असा पराभव करून स्पर्धेत शानदार सलामी दिली. डेक्कन जिमखाना क्लबच्या गौरव देशमुख याने हिसान सय्यद याचा ५८-३२, २४-५१, ६५-३९, ७१-३२, ६२-३२ असा पराभव करून विजयी सलामी दिली. गुणवान खेळाडू पिनाक अनाप याने रोहीत रावत याचा ११-५७, ५४-२१, ५८-२६, ६३-४१, ६८-४२ असा पराभव केला.

### 'पीडीएफए महिला लीग २०२४-२५' फुटबॉल स्पर्धेत

## इग्नाईट एफसी, ॲस्पायर एफसी, डेक्कन इलेव्हन संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटना आणि उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड एफसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए महिला लीग २०२४-२५' फुटबॉल स्पर्धेत इग्नाईट एफसी, ॲस्पायर एफसी आणि डेक्कन इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रिडानगरी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सानिका देशपांडे हिने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर डेक्कन इलेव्हन संघाने उत्कर्ष क्रीडा मंच कोथरूड एफसी संघाचा १-० असा पराभव केला. ॲस्पायर फुटबॉल क्लब संघाने बिटा स्पोटर्स ॲकॅडमी संघाचा ९-० असा सहज धुव्वा उडविला. सामन्यामध्ये पुजा गुप्ता हिने पाच गोल नोंदविले. याशिवाय आकृती गुप्ता आणि अरमीत कौर या दोघींनी दोन-दोन गोल नोंदवून संघाला सहज विजय मिळवून दिला. इग्नाईट एफसी संघाने स्निग्मय एफसी संघाचा ८-० असा सहज पराभव करून आगेकूच केली. श्रेया कुप हिने सर्वाधिक चार गोलांची नोंद केली. प्रतिक्क्षा देवांग, देवश्री भक्ता, तिहा परेरा आणि दिव्या खटाल यांनी प्रत्येकी एकेक गोल केला.



## बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी अ, बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी क संघांची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी करंडक 15 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी अ, बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी क या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या लढतीत सूरज तारके(नाबाद 86) याने केलेल्या सुरेख फलंदाजीच्या जोरावर बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी क संघाने बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ब संघाचा 7 गडी राखून पराभव करत विजयी सुरुवात केली.





दुसऱ्या सामन्यात आदेश जगदाळे(नाबाद 88धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी अ संघाने बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ड संघाचा 9 गडी राखून पराभव करत शानदार सुरुवात केली. सामनावीर पुरस्कार सुरज तारके व आदेश जगदाळे यांना भेटला.

### 'एसए अजिंक्यपद करंडक' १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट २०२५

## अष्टपैलू स्पोटर्स, विजय क्रिकेट ॲकॅडमीचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'एसए अजिंक्यपद करंडक' १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट २०२५ अष्टपैलु स्पोटर्स आणि विजय क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला.

सिंहगड रोड येथील व्हिजन क्रिकेट मैदानावर आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत हृषीकेश देशमुख याने केलेल्या अष्टपैलु कामगिरीच्या जोरावर अष्टपैलु स्पोटर्स संघाने धीरज जाधव ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला आणि विजयी सलामी दिली.



पहिल्यांदा फलंदाजी करताना धीरज जाधव ॲकॅडमीचा डाव ९५ धावांवर मर्यादित राहीला. श्रेयस वाघमोडे याने ३० धावांचे तर, राजवीर जाधव याने २२ धावांचे योगदान दिले. मोर्य पाटील याने एक धाव देताना तीन गडी तंबुत पाठवले. हे लक्ष्य अष्टपैलु स्पोटर्सने १३.३ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले. हृषीकेश देशमुख याने नाबाद ४६ धावांची खेळी केली आणि संघाला विजय प्राप्त करून दिला.

यशराज सोळंके आणि राजवीर होले यांनी केलेल्या फलंदाजीच्या जोरावर विजय क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा ११२ धावांनी सहज पराभव केला आणि शानदार सुरूवात केली. पहिल्यांदा खेळणाऱ्या विजय क्रिकेट ॲकॅडमीने १८८ धावा धावफलकावर लावल्या. राजवीर होले याने नाबाद ५३ धावांची तर, यशराज सोळंके याने ४९ धावांची खेळी केली. या दोघांना शौर्य जाधव (३२ धावा) आणि साक्षी गोरे (नाबाद २९ धावा) यांनीसुद्धा साथ दिली आणि संघाला मोठी धावसंख्या उभी करून दिली. याला उत्तर देताना क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा डाव ७६ धावांवर आटोपला. विजय ॲकॅडमीच्या वेदांत गोनबरे याने तीन तर, कृष्णा गायकवाड आणि रियांश ताकवले यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्राचा माजी रणजीपटू धीरज जाधव आणि एसए स्पोटर्स मॅनेजमेंटचे शराफत अली यांच्या हस्ते करण्यात आले.

#रा